9232
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ८२३

REFBK-0004714
REFBK-0004714

९८३२

संग्रालय नं. ९०७
ता. ९३/२०/३२

१०२६

रविकिरणमण्डळाचें अठरावें पुस्तक

# बन्दीशाळा

★ ★ ★ ★ ★ ★ ★

## यशवन्त

बा. क्र. ............
(स्थळ प्रत)
REFBK-0004714
REFBK-0004714

वासुदेव-प्रकाशनसंस्था, सोलापूर

विजयादशमी
१८५४

८८
9032

किंमत
दीड रुपाया

## चलच्चित्रपटासाठीं

'बन्दीशाळा' काव्याचें कथानक घेऊं इच्छिणाऱ्या सिनेमा कम्पन्यांच्या चालकांनीं खुद्द कवीकडे पत्रव्यवहार करावा.

## बन्दीशाळा

ह्या काव्याच्या पुनर्मुद्रणाचे, भाषान्तराचे व इतर सर्व प्रकारचे हक्क कवीकडे आहेत.

'यशोधन'च्या द्वितीयावृत्तींतील तसेंच प्रस्तुत काव्यांतील कवीचें छायाचित्र श्री. वामन नारायण भट यांनीं काढलें असून मुखपृष्ठाची कल्पनाही त्यांचीच आहे. छायाचित्राची छपाई ऑफसेट प्रोसेसनें पुण्याच्या गव्हर्मेंट फोटो झिंको ऑफिसमध्यें करण्यांत आली आहे.

काव्यांतील प्रसङ्गानुरोधानें घातलेलीं तीन रेखाचित्रें श्री. नी. म. केळकर यांनीं काढून दिलीं आहेत.

पुस्तकाच्या सजावटीचें सर्व श्रेय उपरोक्त कलावन्तांच्या कौशल्याकडे आहे.

पुस्तकाची छपाई सुबक व वक्तशीर करण्यासाठीं आर्य-संस्कृति मुद्रणालयांतील मंडळींनीं परिश्रमांत कसूर केली नाहीं, हें त्यांना भूषणावह आहे.

समाजांत सुप्रतिष्ठत होऊं

इच्छिणाऱ्या

**बन्धमुक्त बाळकैद्यांस**

समर्पण

मुद्रक :— सी. वा. फडणीस, बी. ए.,
'आर्यसंस्कृति-मुद्रणालय',
१९८ (१८), सदाशिव पेठ, पुणें नं. २

प्रकाशक : विष्णु वासुदेव कौलगेकर
चालक, वासुदेव प्रकाशन संस्था,
सोलापूर

४५९५४

# प्रस्तावना

अल्पवयांत बिघडणारीं मुलें, त्यांच्याकरितां काढलेल्या सन्मार्गप्रवर्तक शाळा, आणि त्यांमधून सज्ञानावस्थेंत बाहेर पडणाऱ्या भावी नागरिकां-सम्बन्धींची समाजावरील जबाबदारी हा प्रश्न इतक्या व्यापक स्वरूपाचा आणि गहन विचाराचा आहे कीं, पुढें करण्यांत येत असलेलें हें काव्य म्हणजे त्या विषयाचें केवळ उद्घावण आहे. परन्तु गङ्गेच्या पात्रांत स्नान करतांना मनसोक्त पोहण्याचा आनन्द आपणांस अप्राप्य असतां, काशी-यात्रा करून आलेल्या भाविकांनीं आणलेल्या गङ्गोदकाचें मार्जनच ज्या-प्रमाणें आपण स्वशिरीं करून घेतों व तेव्हढ्यावरच समाधान मानतों, त्या-प्रमाणें समाजशास्त्रवेत्त्यांना व मानसशास्त्रज्ञांना ज्याचें आलोडन करतां येणें शक्य आहे, अशा ह्या विषयाचें हें तान्त्रिक दिग्दर्शन करविण्यांतच मी अल्पसें श्रेय आणि समाधान साधूं पहात आहे.

मुलें कां बिघडतात या प्रश्नाचीं उत्तरें स्थूलमानानें आठव्या प्रकरणांत दिलेलीं आहेत; आणि त्यांपैकीं एकच कारण प्रामुख्यानें घेऊन ह्या काव्य-कथेची उभारणी केली आहे. तें कारण म्हणजे माता-पिता ह्यांपैकीं एका कोणाचा तरी अभाव हें होय. बालवयांत गुन्हेगारींत गुरफटलेल्यांचीं कारणें शोधणारांना शेंकडा नव्वद मुलांच्या बाबतींत हेंच कारण प्रभावी असलेलें आढळून आलें आहे. भग्न झालेलें घर हें ह्या आपत्तीचें मूळ होय! जेव्हां जेव्हां बालगुन्हेगारांना न्यायासनासमोर उभे करण्यांत आलेले आहे तेव्हां तेव्हां चौकशी-अन्तीं दहापैकीं नऊ जणांच्या बाबतींत आई व बाप यांपैकीं एकाचा अभाव असल्याचें न्यायाधिशांच्या अनुभवास आलें आहे. माता व पिता ह्या, घराच्या दाराच्या दोन फळ्या आहेत आणि ह्यांपैकीं कोणतीहि एक फळी खिळखिळी झाली कीं, बालमनाला बाहेर पडायला फट सापडते किंवा विघातक प्रवृत्तींचें किरण त्याच्या मनावर पगडा बसवूं लागतात.

दोन्ही फळ्या शाबूत राहून जोंपर्यन्त संरक्षणाचें काम करीत असतात तों-पर्यन्त बालमनावर दुष्ट प्रवृत्तीची छाया सहसा पडत नाहीं. परन्तु काळाच्या कुऱ्हाडीनें किंवा काडीमोडीच्या आघातानें जेव्हां ह्या फळ्या दुभङ्गल्या जातात तेव्हां बालमनाचें कोवळे अङ्कुर सुसंस्काराच्या शास्तेपणाला पारखे होतात. संस्कारक्षमतेच्या दृष्टीनें मुलांचीं मनें स्वाभाविकच अतीशय लवचीक असतात. तशांत निराश्रितपणाची भर पडली कीं, त्यांचीं मनें दुष्ट शक्तींच्या आहारीं सांपडलींच म्हणून समजावें. दारिद्र्य व त्याबरोबरच त्याचे साथी-दार बालमनाला गुन्हेगारीच्या गर्तेंत ढकलतात. वनवासी सीतेची काञ्चन-मृगाची हौस पुरविण्याकरितां धनुर्धारी रामचन्द्रानें, पर्णकुटींतून बाहेर पड-तांना, सीतेच्या संरक्षणार्थ एक सीमारेषा आखून दिली होती आणि तिचें उल्लङ्घन झाल्याबरोबर मायावी रावणाच्या तावडींत ती सापडली. संसारां-तही तसाच प्रकार घडत असतो. कुटुम्बांत मुलांच्या आकाङ्क्षा पुऱ्या कर-तांना त्यांच्या संरक्षणाबाबत अशाच प्रकारची एक मर्यादा आईबापाच्या अस्तित्वानें आपाततः आखली जात असते. पण ही मर्यादा आधिदैविक किंवा आधिभौतिक आघातांनीं जेव्हां लयाला जाते तेव्हां उघडीं पडलेलीं मुलें मोहाला – पुतना मावशीच्या मायावीपणाला – बळी पडतात. चुकलेलीं कोकरें लांडग्याच्या भक्ष्यस्थानीं पडलीं नाहींत, असें क्वचित् घडतें.

काडीमोडीचा फैलाव पाश्चात्य राष्ट्रांतच काय तो आहे आणि इकडे आपल्या देशांत नाहीं असेंच मानून स्वस्थ बसण्याचें कारण नाहीं. समा-जाच्या वरच्या थरांत अजून काडीमोडीचा प्रसार व पुरस्कार झाला नसला तरी हिन्दुसमाजाच्या खालच्या थरांतून काडीमोडीचा धुमाकूळ कांहीं कमी चाललेला नसतो. काडीमोड आणि पुनर्विवाह हे पहिल्या संततीचे शत्रू होत. जिल्हानिहाय निघत असलेल्या साप्ताहिकांच्या अङ्कांतील नोटिसांवरून जरा नजर फिरविली कीं, म्होतुराचें आणि सोडचिट्ठीचें सत्र खालच्या समा-जांत कसें चालू आहे हें कळून येईल. या नोटीसा वाचून साक्षर समाजानें आपलें मनरञ्जन कैक वेळां करून घेतलेंही असेल. पण बाळगुन्हेगारांची



चुकलेलीं कोंकरें लांडग्याच्या भक्ष्यस्थानीं पडलीं नाहींत, असें क्वचित् घडतें.

प्रस्तावना, पृष्ठ २.

सङ्ख्या कां कशी वाढते याचाही अन्दाज या नोटीसांवरून करतां येईल. दादलेपणाचा हक्क धुडकावून लावायला आणि पाटाचा घाट घालायला बाईल किंवा बापहि जेव्हां कम्बर कसतात तेव्हां पदरीं असलेल्या कच्च्या-बच्च्यांची कशी विल्हेवाट लागत असेल, ह्याचें चित्र रेखाटायला फारसे प्रयास पडतील असें नाहीं! सभ्य व सुसंस्कृत कुटुम्बांतही सापत्नभाव कसा थैमान घालत असतो किंवा मायावीपणाच्या बुरख्यांतून कसे लचके तोडीत असतो, हें आजूबाजूला पाहूं गेल्यास सापडणार नाहीं असें नाहीं. आणि त्यावरून संस्कृतिहीन समाजांतील पोराबाळांची आबाळ कोणत्या विकोपाला गेली असेल, हेंही अन्दाजता येणार नाहीं असें नाहीं. "तुझीं जेवलीं का? माझीं जेवलीं का? तुझीं–माझीं जेवलीं का?" अशी त्रिविध पूसतपास करण्याइतकीं समंजसता असणारे घरधनी व सुबत्ता असणारीं घरें विरळा! पण बहुशा समंजसता नसते व सुबत्ताही नसते. मग, 'तुझीं–माझीं जेवलीं का' एवढ्यापुरताच चौकशीला मर्यादितपणा येतो आणि माझ्यांना तूं व तुझ्यांना मी हेटाळून, घरांतून पिटाळून लावण्यापर्यन्त मजल जाते. काडी-मोड करून घेतलेले दम्पती किंवा दुर्दैवाच्या तडाख्यानें विधवा झालेली माता – विशेषतः पोटासाठीं दुसऱ्याचें काबाडकष्ट उपसण्याची जिच्यावर पाळी आली आहे अशी विधवा माता – यांच्या मनांत अपत्याविषयीं परकेपणा किंवा उदासीनता येऊं लागते. 'घर' ही संस्था जिथें मोडकळीस आलेली आहे तेथील मुलें दुसऱ्या कोणाजवळ तरी निरवलीं जातात. तशा ठिकाणीं कितीही चोख व्यवस्था असली तरी आईबापाच्या उबेची उणीव कशानेंही भरून येत नाहीं. मुलाच्या लालनपालनाला नुसत्या शिस्तीपेक्षां आईबापाच्या वात्सल्याचीही अवश्यकता अतीशय तीव्र असते. माता व पिता ही जोडी परस्परांना पूरक राहून, मुलांच्या शीलसंवर्धनाचे बाबतींत महत्त्वाची कामगिरी परोक्षापरोक्ष बजावते. नुसते पालक नको असतात तर पालकाविषयींचा जो जन्मजात ओढा मुलांच्या मनांत असतो तो शीलसंवर्धनाच्या कामीं अप्रत्यक्षपणें पुष्कळ प्रभावी असतो. आई ही मुलाची ढाल

असून पिता हें चिलखत आहे. मुलाच्या संरक्षक देवता म्हणजे माता व पिता !

जन्माला येणारा जीव आपल्याबरोबर चोरटेपणा तसाच प्रामाणिकपणाही घेऊन येतो; सत्याचरणाची त्याचप्रमाणें असत्याचरणाचीही प्रवृत्ति बीजरूपानें त्याच्या ठिकाणीं वास करीत असते; फितूरी आणि इमान ह्या दोन्हीही गुणावगुणाची वसती त्याच्या मनांत असते; जें जें म्हणून वंद्य आहे त्यांच्या, तसेंच जें जें म्हणून निंद्य आहे त्यांच्याही वासना त्याच्या हृदयांत घर करून, दबा धरून असतात. व यापैकीं सद्वृत्ती वाढीला लागावयाच्या किंवा असद्वृत्तींचा परिपोष व्हावयाचा हें फक्त दोन व्यक्तींवर—केवळ आई व बाप यांच्याचवर अवलम्बून असतें. काडीमोड झालेल्या दम्पतीचीं मुलें आपल्या निसर्गदत्त संरक्षणकर्त्यांना मुकलीं जातात असें नव्हें, तर, मानवजातीचें भूषण व अभिमान हीं देखील त्यांच्यापासून हिरावून घेतलीं जातात. मुलाला आपल्या दिवङ्गत पित्याचें अथवा मातेचें पुण्यस्मरण करावेसें वाटतें आणि त्याला करतांही येतें. पण काडीमोड करून घेतलेल्या जन्मदात्याच्या किंवा जन्मदात्रीच्या पुनर्विवाहोत्तर ह्या पुण्यस्मरणालाही त्याला सहजगत्या किंवा बुद्ध्या प्रतिबन्ध होतो. मुलें वाईट मार्गाला लागण्याच्या अनेक कारणांपैकीं मुख्य कारणाची मीमांसा थोडीबहुत अशी आहे.

अशा अनेक प्रकारच्या विषम परिस्थितींत बिघडलेल्या मुलांना सुधारण्यासाठीं ‘सन्मार्गप्रवर्तक शाळा’ (Reformatory Schools) राज्यशास्ते स्थापीत असतात. त्यांची घटना कशी असते याचा तपशील कथेच्या ओघांत आणि परिपोषांत जेव्हढा करतां आला तेव्हढा केला आहेच. या शाळांमधील रचनेंतील गुणदोषांची चर्चा करण्याची ही जागा नव्हे आणि त्यावर भर देणें हें ह्या काव्यकथेचें उद्दिष्टही नव्हें. तथापि या शीलभ्रष्ट मुलांच्या वर्तनांत आणि प्रवृत्तींत आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठीं तीन बाबींकडे लक्ष द्यावयाचें असतें. नीति, शिक्षण व उद्योग ह्या त्या तीन बाबी होत. उदरम्भरणाची जबाबदारी अङ्गावर पडली म्हणजे ती पार पाडण्यासाठीं मनुष्य निरनिराळे मार्ग चोखाळीत असतो. आणि नीतीची पकड

मनाला नसेल तर वाममार्गाकडे —त्याच्या सकृद्दर्शनी सुलभतेमुळें — मन झुकण्याचा पुष्कळ सम्भव असतो. म्हणून नीतिशिक्षणानें सम्मार्जिलेल्या मनोभूर्मीत उद्योगप्रीयतेचीं बीजें रुजविलीं तर अप्रामाणिक मार्गाचा अवलम्ब करण्याची वासना होणार नाहीं. या धोरणाला अनुसरून सन्मार्गप्रवर्तक शाळांतील शिक्षणाचा तपशील आंखलेला असतो.

या शिक्षणसंस्थांकरितां शिक्षक नेमावयाचे ते मात्र सर्व-सामान्य शिक्षकवर्गांतील असून चालणार नाहींत. कारण, विद्यार्थ्यांच्या मनःप्रवृत्तींत बदल घडवून आणणें हें ध्येय असलेल्या शाळांत केवळ इतर शाळांतील अभ्यासपत्रकाप्रमाणें इयत्तावार अभ्यास करवून घेण्यानें खरें कार्य होणार नाहीं. "बरें सत्य बोला, यथातथ्य चाला"; "खोटें कधीं बोलूं नये। शिवी कोणा देऊं नये" अशा सारख्या सन्तवचनांची सन्था देण्यानें मनावर नीतीचे दृढ संस्कार होतीलच असें नाहीं. मुखोद्गत झालेल्या विषयानें मनाचा कबजा घेतला जाईलच असें कुठें आहे? तसें असतें तर 'तुकाराम' अगर 'शिवाजी' यांच्या भूमिका करणारे सर्व नट रङ्गभूमीच्या बाहेरही सन्तपदावर आणि चक्रवर्तीपदावर विराजमान झालेले आढळले असते. तोण्डानें सुभाषितांची घोकंपट्टी चालली असतांना विद्यार्थ्यांचीं मनें पन्तोजीला कसें चकवावें व वर्गबन्धूच्या पायांत पाय घालून त्याला कसें तोण्डघशी पाडावें या क्लृप्त्या योजण्यांत मग्न झालेलीं असणें शक्य आहे. कदाचित् कांहीं बरा परिणाम होणें शक्य आहे असें जरी धरून चाललें तरी तो कोणत्या स्वरूपाचा व किती प्रमाणांत असेल? "चोरी कां करूं नये?" "लोक चोर म्हणतील म्हणून!" "आणखी कां म्हणून करूं नये?" "शिक्षा होते म्हणून!" इतका परिणाम मनावर झाला म्हणजे भागत नाहीं. कारण, चोरी उघडकीला न आली म्हणजे हीं दोन्हीं पर्यवसानें टळतात, हें त्या मुलाला माहीत असतें. म्हणून, आपल्याप्रमाणेंच दुसऱ्यालाही सुखसोयींची अपेक्षा असते व आपल्याप्रमाणेंच दुसऱ्यांच्या सुखसोयी हरपल्या म्हणजे जिवाची तळमळ होते, असा ठसा त्याच्या मनावर युक्तिवादानें,

दृष्टान्तानें, प्रत्यन्तरानें अगर आणखी कोणत्या तरी मार्गानें उठवून, दुसऱ्याचीं सुखदुःखें आपल्या जाणीवेनें पाहण्याची बुद्धि त्याच्या ठिकाणीं जागृत करण्याइतकें व्यक्तिनिहाय लक्ष पुरवून मनांत बदल घडवून आणणारे व कळकळीनें काम करणारे मानसशास्त्रज्ञ ह्या संस्थांतून नेमले पाहिजेत.

धन्देशिक्षण हेंही रिफॉर्मेटरी स्कूलमधील शिक्षणाचें एक अङ्ग आहे. धन्देशिक्षणाचा हेतु विद्यार्थ्यानें स्वावलम्बी बनून इमानानें आपली भाकरी मिळवावी हा तर आहेच, पण अप्रत्यक्षपणें त्याच्या मनावरही सन्मार्गप्रवर्तक ठसे उमटावेत, असा देखील धन्देशिक्षणाचा हेतु असावा. आणि ही कल्पना प्रस्तुत काव्याच्या बाराव्या प्रकरणांत 'उद्यमगीता'च्या द्वारें विपद केली आहे.

शिक्षणाप्रमाणेंच तेथील वसतीबद्दलही कांहीं मुद्दे डोळ्यापुढें ठेवणें हें अधिकाऱ्यांचें कर्तव्य असतें. मुलें बहकण्याचीं कारणें जशीं अनेक असतात तशींच सुधारण्याचीं साधनेंही निरनिराळीं असावयाला पाहिजेत. अनुवंशिक संस्कार, पालकांच्या समंजसपणाच्या अभावीं लालनपालनांतील वैगुण्य, खुद्द मुलांची दुर्दम विकारवशता, विचारांतील अपक्वपणा आणि अहितकर कल्पनांची मनावर बसलेली बळकट पकड, कुसङ्गती अशा अनेकविध कारणांनीं चुकलेल्या मुलांची बन्दीशाळेंत एकच गल्लत करून, एकाच आंखीव कार्यक्रमाच्या परिघांत त्यांना फिरवून सुधारणेची आशा करणें चुकीचें आहे. बन्दीशाळा म्हणजे पान्जरपोळ नव्हे. तेव्हां, कारणांचा शोध घेऊन त्यावरून मुलांची (Borstal Institutions प्रमाणें) वर्गवारी करणें अवश्यक आहे. अचूक निदान आणि तदनुसार उपाय हें कौशल्य वैद्याप्रमाणें सन्मार्गप्रवर्तकशाळा-धिकाऱ्यांच्या अङ्गींही असावयाला पाहिजे.

रिफॉर्मेटरी स्कूलमध्यें घालविलेल्या काळाची फलश्रुती तदुत्तरच्या आयुष्याला जी दिशा मिळेल तिच्यावरून कळून यावयाची असते. या दृष्टीनें बन्धमुक्ततेनन्तरचा काळ हा बाळकैद्यांच्या आयुष्यांत अत्यन्त महत्त्वाचा होय. बन्दीशाळेंत घालवावयाच्या काळाची मर्यादा सज्ञानावस्था प्राप्त होण्यापर्यन्तची असते. तेव्हढ्या मुदतींत चरितार्थाचें साधन म्हणून एकादा

धन्दा शिकतां येतो आणि अज्ञानदशेंत एक वेळ अधःपतित झालेलें आयुष्य पुन्हा पहिल्याच मार्गाला न लागावें इतकें समजण्याची पात्रता येते. तथापि, वाईट मार्गाला लावूं नये हें कळूं लागलें तरी वळूं लागण्यासारखी परिस्थिति सर्वदा लाभतेच असें मात्र नाहीं. गुन्हा केल्याशिवाय राहवणारच नाहीं ह्या कोटीपर्यंतची प्रवृत्ति ज्यांच्या रक्तांतच खेळत आहे अशा प्राण्यांची गोष्ट निराळी. पण सामान्यतः गुन्हेगारी परिस्थितीमुळेंच अङ्गीं बाणली जाते आणि वळावली जाते. अवश्यकता ही मार्गशोधक असते; आणि जो मार्ग सुलभ तोच पत्करण्याचा कुणाचाही स्वभाव असणारच. चरितार्थाची भ्रान्त ज्याला पडत नाहीं तो सहसा वाममार्गाचा अवलम्ब करणार नाहीं. हें जाणून, चरितार्थाची भ्रान्त पडूं नये म्हणून, एकाद्या धन्द्याची विद्या बाळ-कैद्यास बन्दीशाळेंत दिली जाते. तथापि विद्या राबवायला व तिचें फळ पद-रांत पडायला जो काळ जावा लागतो तोपर्यन्त धीर धरवण्याइतका आडोसा त्याला हवा असतो. तो आडोसा नसलेल्यांना उमेदवारीची मुदत दुस्सह लाम्ब वाटूं लागून कलङ्कितपणाची पार्श्वभूमी त्या उमेदवारीला विघातक होत असते. ह्या निर्णायक काळांत हीन भाव त्याच्या मनाचा ताबा घ्यायला टपलेले असतात आणि त्याच भावांची त्याला पूर्वीची ओळखही असते. सन्मार्गानें जाण्याची इच्छा त्याच्या मनांत उद्भवली असली तरी तो मार्ग अनोळखीपणानें बिकट वाटत असतो. अशावेळीं कोणी पाठीराखा असेल तर अधःपातापासून त्याचा बचाव होणार. त्याच्या जीविताची नौका योग्य दिशेला लागेपर्यन्त—भोंवऱ्यांतून बाहेर पडेपर्यन्त—खम्बीर कर्णधार हवा. परन्तु अशा पाठीराख्यांचा अभाव बन्धमुक्त-कैद्यांस अधःपाताच्या वाटेला लावीत असतो. प्रस्तुत काव्याचा सगळा भर ह्याच मुद्यावर आहे.

सहानुभूतीच्या सम्मार्जनानें शबल भावनांचीं पिशाच्चें पळून जातात. दयाशील हात पाठीवरून फिरूं लागताच दुष्टांचीं अन्तःकरणें वितळूं लाग-तात. तो दयेचा हात आणि तें सहानुभूतीचें सम्मार्जन ह्यांचेकरितां बन्ध-मुक्त कैद्याचा जीव आसावलेला असतो. पण ह्या दयेच्या हाताची आणि

सहानुभूतीच्या आचमनाची जोड त्याला इतकी दुर्मिळ असते कीं, त्याला जगाविषयीं जिव्हाळा वाटेनासा होतो. जगाविषयीं जिव्हाळा निर्माण झाल्याशिवाय दुष्कृत्यापासून अन्तःकरण परावृत्त होणें नाहीं. जिव्हाळ्याचा हा प्रभाव ध्यानीं घेऊन, तो बन्धमुक्त कैद्याच्या हृदयांत उत्पन्न होईल अशा रीतीनें त्याचें स्वागत करण्याची जबाबदारी समाजावर नाहीं काय ? सज्जनांच्या गळ्यांत पुष्पमाळा घालून कृतज्ञता व्यक्त करणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे असें समजणारा समाज, आपल्यांतून उठून गेलेला पण कैदेच्या भट्टींतून तावून सुलाखून निघालेला आणि परत आपल्या समाजांत प्रविष्ट होण्याची आशा बाळगणारा जीव समोर आला असतां, त्याजकडे असे भेदक कटाक्ष फेकीत असतो कीं, त्या बन्धमुक्ताला आपले भाऊबन्द ते हेंच काय अशी शङ्का येऊं लागते. बन्धमुक्ताला चुचकारण्याऐवजीं धुडकावण्याकडे ज्या समाजाची प्रवृत्ती त्या समाजाला तो जीव पारखा होतो, इतकेंच नव्हे तर, पर्यवसानीं त्या समाजाचा तो शत्रू होतो.

" दया धरमका मूल है " हें तोण्डानें म्हणणारांच्या दयेची मर्यादा इतकी अकुञ्चित असते आणि धर्माबद्दलची कल्पना इतकी पोरकट असते कीं, हें सूत्र उच्चारण्यानें ते त्या सूत्राची किम्मत कमी करतात. दया म्हणजे आन्धळ्या--पाङ्गळ्याच्या माळेला पै-पैसा देणें आणि धर्म म्हणजे केवळ कुळाचार पाळणें ह्या पलीकडे त्यांना ह्या सूत्राचा अर्थ असेल असें वाटतच नाहीं. आन्धळ्या-पाङ्गळ्यांच्या पोटासाठीं पै-पैसा खर्चण्याकरितां जसा हात खिशांत घालावा तसाच प्रवाहपतितांचा उद्धार करण्यासाठींही हात पुढें करावा अशी धर्माची साङ्गी आहे, हें जेव्हां समाजाच्या ध्यानीं येईल, तेव्हांच बन्धमुक्त कैद्यांच्या सुधारणेची अधिक प्रमाणांत अपेक्षा करतां येईल. एरव्हीं एक काळचा कैदी कायमचाच कैदी होण्याशिवाय काय करणार ? बन्दीशाळांची स्थापना ज्या हेतूनें करण्यांत आलेली असते त्या हेतूच्या सिद्धीसाठीं त्यांना पूरक अशा संस्था-बन्धमुक्ताला आश्रय देऊन सन्मार्गाला लावणाऱ्या संस्था अस्तित्वांत येणें अगदीं जरूर आहे. नाहींपेक्षां, बन्दीशाळांची (Reformatory Schools) उभारणी निष्फळ होय !

काव्यविषयाच्या स्वरूपाची जी रूपरेषा येथवर काढली आणि जी पुढील काव्यप्रबन्धांत व्यक्त करतां आली तीमधील अपूर्णतेची म्हणजेच पर्यायानें माझ्या अधिकारपात्रतेच्या परिमितेची मला जाणीव आहे. प्रस्तुत काव्य लिहावयाला आरम्भ झाला त्याला आज जवळजवळ सहा वर्षें होत आलीं. हातून जी कांहीं विविध रचना आजवर झालेली दिसत आहे तिच्या कर्तृत्वाचा अहङ्कार मला बाळगतां येत नाहीं. कारण, साक्षात्काराच्या दिव्य क्षणांना शब्दस्वरूप देतां आलें याचें श्रेय मजकडे नसून, ‘ बोलविता धणी वेगळाची ’ अशी माझी खात्री आहे. त्यामुळें ही काव्यकथा शेवटास जाईल कीं नाहीं अशी शङ्का नेहमीं वाटत असे. परन्तु श्रीशारदेच्या कृपागुणें हें फळ आज जनतेच्या हातीं देतां येत आहे.

प्रस्तुत काव्यास नांव देण्याबाबत बरेच विचार घोळूं लागले. Reformatory school ह्या शब्दद्वयाचें “ सन्मार्ग--प्रवर्तक शाळा ” हें भाषान्तर पूर्णार्थवाचक असलें तरी, काव्यास नांव देण्याइतकें तें सुटसुटीत नाहीं. असल्या संस्था बव्हंशीं ‘शाळा’च होत, हें पटावें अशा रीतीनें जरी त्यांची आखणी करण्यांत आली असली तरी सामान्य जनतेच्या व बाळकैद्यांच्या मनावर ह्या संस्था ‘ बन्दीखाने ’ म्हणूनच कोरल्या जातात. ह्या संस्थांतून सुटल्यानन्तरही जनतेकडून ह्या बाळकैद्यांची ज्या रीतीनें सम्भावना होते ती लक्षांत घेतली म्हणजे ओस्कर वाइल्ड ( Oscar Wilde ) ह्यानें एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें On the day of my release I shall merely be passing from one jail to another. असाच अनुभव बहुतेक बाळकैद्यांना येतो. तसेंच, “ कैदी व कैदखाना ” ह्या मथळ्याखालीं गणना न होतांही, कित्येकांना दुर्दैवाच्या निर्दय पाठशिवणीमुळें व परिस्थितीच्या कोण्डमारीमुळें इहलोकवास म्हणजे कैदखानाच वाटून, कैद्यासारखें जिणें कण्ठण्याचें त्यांच्या नशीबीं येतें. अशा अनेक प्रकारांचा विचार करतां, “ शाळा ” व “ तुरुङ्ग ” ह्या दोन्ही संस्थांच्या गुणावगुणांचा आणि प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष स्वरूपाच्या बन्दीवासाचा ज्या नांवांत समावेश होऊं

शकतो असें "बन्दीशाळा" हें व्यापक नांव प्रस्तुत काव्यास देणें विशेष उचित वाटलें. काव्यांतील प्रमुख व्यक्ती लक्ष्यांत घेतल्या असतां, 'बन्दीशाळा' ह्या नांवांतील उपरोक्त व्यापकता समर्पक असल्याचें आढळून येईल.

त्रुटित भावकविता आणि प्रदीर्घ काव्यकथा हे काव्यप्रकार भिन्नभिन्न स्वरूपाचे आहेत. एका प्रकाराच्या निर्मितीला अनुकूल असलेली मनोरचना दुसऱ्या प्रकारांतही तितक्याच सफाईनें रममाण होईलच असें नाही. म्हणून भावगीतांच्या विलासांतच मग्न झालेल्या मनाला काव्यांत कथानक गुम्फण्याचें काम कठीण वाटलें तर तें स्वाभाविकच होय. भावगीताचा जन्म भावनेच्या उमाळ्यांतून होत असल्यामुळें, प्रत्यक्ष तें लिहितांना प्रयास पडत नाहींत. भावकविता ही 'राजापुरची गङ्गा' आहे तर महाकाव्य म्हणजे 'गङ्गावतरण' होय. दोन्ही गङ्गाच. पण पहिल्या प्रकारांत 'चमत्कार' ( Miracle ) वाटतो तर दुसऱ्या प्रकारांत 'साक्षात्कार' असतो. पहिली-कडे पाहतांना विस्मय व आदर जागृत होतात तर दुसरी तपश्चर्येचा प्रभाव पटविते. भावगीतापेक्षा कथानिर्मितीला अधिक कलाकौशल्याची व परि-श्रमाची अवश्यकता असते. अनुसन्धान न सोडतां, कथेचा धागा न तोडतां, रचना करतांना पुष्कळ वेळां गद्यसदृश ओळी गुम्फण्याचा प्रसङ्ग येतो. अर्थात् अशा ओळी जितक्या कमी करतां येतील तितक्या करण्याकडे प्रवृत्ति ठेवावी लागते; आणि त्यांनाही मढविण्याची दक्षता ठेवून जितका साज चढवावा तितका थोडाच असतो. तथापि आधेमधेंच वाचतांना नीरस वाटण्याजोग्या कांहीं ओळी आढळल्या तरी एकन्दर कथेच्या उभारणींत त्यांची अवश्यकता असते आणि त्यांचें सौन्दर्य अलगपणें पाहावयाचें नसतें ही गोष्ट जरूर ध्यानांत बाळगली पाहिजे. पानाचा देठ किंवा वृक्षाचा बुन्धा कितीही राकट आणि ओबडधोबड दिसला तरी पाना-फुलांच्या रसरशित-पणाचें पोषण करणाऱ्या वाहिन्या त्यांमधून गेलेल्या असतात हें दृष्टीआड करतां कामा नये.

भावगीत प्रकट होत असतांनाच आपल्याला अनुकूल अशी चाल घेऊ-

नच अवतरतें. प्रदीर्घ रचनेकरतां वृत्ताची निवड करावी लागते. वृत्त शक्य तितकें लवचिक आणि विविधरसांचा परिपोष करतां येईल असें, म्हणजे मूलतः रसवैशिष्ट्यविहीन असावें लागतें. पाण्याला स्वताचा रङ्ग नसल्यामुळें त्यांत कोणत्याही रङ्गाची खुलावट हवी तितकी जशी करतां येते तद्वतच कोणत्याही रसाचा उठाव करण्यास आड न येईल असें निर्गुण-निराकार वृत्त महाकाव्यासाठीं निवडावें लागतें. शिखरिणी, शार्दूलविक्रीडित, पृथ्वी, वियोगिनी, मन्दाक्रान्ता, वगैरे वृत्तांतून एकेका विशिष्ट रसाचा उठाव स्वभावतः व्हावा अशी त्यांची सुरावट असते. आणि म्हणून, संस्कृत महाकाव्यांतील सर्गांमधून जे जे कथाविभाग विरचिलेले असतात त्या त्या विभागांतील मुख्य रसाचा उठाव होण्यास अनुकूल अशा वृत्ताची निवड केलेली आढळते. परन्तु आर्या, ओवी, अनुष्टुभ् ह्या जातींतून कोणत्याही रसाचा परिपोष होण्यास प्रत्यवाय येत नसे. ‘ साकी ’ ही चालही अशीच आहे. ‘साकी’मध्यें आठ-आठ मात्रांवर यती असतो. प्रस्तुत काव्यांत पहिल्या आठ मात्रांपुढील यती आवर्जून पाळण्याचा अट्टाहास केला नाहीं. कारण, तसें करावयाचें म्हटलें असतें तर भाषासरणी बरीच नेमळी झाली असती व ढौल बिघडला असता. शिवाय माझ्या मतें सोळा मात्रांनन्तरचा यतीच वाक्यनिसौकर्याच्या दृष्टीनें खराखुरा महत्त्वाचा आहे.

असो. काव्यरचनेबाबत अधिक विस्तार करण्याची जरूरी नाहीं. कवि गिरीश यांनीं तें काम उरकलें आहे. प्रस्तावनेंत ग्रन्थकर्त्याचे दोषच दोष दाखवून त्याचा व त्यांचा सडकून समाचार घ्यायचा पायण्डा अजून पडला नाहीं. तशांत गिरीश हे माझे स्नेही. तेव्हां माझे गुणपरिमाणू त्यांच्या स्नेहलोचनांना पर्वतप्राय दिसत असावेत हे स्वाभाविक आहे. तथापि, माझी कृति निर्दोष आहे असें नाहीं. आणि दोष दाखविण्याचें गिरीशांनीं टाळलें असलें तरी इतर न्यायप्रिय टीकाकार तें काम करतीलच. आजवर टीकाकारांचे वास्तव--अवास्तव आहेर मी जसे स्वीकारले व त्यांतील वास्तव आहेर मला आत्मप्रगतीला जसे उपकारक झाले तसे या पुस्तकाच्या बाबतीं-

तरी जें दोषदिग्दर्शन होईल तेंही मी सेव्य समजेनच. गिरीशांचें "रसग्रहण" काव्याला जोडण्यांत रसिकांची दिशाभूल मला करावयाची नाहीं. माझी रसिकांना एवढीच विनन्ति आहे कीं, त्यांनीं प्रथम समग्र काव्य काटेकोरपणानें वाचावें आणि मग आपला अभिप्राय गिरीश यांच्या रसग्रहणाशीं कितपत जुळतो तें पडताळून पाहावें म्हणजे त्यांतील स्तुतीच्या शैवालाखालीं शुद्ध गुणी जलाशय किती आहे हें प्रत्ययास येईल.

गायकवाड वाडा,
नारायण पेठ, पुणें-२
२१ सप्टेंबर १९३२.

यशवन्त



Govt. Photozinco Office, Poona.—1932.

८६९८

# रसग्रहण

इन्द्रधनुष्यांतील रङ्गांची मनोहर खुलावट किंवा सुरेल आलापांतील गोड स्वरभाव हे सहृदय मनाला नेहमींच आनन्द देतात. या खुलावटीचें किंवा स्वरभावांचें विच्छेदन करणें, केव्हाहि नीरसच ठरेल; कारण असल्या गोष्टी डोळ्यांनीं पहावयाच्या किंवा कानांनीं ऐकावयाच्या असतात, व त्यांतील आनन्द समरसतेनें हृदयाच्या द्वारें लुटावयाचा असतो. परन्तु हा आनन्द ज्या अनेक कारणांनीं होतो, किंवा त्याच्या अन्तर्भूत ज्या सुखसंवेदना असतात, त्यांचें पृथक्करण केलें असतां, उलट तो द्विगुणित होत जातो, हा अनुभव आहे. सौन्दर्यप्रतीति जरी कारणमीमांसेवाचून शक्य असली, तरी कारणमीमांसा जाणण्याची मनुष्यमात्राची इच्छा दुर्दम्य असते; आणि म्हणूनच एकाद्या कलाकृतींतील बारीकसारीक गोष्टींच्या ज्ञानानें त्याची जिज्ञासा तृप्त झाल्यावर, काही एका अपूर्व आनन्दाची भर पूर्वीच्या आनन्दांत पडते. ताजमहालाच्या दर्शनानें आनन्द होतोच; पण त्यांतील बारीकसारीक कलाकुसरीचें जेव्हा आपण चिकित्सक बुद्धीनें सूक्ष्म निरीक्षण करतों, तेव्हा तो आनन्द द्विगुणित झालेलाच प्रत्ययास येतो. इतकेंच नव्हे, तर कलेंतील अपूर्वाई जनित्याच्या प्रतिभाशक्तीची साक्ष आपल्या मनाला पटविते व त्यायोगानेंहि पुन्हा पूर्वीचा आनन्द त्रिगुणित झालेला आढळतो. हा नियम सर्वच कलाकृतीला लागू आहे; आणि म्हणून प्रस्तुतसारखें बन्दीशाळा काव्य त्याला अपवाद ठरणार नाहीं. या दृष्टीनें हें 'रसग्रहण' समर्थनीय ठरेल असें वाटतें.

प्रस्तुत काव्याचा विषय किती अगत्याचा आहे, यासम्बन्धीं कवीनें आपल्या प्रस्तावनेंत सविस्तर विवेचन केल्यानें, मी येथें त्याची पुनरुक्ति



नोंद नं. ६८९८



Govt. Photozinco Office, Poona.—1932.

संग्रहालय
८६९८
संग्रह नं. ७०७६
ता. १३/२०/३२

# रसग्रहण

इन्द्रधनुष्यांतील रङ्गांची मनोहर खुलावट किंवा सुरेल आलापांताल गोड स्वरभाव हे सहृदय मनाला नेहमींच आनन्द देतात. या खुलावटीचें किंवा स्वरभावांचें विच्छेदन करणें, केव्हाहि नीरसच ठरेल; कारण असल्या गोष्टी डोळयांनीं पहावयाच्या किंवा कानांनीं ऐकावयाच्या असतात, व त्यांतील आनन्द समरसतेनें हृदयाऱ्या द्वारें लुटावयाचा असतो. परन्तु हा आनन्द ज्या अनेक कारणांनीं होतो, किंवा त्याच्या अन्तर्भूत ज्या सुखसंवेदना असतात, त्यांचें पृथक्करण केलें असतां, उलट तो द्विगुणित होत जातो, हा अनुभव आहे. सौन्दर्यप्रतीति जरी कारणमीमांसेवाचून शक्य असली, तरी कारणमीमांसा जाणण्याची मनुष्यमात्राची इच्छा दुर्दम्य असते; आणि म्हणूनच एकाद्या कलाकृतींतील बारीकसारीक गोष्टींच्या ज्ञानानें त्याची जिज्ञासा तृप्त झाल्यावर, काही एका अपूर्व आनन्दाची भर पूर्वीच्या आनन्दांत पडते. ताजमहालाच्या दर्शनानें आनन्द होतोच; पण त्यांतील बारीकसारीक कलाकुसरीचें जेव्हा आपण चिकित्सक बुद्धीनें सूक्ष्म निरीक्षण करतों, तेव्हा तो आनन्द द्विगुणित झालेलाच प्रत्ययास येतो. इतकेंच नव्हे, तर कलेंतील अपूर्वाई जनित्याच्या प्रतिभाशक्तीची साक्ष आपल्या मनाला पटविते व त्यायोगानेंहि पुन्हा पूर्वीचा आनन्द त्रिगुणित झालेला आढळतो. हा नियम सर्वच कलाकृतीला लागू आहे; आणि म्हणून प्रस्तुतसारखें बन्दीशाळा काव्य त्याला अपवाद ठरणार नाहीं. या दृष्टीनें हें 'रसग्रहण' समर्थनीय ठरेल असें वाटतें.

प्रस्तुत काव्याचा विषय किती अगत्याचा आहे, यासम्बन्धीं कवीनें आपल्या प्रस्तावनेंत सविस्तर विवेचन केल्यानें, मी येथें त्याची पुनरुक्ति



नोंद नं. ६८७२

करीत नाहीं. राष्ट्राच्या घटनेंत मुलांचीं माणसें, माणसांचा समाज व समाजांचें राष्ट्र होतें; हा अनुक्रम लक्षांत घेतला, तर पुढें जो राष्ट्ररूपी कळस आपणांस दिसतो व ज्याला आपण नेहमीं वन्दन करतों, तो मुलांच्या पायावर आधारलेला असतो, असें दिसेल; आणि म्हणूनच ज्याला कळस उभारावयाचा असेल, त्यानें पायाची अवहेलना करतां कामा नये, असें आपण म्हणतों; इतकेंच नव्हे तर, याच तत्त्वाची जाणीव मनांत नेहमीं जागृत ठेवण्यासाठींच कीं काय, देवळांत जातांना आपण तळच्या पायरीला प्रथम वन्दन करतों. मुलांचीं जपणूक, संवर्धन, त्यांच्या शीलाची घडण, त्यांचें ध्येयवादित्व, या गोष्टी राष्ट्रीय जीवनांत अत्यन्त महत्त्वाच्या आहेत. या दृष्टीनें हा विषय व्यापक स्वरूपाचा असून, सामाजिक प्रगतीच्या मार्गांत नेहमीं पुढें दत्त म्हणून उभा राहणारा आहे. असल्या महत्त्वाच्या विषयाकडे, आपल्या प्रभावी लेखणीनें यशवन्तानीं समाजाचें लक्ष खेचलें, ही गोष्ट स्पृहणीय तितकीच अभिनन्दनीय आहे. त्यांच्या वाटणीला बन्दीशाळेची नोकरी आली असली तरी त्यांनीं या परिस्थितीचा उत्तम फायदा घेतला आहे. त्यांच्या वांट्याला जरी ' माळजागा ' आली असली तरी तेथेंहि त्यांनीं आपल्या कर्तबगारीनें ' रम्य बाग फुलविली ' आहे; तींत 'तुळशीचें रोप ' लावून तिला त्यांनीं पावित्र्य आणलें आहे. इतकेंच नव्हे तर त्या स्थानिक फुलबागेंमधील फुलांचें दुर्दैव पाहून, त्यांचें मन ' विपण्ण ' झालेलें आहे; व दोषी समाजानें निर्दोषी फुलास डागाळलेलें' ठरवावें, हें पाहून त्यांचें मन तळमळलेंहि आहे. त्यांना कोणी 'कैवारी' नाहीं हें पाहून त्यांनीं आपलें काव्यजल त्यांच्यावर शिम्पून त्यांना ' पावन करून घेऊन', स्वतांच्या भावनोत्कट शब्दांनीं, त्यांनीं त्यांचें दुःख समाजाच्या वेशीवर टाङ्गलें आहे. त्यांची या बागेंतील फुलासम्बधीचीं विधानें स्वानुभवजन्य आहेत, आणि म्हणूनच, 'सुधारणा क्षमेनें होतें कीं शिक्षेनें होतें' असा रोकडा सवाल त्यांनीं समाजाला या काव्यरूपानें टाकला आहे.

कथानकाची गुम्फण अगदीं साधी आणि म्हणूनच रम्य आहे. अलङ्कारांत ज्याप्रमाणें स्वभावोक्ती, त्याचप्रमाणें कथानकांत साधें, सरळ कथानकच मनावर अधिक परिणाम करतें. गुणिलेसारख्या दरिद्री शीलवतीवर वैधव्याचा प्रसङ्ग यावा व तिला वृकोदरासारख्या अट्टल वकीलाचा आश्रय घेण्याची पाळी यावी व तीहि टेनिसन्नें म्हटल्याप्रमाणें 'Sweet my child I live for thee' या स्वरूपांत, स्वजीविताचा कण्टाळा आल्यानन्तर यावी, हा दैवदुर्विलास हिन्दूसमाजाच्या नित्याच्या पाहणींतला आहे. वृकोदरासारख्याला शीलवतीचा अभिलाष वाटावा, हें दृश्य नेहमीं दृष्टीस पडणारें आहे; आत्मसुखासाठीं बाल्यावस्थेंतील सञ्जीवासारखें फूल चुरडून टाकण्याची त्यास दुर्दम्य इच्छा व्हावी, हाहि प्रसङ्ग सहज आहे. वृकोदराच्या तालमींत वाढलेल्या निपुत्रिक पण मत्सरी यशोदेनें गुणिलेच्या मुलाचा दुस्वास करावा ही गोष्ट समाजाला परिचित आहे. त्याचप्रमाणें, ज्याला आपल्या समाजांत स्थानच उरलें नाहीं, त्यानें कुठे तरी परदेशीं, कुणाच्या तरी परक्याच्या स्वार्थासाठीं, जीवित होमावें ही गोष्टहि मानसशास्त्रदृष्ट्या क्रमप्राप्तच आहे. हीं सर्व दृश्यें हिंदू समाजाला नवीन नाहींत पण तीं निवडून काढून, त्यांची सरळ सुन्दर गुम्फण करण्यानें कवीच्या ठिकाणीं असलेली तद्विषयक तळमळ व कलाभिरुचीच व्यक्त होते. खुनाचा खटला चालविण्यास आरम्भ करण्यापूर्वी, प्रत्येक न्यायकचेरींत, प्रत्येक वकील, 'नव्याण्णव खरे आरोपी सुटले तरी चालतील, परन्तु एक निर्दोषी मनुष्य फासांवर अकारण लटकला जाऊं नये' अशी कायद्याची ग्वाही असल्याची घोषणा करून, पञ्चांच्या व न्यायदेवतेच्या अन्तःकरणास पाझर फोडित असतो. परन्तु व्यवहारी जगांतला अनुभव मात्र निराळा आहे. अपराध्यांनीं तुरुङ्ग तर भरतातच : पण त्याबरोबरच निरपराधीहि भरडले जातात. एक निर्दोषी, विकासोन्मुख अङ्कुर, प्रथम समाजाच्या, नन्तर तुरुङ्गांतील अधिकाऱ्यांच्या व पुन्हा समाजाच्या पायाखालीं चुरगळूं लागला, तरी समाजाला त्याचें कांहीं वाटत नाहीं; असो. या कथा-

नकांतील गुणिलेचें वैधव्य व तिचा तद्भव असहायपणा आणि बन्दीवासामुळें सञ्जीवाचा झालेला सामाजिक कोण्डमारा, या दोन गोष्टीच इतक्या महत्त्वाच्या आहेत कीं, त्यांनींच सर्व कथानकाला रङ्ग आणलेला आहे. त्यांतहि घटनांची अल्पता व प्रसङ्गांचा विस्तार यांचें मिश्रण मनोहर व हृदयस्पर्शी झाल्यानें, कथानकाचें सौन्दर्य निःसंशय वाढलें आहे.

कथानक रङ्गवितांना क्षणाक्षणाला नवीन घटना व नवीन प्रसङ्ग निर्माण करणें किंवा नवीन पात्रांचा प्रवेश करविणें व त्याबरोबरच जुन्यांचा कत्तलखाना सुरू ठेवणें, कलाशास्त्राला सम्मत नाहीं. याच्या उलट अगदीं थोडीं पात्रें घेऊन, त्यांच्या जीवनांतील सुखदुःखांच्या प्रसङ्गांतील अगदीं सूक्ष्म देखील छटा रेखाटून, त्यांचें सहज-रम्य पर्यवसान दाखविणें, यांतच खरी कला आहे. विस्तृत जागेंत लाठीची हातसफाई पुष्कळ दाखवितील; पण अल्प जागेंत प्रभावी व्यक्तीखेरीज असलें कौशल्य कोणीहि दाखवूं शकणार नाहीं. छोट्या जागेंत टुमदार बगीचा उठविण्यास जातीवंत माळीच पाहिजे. उदाहरणादाखल नाटकांमधें कोल्हटकरांचें 'जन्मरहस्य' किंवा खाडिलकरांचें 'मानापमान' ही पुढें करतां येतील. त्या दृष्टीनें, या काव्यांतील गुणिला, सञ्जीव, वृकोदर, यशोदा, पुतळी व अगदीं एक-दोन वेळच उल्लेखिलेला राघोबल्लाळ यांचीं चित्रें सत्यसृष्टींतल्या चित्रासारखीं समर्पक वाटतात. गुणिला व सञ्जीव यांचें स्वभावरेखाटन विस्तारानें करण्यांत कवीनीं औचित्य दाखविलें आहे; आणि हेंच औचित्य, अर्धें कथानक होऊन गेल्यावर पुतळीचा प्रवेश करविण्यांत किंवा जरुरीपुरताच राघोबल्लाळाचा उल्लेख करण्यांत, त्यांना कलेचा परिपोष करण्यास उपयोगीं पडलें आहे. यामधें कवीची संयमशीलताहि दिसते. पुतळीवरील सञ्जीवाच्या प्रेमाचें पर्यवसान लक्षांत घेतां, तिला काव्यांत मिळालें एवढेंच स्थान कलादृष्टीनें योग्य आहे. अशा किती तरी गोष्टी आपल्या आयुष्यांत असतात कीं, ज्यांवर आपण आपले स्थायीभाव ठेवतों व ज्या आपली काञ्चनमृगा-

प्रमाणें भुलावण करीत करीत आपणांस दूर दूर ओढीत नेतात व शेवटीं त्या आपला मायावी बुरखा झुगारून देऊन राक्षसीस्वरूप प्रकट करतात, आणि त्यामुळें आपली अभावितपणें फसगत होते. सञ्जीव-पुतळीचें चरित्र म्हणजे याच गोष्टीचें प्रतीक आहे. राघोबल्लाळाचा उल्लेख ओझरता करण्यांत यशवन्तांनीं कित्येक अधम गुप्तपणें पण निःशङ्कपणें दुसऱ्याचा केसांनीं गळा कसा कापतात, हें चतुराईनें दाखविलें आहे; तर वृकोदरासारखे लोक, करून सवरून नामानिराळे राहून समाजांत उजळमाथ्यानें निर्लज्जपणें कसें वावरतात, हें विस्तारानें दाखवून, कलाभाग साधला आहे. राघोबल्लाळाचें दृग्दर्शन व वृकोदराचें सविस्तर दर्शन हे भाग या दृष्टीनें केलेला पोषक असेच झाले आहेत. शीलवान् माणसाची अधःपतित पण शिरजोर समाजांत चोहींकडून कुचम्बणा होते, हें गुणिला व सञ्जीव यांच्या चित्रांत वठविलेलें वाचकांना आढळेल. गुणिलेच्या वैधव्याला दुय्यम दर्जाचें महत्त्व देऊन, त्यामुळें उद्भवणाऱ्या परिस्थिति-परम्परेला महत्त्वाचें स्थान देण्यांत, यशवन्तांनीं औचित्य साधलें आहे. त्याचप्रमाणें, तिच्या स्वतांच्या मुलाविषयींचा तुसडेपणाचा भाग हा निर्दयतामूलक नसून, वैधव्यापत्तीनें संन्यस्त व संयमित बनलेल्या मनाची खरीखुरी स्थिति दर्शविणारा पण प्रेममूलक असा दाखविण्यांत, त्यांच्या स्त्रीस्वभावनिरीक्षणाची सूक्ष्मता स्पष्ट होत आहे. उपरिनिर्दिष्ट टेनिसन् कवीचें वाक्य, हिंदू समाजांतील मूल असलेल्या विधवेच्या बाबतींत, पुष्कळ ठिकाणीं खरें असल्याचें प्रत्ययास येतें; आणि म्हणूनच, हा तुसडेपणा मानसशास्त्रदृष्ट्या अगदीं यथार्थ असून हृद्य आहे. सञ्जीवाचें चित्र कांही कांही ठिकाणीं जरा भडक झालें असलें, तरी त्याची मनःसृष्टी मुलाच्या विचारसरणीला अगदीं जुळती अशीच रेखाटली गेली आहे. यशोदेला निरपत्य ठेवून सञ्जीवाच्या हेवादाव्यास हातभार लावण्याचें श्रेय ( ! ) तिच्या पदरांत टाकण्यांत व पुत्रवती गुणिलेकडून वृकोदर-यशोदा यांची कृतज्ञतापूर्वक सेवा घडविण्यांत स्त्रीस्वभावाची दुष्ट सुष्ट

अशीं दोन टोकें दाखविण्यांत आलीं आहेत. सारांश, निरनिराळया पात्रांची क्रमवारी व त्यांचें स्थान पाहिलें म्हणजे एकाद्या दरबाराची आठवण होते. राजदरबारांत राजाला उच्चासन दिलेलें असून, त्याच्यापेक्षां मानानें व अधिकारानें कमी प्रतीचे असलेले सरदार दरकदार यांस त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें स्थान दिलेलें असतें. सञ्जीवाच्या या छोटेखानी दरबारांत यशवन्तानीं त्याला उच्चासन देऊन, त्याच्याच प्रभावळींत गुणिलेला बसविलें आहे; व त्याखालीं वृकोदर, यशोदा, पुतळी, राघोबल्लाळ व प्रसङ्गोपात आलेल्या दुय्यम दर्जाच्या पात्रांना बसविलें आहे. काव्याचें पर्यवसान सहज पण करुणरम्य साधलें असून, त्यामधें प्रत्येक पात्राचें 'विसर्जन' स्वाभाविक असेंच दाखविलें आहे. कथानकांतील प्रत्येक पात्र 'जिणें नव्हे हें, बन्दिवास हा, जग हें बन्दीशाळा' हें वाक्य किती यथार्थतेनें व किती निरनिराळ्या प्रसङ्गांत म्हणतें, हें पाहिलें म्हणजे आपल्या मनांत तळमळ उत्पन्न होतेच पण तीबरोबरच कवीच्या कलाभिरुचीची व मनुष्यस्वभावज्ञानाची प्रशंसा करावीशी वाटते.

या काव्यांतील रचनासौन्दर्यहि पाहाण्यासारखें आहे. या काव्याचा आरम्भ मनोरम असून, तो सहृदयता व कारुण्य यांनीं भरलेला आहे. 'निवेदनांत' वाचकांच्या नकळत काव्याची प्रस्तावना, शारदाप्रशस्ति व 'काव्यविषय ह्यांचा त्रिवेणीसङ्गम साधला असून, त्याच्या कांठावर वाचकांस सकौतुहल उभें करण्यांत आलें आहे. प्रत्यक्ष काव्याला आरम्भ करतांना देखील गुणिलेची मागील कुळकथा अवघ्या सोळा ओळींतच साङ्गितली आहे. प्रकरणांच्या अनुक्रमावर नजर टाकल्यास त्यांची जुळणी रसपरिपोषास अनुकूल व कथानक समजण्यास सुलभ अशीच त्यांनीं केली आहे; इतकेंच नव्हे तर कथानकाचा पुढील भाग कळण्याविषयीं वाचकवर्गाची उत्कण्ठा अखेरपर्यन्त जागृत राहील इतकी ती कलात्मक करून ठेवली आहे. प्रकरणांचे शेवटहि परिणामकारक उतरले आहेत; विशेषतः

पांच, नऊ, बारा, वीस व एकवीस या प्रकरणांचे शेवट वाचकांस अस्वस्थ केल्याखेरीज रहात नाहींत. प्रत्येक प्रकरण भावना, कल्पना, घटना व शब्दयोजना यांनीं चप्खल भरलें असल्यामुळें त्याचें सौन्दर्य भरघोस मोहनमाळेप्रमाणें खुलून दिसतें. कलावन्ताची खरी करामत अपेक्षा उत्पन्न करून तिची पूर्ति करण्यांत, किंवा अगोदरच उद्भूतावस्थेंत असलेल्या अपेक्षांची पूर्ति करण्यांत विशेष असते. खरा काव्यानन्दहि अशाच ठिकाणीं निर्माण होत असतो. हें काम यशवन्तांनीं पदोपदीं केलें आहे. कथानकाच्या पर्यवसानाचीं कटु भविष्यें (पान ३०, ३७, ४४) पूर्व भागांत सुचित करण्यांत किंवा योग्य ठिकाणीं सुन्दर व बहारदार वर्णनांची योजना करण्यांत, क्वचित् मधुर पुनरुक्ति करण्यांत किंवा विस्मय अगर चमत्कार निर्माण करण्यांत, त्यांनीं नाट्यतत्त्वाचा भरपूर अङ्गिकार केला आहे. त्यांनीं केलेलीं वस्तूंचीं अगर प्रसङ्गांचीं वर्णनें कथानकाच्या अङ्गभूत असल्यानें विस्कळित वाटत नाहींत इतकेंच नव्हे तर त्यांचा त्यांनीं कथानकाच्या रसपरिपोषास व कांहीं ठिकाणीं तर पात्रांच्या स्वभावपरिपोषासहि सुन्दर उपयोग केला आहे. ‘ ऊर्वशी ’ व ‘ मोहिनी ’ यांचीं समयोचित वर्णनें करून त्यांनीं वर्णनाचें श्रेय सम्पादलें आहेच; पण त्याखेरीज त्यांनीं वृकोदराची घोर मनःसृष्टी काय होती हें सूचित करून, पुन्हा वाचकांच्या मनास बसणारा ताण “ऊर्वशी जाशि कशी सोडून” या भावगीताच्या रूपानें कमी केला आहे. प्रत्यक्षाला कल्पनीयाचा रङ्ग चढवावयाचा व कल्पनीयांतून प्रत्यक्षाची प्रतीति घडवावयाची हें कलारहस्य यशवन्तांची सव्यसाची लेखणी उत्तम जाणते.

प्रस्तुत काव्याचें आणखी एक वैशिष्ट्य बघण्यासारखें आहे. कथानकांतील पात्रांनीं कांही कांही वेळां बारीकसारीक व्यवहार व उपचार बिनचूक पाळलेले आहेत असें दिसतें व त्यामुळें आपण सत्यसृष्टींतीलच एकादें चित्र पाहतों आहों असें वाटतें. अशा वाटण्यापासून होणारी सुखसंवेदना कितीतरी आल्हाददायक असते. सरळपणामुळें विपरीतपणा उद्भ-

वावा, हें दुर्दैवच! कारण मनुष्यमात्रास अमृतांतून विष उत्पन्न होईल असें कधींहि वाटत नाहीं. गुणिलेनें वृकोदराची जी सेवा केली तीच तिचा स्वतांचा नाश करण्यास कारणीभूत झाली, हें वाचून मनाला वाईटच वाटते पण त्याबरोबरच मनुष्यस्वभाव व नियती हीं अशींच असतात हेंही पटतें. त्याचप्रमाणें आणखी एक गोष्ट पाहण्यासारखी आहे. या व्यवहारी जगांत कवीस कटु अनुभवाचे अनेक घुटके वेळोंवेळीं घ्यावे लागले आहेत, व त्यांनीं त्यांच्या मनाचा दाह केला आहे. या दाहकतेची द्योतक अशीं वचनें (उ. पा. १३०, १३१, १३४) मधून मधून त्यांनीं काव्यांत पेरलीं आहेत; तीं काव्यास तर पोषक झालीं आहेतच पण स्वतन्त्रपणें देखील वाचकांनीं तीं स्मरणांत वागविण्यासारखीं झालीं आहेत. या ठिकाणीं यशवन्तांना, डोक्यावर ऊन, पाऊस, थण्डी सहन करून, वाटसरांस फुलें, फळें व सावली देणाऱ्या वृक्षाची किंवा स्वतां जळून दुसऱ्याला प्रकाश देणाऱ्या दीपाची उपमा द्यावीशी वाटते.

यशवन्तांची सौन्दर्य-समीक्षता नमुनेदार आहे. निसर्गांत जें जें सुन्दर आहे त्यांचें त्यांना वेड आहे व त्यांशीं ते तत्काळ तन्मय होतात व त्यांतूनच प्रतिक्षणाला अन्तःकरणास पटलेलें सौन्दर्य नवकल्पनांच्या रूपानें ते पुढें माण्डतात. त्यांची रङ्गदृष्टी तर उदाहरणीय आहे. वस्तुजातांत जे निरनिराळे मनोहर रङ्ग आहेत, त्यांना कांही तरी एक हेतु आहे व त्यांचें कांही एक कार्य आहे. हें कार्य काय आहे, हें शोधून काढण्यांत त्यांची भेदक दृष्टी सदासर्वकाळ रममाण असते व सत्यसृष्टींत अनुभवावयास न मिळालेल्या अनेक सद्भावनारसाचें पान, तें निसर्गांतून किंवा कुशल चित्रकारांच्या चित्रांतून करीत असतांना दिसतात. रङ्गाच्या अगदीं सूक्ष्म छटा तर त्यांच्या दृष्टीस फारच स्पष्टपणें दिसतात व त्यांतील झलकांचे मानवी मनावर होणारे सूक्ष्म परिणाम ते नाजुक हातानें वेगवेगळे करून दाखवितात (पान ५३–५४). आधुनिक मराठी कवितेंत ही रङ्ग-दृष्टी अपूर्व आहे.

काव्याच्या अन्तरङ्गाइतकेंच त्याचें बाह्याङ्ग महत्त्वाचें असतें. अन्तरङ्गाची घडण जितकी उदात्त तितकीच बाह्याङ्गाची घडण सुबक असावी लागते. परन्तु या बाबतींत पुष्कळ कवींकडून हेळसाण्डच झालेली दिसते, व तिच्या समर्थनार्थ ते यमकप्रासालङ्कारांविषयीं झालेले वाद दाखल्यादाखल पुढे करतांना दिसतात. परन्तु तें समर्थन शुष्क होय. सौन्दर्य ही अशीच गोष्ट आहे कीं ती वादानें सिद्ध होतेच असें नाहीं. मी पुन्हा ताजमहालचेंच उदाहरण घेतों. त्याची मूळ कल्पना ज्याच्या मनांत प्रथम प्रस्फूर्त झाली, तो नुसता कल्पनेवर कल्पना चढविणारा शिल्पकार नव्हता, तर आपलें शिल्प प्रत्यक्षांत उतरवून दाखविणारा कारागीरहि होता. आपलें मनोमय स्वप्न प्रत्यक्षांत सुन्दर रीतीनें उतरविण्याची करामत जर त्याच्यामधें नसती तर त्याचें हें स्वर्गीय काव्य कल्पनेंतच विरून गेलें असतें; किंवा मूळ उदात्त सुन्दर कल्पना स्फुरूनहि प्रत्यक्षांत ती बेडौल स्वरूपांत उतरती, तर पहाणाऱ्याच्या मनांत ती भरली नसती; व मग ताजमहालाची कीर्ति अजरामर झाली नसती. सुन्दर आत्मा व सुन्दर देह हा सङ्गम केव्हाहि नमुनेदार म्हणूनच गणला जाईल. सौन्दर्यतत्व हें सर्व क्षेत्रांत, सर्व ठिकाणीं, सर्व काळीं एकच असूं शकते. तपशिलांत फरक झाल्यानें तत्वास कधींच बाध येत नाहीं. काव्याच्या बाबतींत काहींना कल्पना सुचतात, तर काहींजवळ नुसती भाषाच असते, पण यशवन्तांच्या ठिकाणीं या दोन्हींचा सुन्दर मिलाफ झाला आहे. प्रतिभेच्या अङ्गभूत असणारे सर्व गुण त्यांचेमधें एकवटले असून, परिश्रमाच्या जोरावर त्यांनीं समर्पकता, सफाई, भाषाप्रभुत्व, नवीनपणा, मोहकता, तालबद्धता, आवेश, कलात्मकता वगैरे अनेक गुणांची सञ्चणी केलेली आहे. अभिजात शब्दांचा उपयोग कोठें करावा, पौराणिक सन्दर्भ कसा घालावा, ऐतिहासिक उपमा कशी द्यावी, नवीन शब्द कुठें बनवावा हें ते उत्कृष्टपणें जाणतात. त्यांच्या प्रतिभेचा खरा विलास त्यांच्या कल्पनाशक्तींत सामावलेला आहे. आणि ती केवळ शब्दनिष्ठ



...ग्रं... ...ना.

नसून भावनेंतून उमळलेली असते. त्यांच्या प्रतिभा-विहङ्गाला कल्पना व कल्पकता ही दोन्हीहि पल्लेदार पङ्खें असून, तीं कधीं अन्तरिक्षांत, तर कधीं समुद्राच्या तळाशीं, कधीं पृथ्वीच्या गर्भांत, तर कधीं मानवी अन्तः-सृष्टींत स्वैर सञ्चार करून, तेथून आणलेली लूट शब्दस्वरूपांत सांठवून ठेवतात; इतकेंच काय पण या पङ्खांत वाचकांनाहि वाहून नेण्याची ताकद आहे. अशारीतीनें त्यांच्या प्रतिभेचा खेळ प्रेक्षणीय वाटतो. उपमादृष्टान्त देण्याची त्यांचीं वळणें जशीं विविध आहेत, त्याचप्रमाणें ती भावपूर्ण व रसपरिपोषकहि आहेत. कोणत्याहि पानावर नजर टाकली तरी या विधानाची साक्ष पटेल. आधुनिक मराठी कवींत इतकी साभिप्राय समृद्धि फारच थोड्यांच्या जवळ आढळेल.

भावगीतें लिहिण्यांत यशवन्तांचा हातखण्डा आहे हें नव्यानें साङ्गण्याची जरूरी नाहीं. पण प्रस्तुत काव्यांतील भावगीतांना कथानकाची सुन्दर पार्श्वभूमी मिळाल्यानें तीं अतिशय उठावदार झालेलीं आहेत. नाटकांत काय किंवा खण्डकाव्यांत काय, भावगीतें घालण्याच्या जागा ठरलेल्या असतात. त्या बिनचूकपणें शोधून काढण्यावर व तिथें अनुरूप भावगीतांची योजना करण्यावर भावगीतलेखनाचें यशापयश अवलम्बून असतें. कलेच्या दृष्टीनें अपेक्षा-पूर्तीचें तत्त्व तर या ठिकाणीं विशेषत्त्वानें लागू करावयाचें असतें. या दृष्टीनें बन्दीशाळेंतील सर्वच भावगीतें उत्कृष्ट उतरलीं आहेत व तीं योग्य जागीं बसविलेलीं आहेत. ऊर्वशीचेंच चित्र पहा. हें चित्र पाहिल्यावर वृकोदर त्याकडे आत्मीयतेनें पाहतो व वाचकहि त्यांत इतका तल्लीन होतो कीं, वृकोदर व पुरूरवा यांची तन्मयता त्याला पटते; त्यांत वाचक पुन्हा आपली भावना मिळवितो व अगदीं अपेक्षित जागीं तिघेहि ‘ऊर्वशी जाशि कशी सोडून’ हें गीत गुणगुणूं लागतात. गीत वाचतांना वाचक ऊर्वशीबरोबर हवेंत तरङ्गत वर वर जाऊं लागतो व त्याचें अन्तःकरण जणूं कांही स्वतःच विरही झाल्याइतकें व्याकूळ होऊं लागतें. सारङ्गी-वादन

सम्पलें तरी त्यांतील निःस्वर आलाप जसे कानांत घुमतच असतात, त्याचप्रमाणें हें भावगीत सम्पल्यावर त्यांतील स्वरभाव वाचकाच्या मनावर मूकपणें आन्दोलत असतात. गीत सम्पलें व वाचक पुढील ओळी वाचूं लागला, तरी देखील 'निर्माल्यचि मी उरतों, जातां । तूं सौगन्ध उडून' ही ओळ स्मृतीवर तरळत रहाते व ऊर्वशी निघून गेल्यावर पुरुरव्याला ज्याप्रमाणें जीवित निर्माल्यवत् वाटतें, त्याचप्रमाणें हें भावगीत सम्पल्यावर वाचकाला तो क्षण उदासवाणा वाटतो. त्याचप्रमाणें 'सञ्जिवा शोधु कुठें तुज आतां', कळया फुलांनीं हें गेलें', 'झट चाप धरी' किंवा 'वन्दन तुज मातृभूमि हें अखेरचें' हीं सर्वच भावगीतें अत्यन्त उत्कट उतरलीं आहेत. तसेंच सञ्जीवानें वास्तुदेवतेस (पान १२४) गायिलेलें गीतही हृदयस्पर्शी आहे. या भावगीतांचें हें वैशिष्ट्य आहे कीं, तीं सर्व विविध भावनादर्शक असून चालीनें देखील एक दुसऱ्याहून निराळें अशीं तीं आहेत. कलावन्त शिल्पकारानें एकादें सुन्दर कलामन्दिर बान्धतांना, त्याच्या एकविध सुन्दर भिन्तीमधें मधून मधून किञ्चित् पुढें आलेले व वर नक्षीकाम केलेले दर्शनी खाम्ब ज्याप्रमाणें दाखवावे, पण तो जसा त्या भिन्तीचाच एक अङ्गभूत भाग असावा, त्याप्रमाणेंच या काव्यांतील भावगीतांचा प्रकार आहे. ही सहा भावगीतें म्हणजे या काव्यमन्दिराचे सहा खाम्ब असून, त्यावर यशवन्तकवींनीं आपल्या कलाकुसरीच्या परिश्रमाची परमावधि केलेली दिसते. 'ऊर्वशीगीत' उदास-कोमल आहे, तर 'सञ्जीव गीत' करुणवत्सल आहे; 'कळया फुलांचें गीत' ऐन तरुणाच्या भावनेस शोभेसें ललितोन्मत्त आहे, तर 'झट चाप धरी' हें निराशनिर्वाणीचें आहे. शेवटचें 'मायभूमिवन्दन' हें भावगीत सर्वोत्तम असून करुणोदात्त आहे. याखेरीज, या भावगीतांच्या रचनासौन्दर्याचा आणखी एक भाग विशद करून साङ्गणें जरूरीचें आहे. भावगीतांत पालुपदास अतिशय महत्त्व असत. पालुपद बेमालूम साधणें, हा

कवीच्या प्रतिभेचा, तितकाच करामतीचा खेळ आहे. पालुपदांत भावगीताची मध्यवर्ती कल्पना सांठविलेली असते व वाचक प्रत्येक कडव्याकडव्यांतून त्याच्यापासून जरी दूर दूर गेला, तरी त्याला प्रत्येक कडव्याचे शेवटीं परत आंपल्याकडे ओढून आणण्याची स्वरचुम्बकता त्याच्यामधें असते. पालुपदानन्तर येणारें प्रत्येक कडवें वाचकाच्या मनांत रस भरीत असतें व वाचक ओळीओळींतून जों जों दूर जातों तों तों वाचकाची पालुपदाविषयींची उत्कण्ठा वाढत जाते; कडव्याच्या शेवटच्या ओळींत ती परमोत्कट होते, तोंच पालुपद येतें व वाचकांस अननुभूत आनन्द होतो. प्रत्येक कडवें किती लाम्बीचें असावें, याविषयीं कवीला बन्धन घालतां येणार नाहीं; तरी पण वाचकाच्या मनांत पालुपदाकडे धाव घेण्याची अत्युत्कटता उत्पन्न करण्याइतक्या समर्पक लाम्बीचें तें असावें, असें साङ्गतां येईल. त्याचप्रमाणें कडव्यांतील शेवटली ओळ पालुपदाशीं अर्थानें व यमकानें अगदीं जुळती अशीच असावयास पाहिजे. त्यांतहि ओळींतील मध्यवर्ती कल्पना यमकाच्याच शब्दांत जर सामावलेली असली तर बहारच. कारण त्यानें वाचकाची जिज्ञासा शेवटपर्यंत अतृप्त राहते व शेवटीं तिला मध्यवर्ती कल्पना, यमक व पालुपद या सर्वांचा एकसमयावच्छेदेंकरून लाभ होतो, आणि मग वाचकाच्या आनन्दाला पारावार रहात नाहीं. वाचकांनीं यशवन्त यांची भावगीतें या दृष्टीनें तपासून पहावींत, म्हणजे तीं पूर्ण यशस्वी आहेत, असेंच दिसेल. या बाबतींत आधुनिक कवींत त्यांच्या खेरीज प्रथित यश असें फक्त माधव जूलियन् हेच आहेत.

खरें काव्यसौन्दर्य तेंच कीं जें काव्य वाचून झाल्यावरहि, किती तरी काळपर्यन्त वाचकाच्या मनावर तरळत राहत असतें. मागें रेङ्गाळत राहिलेल्या या सौंदर्यांत एक प्रकारची गोडी असते. उत्कृष्ट खाद्य-पेयाची लज्जत जशी जिभेवर, तशीच काव्यानन्दाची मोहिनी स्मृतीवर खेळत असते. दुष्यन्तासमवेत नाखुषीनें परत निघालेली शकुन्तला, पायांत दर्भाङ्कुर

रुतल्याच्या निमित्तानें रेङ्गाळून जेव्हां त्याचेकडे सानुराग दृष्टिक्षेप करते तेव्हां ती त्याला अधिकच मोहक वाटते. रसिक व उत्कृष्ट कविता यांचा अन्योन्य सम्बन्धही अशाच स्वरूपाचा आहे. वाचन सम्पलें तरी तींमधील सौन्दर्य वाचकाच्या मनावरील आपली पकड सोडीतच नाहीं. ही पकड जेव्हढी दीर्घकाळ टिकणारी तेवढें कवीचें मोठेपण अधिक. जीवनांतील निरनिराळ्या प्रसङ्गीं त्यांतील कितीतरी ओळी आपण स्वसमर्थनार्थ किंवा स्वसमाधानासाठीं उद्‌धृत करतों व पुनःपुन्हा कवीच्या अनुभवाशीं समरस होतो. कवीच्या अनुभवाचा सखोलपणा जितका जास्त तितकें त्याच्या वचनाचें तेज अधिक. या दृष्टीनें गुणिलेचें मातृवात्सल्य, पुतळीचें मस्त सौन्दर्य, वृकोदराची व्याकुळता, दैवाचें शरसन्धान, सञ्जीवाची तडफड, त्याचें परदेशगमन व विशेषतः शेवटचें विसर्जन हीं संस्मरणीय आहेत. या व एतद्‌सदृश प्रसङ्गांतील स्वारस्य वाचकांच्या स्मृतिपटलावर दीर्घ काळ-पावेतों खास तरळत राहील; आणि तत्सदृश परिस्थितींत वावरतांना काव्यांतील सुभाषितें जिह्वेवर येतील.

काव्यमीमांसा सोडली तर शिक्षणशास्त्रज्ञांनाही या काव्यांत कांहीं वाचनीय मजकूर (पानें ५९ ते ६१ व ७५) आढळेल. चुकते कोणाचें—मुलांचें, पालकांचें कीं शिक्षणपद्धतीचें याही विचाराला चालना देण्यासारखाच तो मजकूर आहे. बन्दीशाळेंतील कारखान्यांतून निघणाऱ्या "नीरव उद्यमगीता"ची कल्पनाही अभिनव व उद्‌बोधक आहे.

व्यवहारी जगांतील बन्दीशाळेंत असङ्ख्य दोष आहेत, हें जरी कवि यशवन्त यांनीं दाखविलें असलें तरी त्यांच्या या बन्दीशाळेंत ते अत्यल्प आहेत, हे त्यांना साङ्गतांना मनाला समाधान वाटतें. यशवन्तराव माझे आज एक तपावरचे स्नेही आहेत. स्नेह प्रेमान्ध असतो, पण ही परम्परा रविकिरणमण्डळाच्या सदस्यांनीं पाळलेली नाहीं. 'रसग्रहणा'च्या भागांत, अत्यल्प असलें तरी दोषदर्शन कशाला, या कल्पनेनेंच केवळ त्यास इथें

स्थान दिलें नाहीं. शिवाय ‘ रसग्रहण ’ लाम्बेल हीहि भीति होतीच. त्या भीतीमुळें हातार्शीं काढून ठेवलेलीं प्रस्तुत काव्यांतील अवतरणें सुध्दां या ठिकाणीं समाविष्ट करतां आलीं नाहींत.

प्रस्तुत ‘रसग्रहण’ कोणाला गुळाच्या नैवेद्यासारखें वाटण्याचा सम्भव आहे. तें तसें असलें, तर हा प्रसङ्ग स्वतांवर ओढून आणण्याचा दोष माझा आहे, यशवन्तरावांचा नाहीं; उलट ते मात्र आधुनिकांत ‘ कविः कवीनाम् ’ आहेत, हें साङ्गणें जरूर आहे. त्यांनीं अल्पावधींत मिळविलेल्या यशाबद्दल साभिमान आनन्द वाटतो व ‘ आधुनिक कवींची कविता ही लवकरच येणाऱ्या महाकवीचीं पूर्वचिन्हें आहेत,’ असें कोणी म्हटल्यास, माझे डोळे आशावादीपणानें त्यांचेकडे वळतात.

अनन्तचतुर्दशी, १८५४
ता. १३ सप्टेम्बर १९३२
फलटण (जि. सातारा)

गिरीश

The tender flower that lifts its head, elate,
Helpless must fall before the blasts of fate,
Sunk on the earth, defaced its lovely form,
Unless your shelter ward the impending storm.

— *Burns*

६६०२
स नं. ९००६
ता. ३०।९।७३

# निवेदन

‘ महन्मङ्गले ! तुझ्या आणिलें पूजेला नव फूल
तुझिया आशीर्वचनें सदये होवो कधिं न मळूल.’

मनोमन्दिरीं कुणी यापरी सरस्वतीला बाही
आणि इन्द्रियें तन्मय त्याचीं झाली होती दाही
हालहवालीकडे जगांतिल कुठलें त्या अवधान
ध्यानधारणीं विलीन झालें अवघें ज्याचें भान
उघड्या डोळां पाही वातायनांतुनी जरि सृष्टी
बिम्ब तियेचें वरवर पडलें परि नेत्रांच्या पृष्ठीं
बाह्य सृष्टिचा ठसा अन्तरीं पुसटहि पडला नव्हता
मनोमन्दिरीं प्रदेश त्याच्या रङ्गुनि राही सवता
वसन्तवैभवविलास तेथें कायमचा फुललेला
वृक्षलतांच्या छत्र-चामरीं महाल तो खुललेला
सिंहासनसम शिलाखण्ड त्यामध्यें शोभलें भव्य
महन्मङ्गला प्रसन्ननयना त्यावर देवी दिव्य
सुधाकराची देहीं कान्ती, छटा उषेची मधुन
प्रभा फाकली नव रत्नांची, गेलें वन धवळून
नूपुरसिञ्जित मञ्जुल पसरे हलता मङ्गलचरण
वीणेचा झङ्कार नादतो फिरता मृदु कर वरुन
तरङ्ग त्याचे सभोंवारच्या सरोवरावर उठती
डुलतीं कमलें, भृङ्ग गुञ्जना करीत हिण्डत सुटती

कमलांतुन खालती गळे तो मरन्द सेवी हंस
दिसे मनोहर मान तयाची कीं कलगी, अवतंस
आहुनि तो घनवैभवशाली मोर स्वागता नाचू
पसरुन अपुला भव्य पिसारा ज्यांत बसविल्या पाचू
मनोमन्दिरीं अशा स्वरूपीं सरस्वतीला पाही
आणि तियेला दास तियेचा सहजोद्गारें बाही — २६

' महन्मङ्गले ! तुझ्या आणिलें पूजेला नव फूल
तुझिया आशीर्वचनें सदये होवो कधिं न मळूल.
रानफुलें तुज कुणी वाहिलीं, कुणी फुलें बकुळीचीं,
न मोगऱ्याचीं केवळ, कोणी साधीं विविध कुळींचीं
भाविकतेनें चतुराईनें कोणी मालाकार
फूलपाकळी अथवा गुम्फुन तुला अर्पिती हार
त्यांच्या त्या निर्माल्यसङ्ग्रहा जनता घेई माथां
ती पुण्याई येइल मज का साता जन्मीं हाता ?
नसो तेवढी मज पुण्याई परि त्या निर्माल्याला —
पदरीं बान्धुन त्या शुचितेचा वेष असा मी ल्याला
तुझा पुजारी बनलों, फिरलों, फिरलों रानोमाळ
जमवायाला फुल, वहाया चरणावरती माळ.
कुणास नन्दनवनासारख्या सांपडती फुलबागा
मजसाठीं राखिलीं विधीनें होती भलती जागा
सौगन्धाचीं सौन्दर्याचीं सकलांना उद्यानें
मला अकल्पित कर्मगतीनें लाभे हें हृद्यानें

विषण्ण होतें मानस बघतां विचित्र ही फुलबाग
आल्यागेल्या जनांस इथल्या दिसे फुलावर डाग
डागळलेल्या कुसुमांची या रोज नोन्दणी करतां
बिजलीच्या चमकेसम काटा ये सर्वाङ्गावरता
हीच कलङ्कित परन्तु कुसुमें ओढ लाविती चित्ता
आणि तुझ्या पूजना आणिलें एक तयांतिल आतां
'डागळलेलीं फुलें' म्हणोनी जनता मुरडो नाक
'डागळलेलें फूल' म्हणोनी तूं न दूर हें टाक
डागळलेल्या अनेकांतलें असलें जरि हें एक
पुनीत करुनी न काय घेइल तुझ्या कृपेचा सेक ?
'डागळलेलें ! डागळलेलें !' म्हणती जे जे लोक
हृदयपटावर दिसे तयांच्या तसूतसूवर भोंक
न्यायमन्दिरीं छिद्रान्वेषण जोंवर झालें नाहीं
वावरतांना कृत पापांची दरकार न त्यां कांहीं
हाय ! हाय ! परि निरपराधिही कितीक ठरती दोषी
आणि तयांना हे अपराधी निन्दिति वदुनी 'दोषी'
अशा जगानें 'डागळलेलें फूल' म्हणोनी म्हटलें
निन्दावच ते पडतां कानीं हृदयीं धागे तुटले
डागळलेल्या या सुमनांचा कोण जगीं कैवारी ?
डागळलेल्या या सुमनांवर कोण शिम्पतो वारी ?
डागळलेलें कुसुम देवते तुला वाहतों आतां
माथां जर घेतलेंस नच तर कोण अशांना त्राता ?' ६४

कमलांतुन खालती गळे तो मरन्द सेवी हंस
दिसे मनोहर मान तयाची कीं कलगी, अवतंस
पाहुनि ती वनवैभवराशी मोर लागला नाचूं
पसरुन अपुला भव्य पिसारा ज्यांत बसविल्या पाचू
मनोमन्दिरीं अशा स्वरूपीं सरस्वतीला पाही
आणि तियेला दास तियेचा सहजोद्गारें बाही — २६

' महन्मङ्गले! तुझ्या आणिलें पूजेला नव फूल
तुझिया आशीर्वचनें सदये होवो कधिं न मलूल.
रानफुलें तुज कुणी वाहिलीं, कुणी फुलें वकुळीचीं,
न मोगऱ्याचीं केवळ, कोणी साधीं विविध कुळींचीं
भाविकतेनें चतुराईनें कोणी मालाकार
फूलपाकळी अथवा गुम्फुन तुला अर्पिती हार
त्यांच्या त्या निर्माल्यसङ्ग्रहा जनता घेई माथां
ती पुण्याई येइल मज का साता जन्मीं हाता ?
नसो तेवढी मज पुण्याई परि त्या निर्माल्याला —
पदरीं बान्धुन त्या शुचितेचा वेष असा मी ल्याला
तुझा पुजारी बनलों, फिरलों, फिरलों रानोमाळ
जमवायाला फुल, वहाया चरणावरती माळ.
कुणास नन्दनवनासारख्या सांपडती फुलबागा
मजसाठीं राखिलीं विधीनें होती भलती जागा
सौगन्धाचीं सौन्दर्याचीं सकलांना उद्यानें
मला अकल्पित कर्मगतीनें लाभे हें डुद्यानें

विषण्ण होतें मानस बघतां विचित्र ही फुलबाग
आल्यागेल्या जनांस इथल्या दिसे फुलावर डाग
डागळलेल्या कुसुमांची या रोज नोन्दणी करतां
बिजलीच्या चमकेसम काटा ये सर्वाङ्गावरता
हीच कलङ्कित परन्तु कुसुमें ओढ लाविती चित्ता
आणि तुझ्या पूजना आणिलें एक तयांतिल आतां
'डागळलेलीं फुलें' म्हणोनी जनता मुरडो नाक
'डागळलेलें फूल' म्हणोनी तूं न दूर हें टाक
डागळलेल्या अनेकांतलें असलें जरि हें एक
पुनीत करुनी न काय घेइल तुझ्या कृपेचा सेक ?
'डागळलेलें ! डागळलेलें !' म्हणती जे जे लोक
हृदयपटावर दिसे तयांच्या तसूतसूवर भोंक
न्यायमन्दिरीं छिद्रान्वेषण जोंवर झालें नाहीं
वावरतांना कृत पापांची दरकार न त्यां कांहीं
हाय ! हाय ! परि निरपराधिही कितीक ठरती दोषी
आणि तयांना हे अपराधी निन्दिति वदुनी 'दोषी'
अशा जगानें 'डागळलेलें फूल' म्हणोनी म्हटलें
निन्दावच ते पडतां कानीं हृदयीं धागे तुटले
डागळलेल्या या सुमनांचा कोण जगीं कैवारी ?
डागळलेल्या या सुमनांवर कोण शिम्पतो वारी ?
डागळलेलें कुसुम देवते तुला वाहतों आतां
माथां जर घेतलेंस नच तर कोण अशांना त्राता ?' ६४

# बन्दीशाळा

झाली नव्हती अजुनि तियेच्या वयास वरुषें तीस
तारुण्याच्या मोहकतेचें झडलें नव्हतें पीस
मृगशावकसा बाळ तियेचा शैशवांत सञ्जीव
वृद्ध तयाचा पिता म्हणे ' मम जर्जर मन रञ्जीव '
नव्हे वयानें परि विपदेनें खङ्गुन तो गेलेला
नच ओठीं संसारसुखाचा तया मिळाला पेला
कोसळणाऱ्या आपत्तींशीं टक्कर देतां देतां
होइ सदा पाडाव तयाचा, काळ जहाला जेता.
' जिणें नव्हे हें, बन्दिवास हा, जग हें बन्दीशाळा '
वदे कैकदां हृदीं भडकतां वैतागाच्या ज्वाळा
पाठपुरावा करतो जेवीं दुखावलेला व्याळ
म्हणे काय कीं गतजन्मींचा सूड उगवितो काळ
कत्तल केली काळानें तों निवर्तली तद्भार्या
घरास आली विपिनावस्था कुणी न पाणी द्याया
पहिलीचें पद घेई गुणिला, स्थीरस्थावर झालें;
सञ्जीवानें हृदय तयाचें जीवविलें, मन धालें. १६

तारुण्याच्या मोहकतेचा उसळत होता फेस
दूरच होती अजुन तियेच्या पोक्तपणाची वेस.

नयनीं पाणी, लाडिक वाणी, सौन्दर्याची खाणी,
श्यामाराणी, तिला म्हणोनी जनता बहु वाखाणी.
सञ्जीवाचा पिता प्रभाकर कारकून कङ्गाल
कुबेरसम सम्पदा तया परि गुणिला आणिक बाळ
मोडकळीला घर आलेलें परन्तु डागडुजीनें —
उभें ठेविलें होतें, त्याचें धैर्य जेविं गुणिलेनें.
बागबगीचा कुठुन फुलावा तत्सदना भोंताली ?
प्रतिदिन ताजा तया मिळे परि गुलाब गुणिला-गालीं.
असावयाचे गरीब-गेहीं कोठुन हीरक मोती ?
परि गुणिलेच्या नयनसम्पुटीं शतकोटींच्या दीप्ती.
गरीब साधा कसा प्रभाकर पाळिल राघू मैना ?
सर्व काय तें गमेच गुणिला परन्तु त्याच्या नयना.
तेल शिम्पभर घरीं न ज्याच्या, दिव्यांत कोठुन विजली ?
बिजलीसम परि तयास गुणिला गमली, लवली, सजली.
दैवाच्या प्रखरतेंत होई आग जधीं अङ्गाची
तया चन्दनी उटीच सीतळ मिठी गमे गुणिलेची.
शिशिर तीव्रतर अथवा येतां गारठून तो जाई
सुखोष्ण परिरम्भणीं तयाला परन्तु गुणिला घेई.
ह्याच गुणांनीं गुणिलेच्या मग अमूप त्यास हुरूप
सजे वदाया ‘ दैवा दाखिव खुशाल भेसुर रूप ’
असेल तें ती सजवुन घेई, उणीव भासुन नेदी.
आनन्दी, मोकळ्या मनाची, सकलांचें मन वेधी.
ह्याच गुणांनीं शोभा आली गरीबिच्या संसारा
सहन करूं लागला प्रभाकर दुर्दैवाचा मारा. ४२

परन्तु लागे हात धुवोनी दैवच त्याच्या पाठीं
त्या चुकवाया करील पामर कुठवर आटाआटी ?
करावयाची पारध म्हणुनी योजियल्या दैवानें
धुण्डित येतें कितीहि तुडवा डोङ्गर गुम्फा रानें.
दत्त म्हणोनी उभें राहि तें जिथें जिथें मग जाल
गुरफटतो मग जीव न शकतो तोडाया जञ्जाल
अखेर झाली ! प्रभा एक दिनिं आला परत घरास
आणि घातलें आन्थरूण तों झालें तेंच मिरास !
भरला अङ्गीं ताप एकदां हटे न उपचारांनीं
जिथें उलटलें दैवच तेथें काय करील युनानी ?
गुणिलेच्याही धैर्यानें मग सोडियला जरि ठाव
सेवा करुनी अविश्रान्त ती तो न दाखवी भाव.
प्रभाकराचे धनी वृकोदर वकील वरचेवरती
येउन घेती शोध, दिलासा देती, मदतहि करती.
कृतज्ञतेनें प्रभाकराचा येई कण्ठ भरून
वदे वृकोदरपन्तातें 'हें कसें फेडुं मी ऋण ?'
'नका प्रभाकर कष्टी होऊ' 'अतां न मी जगणार;—
गुणिलेचा ह्या सञ्जीवाचा अतां तुम्हावर भार !'
धन्यास बोलुन इतुकें गाळी अश्रू पति गुणिलेचा
तिचा ढासळे पुराच किल्ला मुळचा लेचापेचा. ६२

मावळतीला जाउं लागला हळूहळू मार्तण्ड
प्रभाकराचे पडूं लागले हातपायही थण्ड.

सन्ध्येचाही प्रकाश सरला, पसरूं लागे रजनी;
नैराश्याची तीव्र तमिस्रा भरूं लागली सदनीं.
तुळशीपाशीं देवापाशीं सान्जवात लावाया
पतिशेजेपासून उठोनी गुणिला लागे जाया
घरीं शान्तता भयाण पाहुन गोन्धळून जाऊन
सञ्जीवहि जावया उठे तों आईच्या मागून
सान्जवात लावून माय सुत आले देवापाशीं
स्तोत्र म्हणाया – म्हणे बाळ जें आई सांगे त्यासी.– ७२

शुभं करोति कल्याणम् आरोग्यम् धनसम्पदा
शत्रुबुद्धिविनाशाय दीपज्योति नमोस्तुते।
दिव्या, दिव्या दीपत्कार
कानीं कुण्डल मोतीहार
दिव्याला देखुन नमस्कार.
तिळाचें तेल कापसाची वात
दिवा जळो मध्याह्नरात
घरांतली इडापिडो बाहेर जावो
बाहेरची लक्ष्मी घरांत येवो
घरच्या धन्याला उदंड औक्ष येवो.

'औक्ष येवु घरधन्यास' गुणिला–सञ्जीवाची विनति
आयकिली कां देवाजीनें ?–गुणिले बघ जा स्वपति.
हळदकुङ्कु वाहून देविला लावी निटिलीं गुणिला;—
थाम्ब जरा परि गुणिले ! बघुनी ये जा अपुल्या पतिला.

झुळुक वायुची येउन विझल्या अवघ्या दीपज्योती
अन्धकार !–तों प्रभाकराची विझली प्राणज्योती.
हम्बरडा फोडिला गायिनें पाहुन निश्चल कान्त
गोन्धळलेल्या सञ्जीवानें माण्डियला आकान्त
तोंच वृकोदरपन्त धावले लोक आणखी कांहीं
गुणिला मूर्छित; — तिजला पुढचा प्रकार दिसला नाहीं ८२.

---

कोन्दटला काळोख भयङ्कर गुणिलेच्या संसारीं
वावरून ती गेली पुरती, काय करील बिचारी !
प्रचण्ड येउनि पूर त्यामधीं गवसे जेवि कण्हेरी,
अग्निप्रळयीं कीं सांपडते लहान सुन्दर नगरी,
अफाट जलधी भंवतीं, बेटावरी एकली नार,
क्षुब्ध सागरीं शिळा खातसे कीं लाटांचा मार,
भयाण झालें जग गुणिलेला तेवी पतिवाचून,
वाटे तिजला करावयाचें काय अतां वाचून ?
बाळपणींची अल्लड बाला खेळीं-मेळीं हसली
आणि दरिद्री संसारांतहि नाहिं कधीं हिरमुसली.
परन्तु आतां सर्व बाजुंनीं असा पेटला वणवा
घेरियलेल्या त्या हरिणीला नुरलें जळ वा तण वा
जिणें नव्हे हें बन्दिवास हा, जग हें बन्दीशाळा
निज नाथाच्या उद्धाराचा आला तिज पडताळा
शोकावेगें कितीकदां ती उठे द्यावया जीव
ऐकुं येइ तों हाक मारि जणुं कोठुन तरि सञ्जीव
असह्य दुक्खें जीव द्यावया उदार मन झालेलें
सञ्जीवाच्या हाकेसरशी होई विरघळलेलें
गळ्यांत घालुनि गळा मुलाच्या रडुं लागे मग गुणिला
दों हृदयींचा शोक अनावर जणूं जातसे गुणिला. १०२

पुरा कफल्लक पती प्रभाकर जातां, धनको आले
मावळतां दिनमणी उसळतें काळोखाचें काळें !
साङ्गत ये सञ्जीव परत कीं वकील कोठें गेले
धनकोनीं गृहिं होतें नव्हतें सकल धुवुन तें नेलें
त्या दिवशीं तेव्हढेच नव्हते वकील गांवीं बघुनी
धरणें धरलें कसें खलांनीं वदली गुणिला स्वमनीं
तदनन्तर परि धीर द्यावया पन्त न चुकविति फिरती
आया-बाया येतां जातां तिचें सान्तवन करती.

दिवसामागुन दिवस चालले, सृष्टी वदले नूर
नच ओसरता कसा रहावा तरि शोकाचा पूर ?
दिवसामागुन दिवस चालले, बोथट होई धार;
हळूहळू लागतो विराया दुक्खाचा अन्धार.
दिवसामागुन दिवस चालले, गढूळ निवळे पाणी.
सुधाकुम्भ घेऊन चालल्या काळच गरुडावाणी !
कुम्भांतिल त्या थेम्ब ठिबकती आणि धरित्रींवरती
नव जीवन जणु दुक्खहतांना हळूहळू ते देती.
व्याधींच्या वेदना हृदयिंच्या शमवायातें कोणी
प्रभावशाली अन्य न धन्वन्तरि काळावाचोनी !

दुखण्यामाजी प्रभाकरातें दिधला स्मरुनी दील
गुणिला-सञ्जीवातें न्याया आले पन्त वकील.
जागरूक कां वकील असतो इतुका वचनासाठीं ?
दयाशीलता इतुकी असते कां वकिलाच्या पोटीं ?

तिकडच्यावरी इतुकी होती पन्तांची प्रीती का ?
मनांत उठल्या आणि निमाल्या गुणिलेच्या या शङ्का.
स्मरुनि तयाशीं निज नाथाचें स्वामी-सेवक-नातें
दुखण्यामधलें स्मरुनी त्यांचे सहाय्य सढळहि हातें
तिला वृकोदरपन्ताचा वच अमान्य का करवेल ?
कुठें तरी घेतेच आसरा ढासळलेली वेल !
कसेसेंच परि तिला जहालें जातां त्यांच्या सदनीं
गरीब परि सत्वधीर होतें मानस तीचें मानी.
मानवेल का मनास मानी आश्रित होणें ऐसें ?
निराश्रिता परि विधवेचें या जगांत निभणें कैसें ?
तथापि मानीपणा मनींचा कृतज्ञतेनें लवला.
मिन्धेपण शिकविते स्वताचा बाणा सोडायाला !
वदे एक मन जरी ‘ नको हा नकोच परगृहवास ’
वदे दुजें मन ‘ परक्यासम का मानितेस पन्तास ?
पोटासाठीं कोणाचे तरि कष्टच उपसायाचे
झालें कीं मग — आपण उपसूं तेच घरीं पन्ताचे’
यापरि झाली तिच्या अन्तरीं भवति-न-भवती फार
आणि शेवटीं जरि न लागला एक पुरा निर्धार
आणि आंतुनी स्वभाव मानी देतहि होता त्रास
स्वीकारी परि एक दिनीं ती पन्त-कृपाछत्रास १४४

न व्हती गुणिला सुशिक्षिता, मग तीच्या वैधव्याची—
अभूतपूर्वा दिनचर्या का समाजांत व्हायाची ?

अनन्त पडल्या खितपत जैशा समाजांत या विधवा
झाली भरती त्यांत एक ही— पुरी पारखी विभवा.
करूं लागली वृकोदराच्या घरांत ती घरधन्दा
देउं लागली निज सौजन्यें यशोदेस आनन्दा.
करी सडा-सम्मार्जन उठुनी भल्या पहाटे रोज
वृकोदरांनीं प्रसन्न व्हावें तिची देखुनी ओज.
पेटत घालुन चुलीस, ठेवी तापवून ती पाणी
पन्त वृकोदर तिची दक्षता अचूक मग वाखाणी.
करी चहा ती, आणि यशोदा ठेवी पन्तापुढतीं
' और चहाची लज्जत या ' मग वकील सस्मित म्हणती
धोतर ठेवी निऱ्या करोनी, स्नाना देई पाणी
वितळूं लागे आणि तियेचें मानीपण, जणुं लोणी.
सुग्रण गुणिला स्वयम्पाक करि निर्मळ साधा गोड
' पक्वान्नेंही फिकीं यापुढें ' म्हणत उठविती झोड
' हातांची ही महती सारी, रुचीच जणुं ते स्रवती '
कधीं कधीं इतुकीहि धिटाई पन्त कराया सजती.
तिज न रुचे परि अशी प्रशंसा करिती जेव्हा पन्त
वाटुं लागली यशोदेसही चित्तीं किञ्चित खन्त.
येतां ध्यानीं आणि यशोदाभाळीं देखुन आठी
समजाविति ते कीं ' परकेपण तिचें जावयासाठीं
अशी स्तुती लागते कराया, हें न कळे कां तुजला ?
खुळी कोठली !'— ठसा कशाचा तिच्या कपोलीं खुलला ? १६८

वैराग्यांतिल कर्मकाण्ड तें आचरतांना गुणिला
नच घडलें कीं कधीं कुणाचा शब्द तिनें अवगणिला.
जेवि टवटवी पालवींस दे पाणी शिम्पुन माळी,
अरुण उमलवी पुष्पदलांना जैसा प्रातःकाळीं,
तैसें स्थिरचर जें जें येई गुणिलेच्या क्षितिजांत
करी आपुल्या स्वभाव-सुलभ-प्रसन्नतेनें स्नात.
घरीं अङ्गणीं प्रसन्नतेचें पडतें भासे ऊन;
सूर्यासम ती गुणिला कण्ठी तेथें आयु तपून.
सञ्चरतांना प्रसन्नतेच्या ऐशा वातावरणीं
उच्छृङ्खल उत्फुल्ल पन्त निज होती अन्तःकरणीं.
पाठमोरि कधिं कार्यास्तव वा असता ती अङ्गवला
पन्त निरखिती प्रमाणसुन्दर मृदुल तिचा अङ्गवळा.
कधीं अङ्गलग घडे तयांची कार्यीं असता चूर
लगबग व्हावें परस्परांनीं परन्तु बुजुनी दूर
दूर होउनी अप्रियतेची गुणिला रोखी दृष्टी
शरमुनि जावें वृकोदरांनीं व्हावें स्वमनीं कष्टी.
आणि मनांतुनि किल्मिष तीच्या नष्ट व्हावया पार,
अदबशीर मग पन्त ठेविती दिनभर निज आचार.
क्षणीं अन्य परि दावी गुणिला जणुं कांहींच न घडलें;
शान्त मनानें करि घरधन्दा, होइ न मन गडबडलें. १८८

दिवस सम्पुनी अशा रीतिनें रात्र मात्र येतां ती
परवशतेच्या अप्रियतेच्या कांचु लागती तांती.
निरोप देई दिव्यास ती, क्षणिं जाई ज्योत विझून
गूल लाल परि उरे तिथें, कीं विगतात्म्याची खूण.
पळार्धांत परि काळोखाच्या पोटीं जाई तोही
अविच्छिन्न काळोख दाटुनी पोकळींत मग राही.
चार भिन्तिनीं जरी वेष्टिली लहान तीची खोली
वाटे तिज कीं पडले डोहीं कळे न ज्याची खोली.
काळोखाचा अथाङ्ग सागर अफाट भरला वाटे
अनाद्यनन्तचि काळाचें कीं मूर्तरूप तें थाटे.
काळोखांतच तिच्या मनाला क्षण वाटावें हलकें,
क्षणीं दुज्या परि कम्पित व्हावें छिन्न तिच्या हृत्फलकें.
आणि पोटिशीं सञ्जीवातें घेउन पहुडे शयनीं
कितीक घटका तिनें पडावें तसेंच उघड्यां नयनीं
तयास घेई पदराखालीं, कळीस जैशी वेल,
दीपकळी कीं रक्षितसे जणुं पदराआड विलोल,
कळवितसे जणु निजान्तरींच्या कळकळिच्या सन्देशा,
सन्देशाचा कुणासही कीं येउं नये अन्देशा!
मुक्या जिवाला कथावयाची मुकीच अपुली आशा
तरी तियेला हवी कशाला व्यवहाराची भाषा?
हृत्कोषांतुन भावार्थाचे उमटतात जे शब्द
लिपीवाचुनी वाचूं शकतो जीव दुजा विश्रब्ध.
कोमलदलसम्पुटीं घेउनी निजे कमलिनी भृङ्गा
मुकीच भाषा भावनिवेदनिं; लिपी कोठली साङ्गा?

आत्ममनोगत-निवेदनाची अलेख्य नीरव भाषा
वालार्काची कळून घेती सुमनें का न विकासा?
गळ्यांत घालुन गळा झोपते गाय वासरू जेव्हां
अङ्ग हुङ्गुनी अङ्ग चाटणें हृदयनिवेदन तेव्हां.
कृत्रिमतेचा मनास जडला मनुजाच्या हव्यास
अवतरले संशोधक भूवरि कुणी लिपीचे व्यास.
संस्कार न त्या जरिहि लिपीचा सञ्जीवाला घडला,
मुक्या मनाचा भावनिवेदन-मार्ग कुठें परि अडला?
पडुन दडपणें तिच्या हृदयिंचे कितीक पडदे दबले
मूक सुरांचे नाद तयांतुन बाहेरी प्रस्फुटले
चालत होते एकसारखे तिचे श्वासनिश्वास
हृत्सङ्गीता स्वरलेखन तें, न कळे जरि विश्वास. २२४

म्हणे मनाशीं "असा कण्ठणें कुठवर अजुनी काळ?
कोण विमोचन करील माझें तुमच्यावाचुन बाळ?
तुमच्यावाचुन विसम्बणें मी बाळा कोणावरती?
उद्धारास्तव तुम्हीच आतां राया येणें पुढतीं.
परवशतेच्या पङ्कामाजी रुतली दुबळी गाय,
अपमानास्पद परिस्थितीच्या पाशामाजीं माय.
ज्या गाईच्या पयःप्राशनीं पुष्ट जाहला बाळ
फेडाया ऋण दावाल न का कृतज्ञता अळुमाळ?
रोज तुम्ही निःशङ्क झोपला ज्या या पदराखालीं
चाळण त्याची होउन लज्जा बाहेरी जर आली

तुम्हींच ती झाकणें दावुनी अद्भुत निज पुरुषार्थ;
स्वता होउनी जन्मदेसही करणें कां न कृतार्थ?
उमाळ्यावरी बालभानु तो उफाळुनी येऊन
काळोखाचें करी निवारण फाकुन अपुलें ऊन
तसेंच वाळा लगबग आतां पुढती सरसावून
भोंवतिचें जञ्जाल झणीं टाकाल कधीं तोडून?
पुरे पुरे ही झाली आतां झोप बाळ सञ्जीव!
करा त्वरा लङ्घून जावया बाल्याची ही शींव" २४२

भडभडुनी तों येउन पोटीं, डबडबलेंही नयन
सुरूं जाहलें त्याच दिशेनें फिरुन विचारभ्रमण—
" नव्हतें ठावें तेंच कपाळीं आलें माझ्या देवा!
श्रीमन्तांनीं केला माझ्या गरीबिचाही हेवा.
लढणारे खम्बीर शिपाई ते होते जोंवरतीं,
अभङ्ग त्यांची ढाल जोंवरी होती माझ्या भंवती,
चान्दविबीसम झुन्जविला मी संसाराचा किल्ला
दाद दिली नच एकच केला जरि विपदांनीं गिल्ला.
परन्तु राज्ञीपणा हरपुनी अभागिनी मी झालें
दास्याच्या रौरवीं राबणें कसें ललाटीं आलें!
जरी खावया मिळे सम्प्रती गोडगोडसा घास
नेम न येथें कधीं गळ्याला वसेल अवचित फास.
कुणावरी मी विसम्बुनी अज्ञातवास आक्रमुं हा!
कोण निवारिल उद्भवणाऱ्या अनेक आपत्समुहा?

तुम्हीच अपुल्या पराक्रमाची गुढी जरी रोवाल
तरीच आशा कीं तो येइल दास्यविमोचन-काल.
तुम्हींच जर सामर्थ्य दावुनी स्वकरीं घ्याल सुकाणू
तरीच तारू येइल तीरीं ऐसे कांहीं मानूं.
अफाट दरियामधें ना तरी खाते गोते आतां,
भयाण भूवर गाङ्गरून ही ना तरि जाय अनाथा.
रसातळाला वैभव सारें गेलें पार बुडालें,
हीन दशेच्या अन्धारामधिं कायमचीच दडाले,
आले नशिबीं मज सावरणें ह्या परक्यांची मर्जी,
तुम्हावाचुनी कुणापुढें ही तरी माण्डणें अर्जी ?
दुर्दैवाचा आपुलियावर दारुण झाला कोप
काय रुचावें माझ्या राजा तुम्हास घेणें झोंप ?
देवकिचा ह्या बन्दिवास या तुम्हींच विलया न्याया
तुम्हींच टाका दुर्दैवाच्या वारुनि ह्या अन्याया.
प्रसन्नतेचा मङ्गलतेचा स्वतन्त्रतेचा दिवस
दाखवाल कधिं लोपवून ही परवशतेची अवस ?" २७२

विचार तुम्बळ मनीं उसळले, जैसे मेघ निराळीं,
ओघळलीं आसवें तिचीं तों सञ्जीवाच्या भाळीं.
चळवळ करुनी चावळला तो झोपेमाजी चिमणा
उठे अश्विनीकुमर कराया बरें तिच्या कीं किवणा.
तया थोपटूं लागे तों तिज गाल लागला ओला
मनःक्षुब्धिचा तिच्या तत्क्षणीं मागें फिरला झोला

वात्सल्याची लाट नादली " निजा निजा अं बाळा !
कशास शिवल्या तुम्हास माझ्या दुक्खवन्हिच्या ज्वाळा ?
दुर्दैवें ह्या अभागिनीची जरि अन्तरली झोंप
म्हणुन करावा का जननीनें तव निद्रेचा लोप ?
कशीहि मी साहीन आलिया भोगा तत्परतेनें
नको नको परि मम सुकुमारा दुर्भगतेचें लेणें !
असेच राहा बाळ निरन्तर, नकोच मोठें होणें.
मोठें होणें म्हणजे स्वर्गा सोडुन नरकीं येणें.
मोठें होणें म्हणजे भ्रमणें दुर्दमनीय विचारीं.
मोठें होणें म्हणजे पडणें दुस्सह तीव्र विकारीं.
मोठें होणें म्हणजे सारें कळूं लागणें पाप.
मोठें होणें म्हणजे सारें जिवा जखडणें चाप !
विचार नाहीं, विकार नाहीं, एकमेव आनन्द,
बाल्य मनोहर असलें निर्मळ असे सुखाचा कन्द.
असेच सौख्यीं रहा झोंपुनी, नका होउं सौमद्र;
आणि अकालीं – छे, येती हे विचार काय अभद्र !" २९४

अशा विचारीं तिच्या मनाचें स्वैर भडकले तारू
परोपरींनीं प्रयत्न करि परि शकली ती न सुधारू.
मध्यरात्रिचा झडुन चौघडा कधींच झाला बन्द
परी भडकल्या तिच्या मनाला बसेचना मुळिं बन्द.
मधेंच जाई करीत टिवटिव घरावरोनी टिटवी
कुतर्कगुम्फा माजवुनी करि तिच्या मनाची अटवी.
" अजून कांहीं भलतें सलतें आहे नशिबीं काय ? "
म्हणे मनाशीं तोंच कुठेशीं पाल चुकचुके – हाय ! ३०२

विराजली वैभवें आपुल्या नभोमण्डळीं रजनी
विगतधवा वाटली विधू तो नव्हता निटिलीं म्हणुनी.
तरीहि श्यामल सौन्दर्यानें, दिव्य तारका-नयनें
किती जनांचीं करीत होती व्याकुळ अन्तःकरणें.
कुरूपता झाकून जगाला सुन्दरतेनें नटवी;
स्त्रीहृदयाची दयाशीलता अशा कृतीनें पटवी.
पन्त मनीं घायाळ जाहले बघुनि तिच्या सौन्दर्या
समजावणिनें जरी झोपली साधी भोळी भार्या.
आळिपाळिनें डाव्या उजव्या कुशीवरूनी वळुनी
पलङ्गावरी पडल्या पडल्या वृकोदरांनीं शयनीं
सुखद विचारीं रङ्गुनि जावे, मन व्हावें बेभान,
जसें जसें लागेल मनोहर पुढतीं हिरवें रान
तसें तसें जातसें जनावर दूरच जैसें चरत
तेवि तयाचें मानस जाई एकसारखें भ्रमत.
कुठुनि निघालें कुठें चाललें याची नसते दाद
अमर्याद जग पाहुनि पुढती भ्रमणें एकच नाद,
फुलावरुन या फुलावरी त्या जाई जेवि पतङ्ग,
डोलत डोलत किंवा चढतो गगनीं जेवि पतङ्ग,
जसें प्रवाहासवें वाहतें पान घेत कीं गिरक्या,
जाइ भिङ्गरी पुढेंच किंवा घेत घेत कीं फिरक्या,

भृङ्गासम कधिं, तीरासम कधिं, तडिल्लतेसम केव्हां,
पन्त चित्त धावलें अनावर इकडुन तिकडे तेव्हां. ३२४

शून्य लोचनें पहात पडले मच्छरदाणी मधुनी
शोभिवन्त तस्बिरा भोंवती अन्धुक आल्या दिसुनी.
समोर भिन्तीवरी मोहिनी रविवर्म्याची शोभे
खिळुन राहिले लोचन त्यांचे तीवर कसल्या लोभें.
हिन्दोळ्यावर अङ्गवळा, जणुं नभीं बिजेची कोर,
केशपाश मोकळा पसरला मागें काळाभोर,
धवलाम्बर-धारिणी तिचा तो वाऱ्यावरचा पदर—
जणूं धावत्या स्वाराहातीं मशाल जळते थरर,
किंवा उच्चैश्रवा धावता अयाळ उडते त्याची,
कीं जरतारी उडे अनङ्गध्वजा फरारा साची.
मन पन्ताचें घालुं लागलें पिङ्गा तिचिया भंवती
झोपाळ्यावर भासुं लागली परिचित कोणी युवती
" सङ्गतींत त्या हिन्दोळ्यावर मिळेल जर का वांटा
कोण विचारिल मोक्षसुखाच्या कोणकोणत्या वाटा ?
सङ्गतींत त्या हिन्दोळ्यावर मिळेल आसन जर का
स्वर्गाहुनि सौन्दर्य थोरवी येइल रौरव नरका !
निज दैवाच्या तरुशाखेवरि झोला जीवितरूपी
वसु ये गुणिले ! काळ न दवडी वैधव्याच्या कूपीं "३४२

अवचित उच्चारिलें मनानें सम्बोधन तें ' गुणिले '
अनन्तातलें अस्फुट कानीं घण्टारव गुणगुणले.

विचार येउन गेला, आले भानावरती पन्त
चमक चमकली अननुभूत तों शरीरांत हृदयांत.
नेत्र चोळिले – पुसावया कीं रङ्गविलेलें चित्र,–
चित्तचक्षुसंशुद्धीचा हा उपाय फार विचित्र!
पिऊन वारा होउन गेलें पिसाट मन जें पूर्ण
का वरकरणी उपाय आणिल ताळ्यावर त्या तूर्ण?
कुशीवरोनी एका दुसऱ्या कुशीवरी ते झाले
आणि लोचनासमोर दुसरें चित्र नेमकें आलें ३५२

पुरूरव्याच्या सौधावरुनी व्हाया अन्तर्धान
दिसे ऊर्वशी चढू लागली स्वर्गाचा सोपान.
ऊर्ध्व गतीची गमनोत्सुकता अशा अभिनयीं रमणी,
सरोवरीं कीं विकासोन्मुखा येइ तरारुन नलिनी,
जागृत होउन कीं कलहंसी उन्च करी निज मान,
तुटून रज्जू तीरापासुन सुटतें कीं जलयान.
वियोगविव्हल पुरूरवा तिज आर्जवि अञ्चल धरुनी
आणि आर्जवें तीं पन्ताच्या घुमूं लागली श्रवणीं—

[ चाल – पाखरा, येशिल का परतून ? ]

ऊर्वशी! जासि कशी सोडून? ॥ धृ० ॥
क्षणभङ्गुर तो रङ्ग उषेचा
जाइ जसा लोपून १
कोमल किरणीं जणु दवबिन्दू
क्षण जाई चमकून २

चषक सुखाचा लावुन ओठीं
घेसि कशी काढून ? ३
जरि न पालवी, रुक्ष तरू तो;
तंव मी तुजवाचून ! ४
शौर्यरथाचा अक्ष भङ्गतो
येतें अन्धारून. ५
शून्य गमे जग, दुस्सह वाटे—
जीवित मरणाहून ६
निर्माल्यचि मी उरतों, जातां
तूं सौगन्ध उडून ! ७
ऊर्वशी ! जासि कशी सोडून ?"

तन्मय झाले पन्त, तयांच्या रन्ध्रारन्ध्रामधुनी—
निनादलें तें गीत, अन्तरीं गेले बहु व्याकळुनी.
पुरूरव्याची भूमिकाच कीं आहो आपण करित
आणि ऊर्वशीमिषें आपणा गुणिला झिडकारीत
त्या गुङ्गीतच तया न कळलें रात्र किती ओसरली;
खडबडुनी ते जागे झालें ऐकुन तों किन्चाळी ! ३८२

गुणिला किन्चाळली लावितां हात तिच्या अङ्गास
किन्चाळी कोठली ? — जाहला स्वप्नीं त्यांना भास.
बावरुनी पाहती शरमुनी उठुनी जों भंवतालीं
स्वप्नसृष्टी स्वप्नासङ्गें कधीच विलया गेली !
चुटपुट मग लागली मनाला, वृत्ती बहु गोन्धळली;
साखरझोपेमधीं यशोदा शान्त तया आढळली.
खिडकीमधुनी सहज तयांची दृष्टी गेली खालीं
मावळता चन्द्रमाच ऐशी गुणिला दिसुनी आली.
घरांतल्या परसांत चिमुकली फुलझाडांची बाग
गुणिलेची पैरवी तियेवर तसाच बहु अनुराग,
उठुन सकाळीं तोडुन ठेवी देव-पुजेला सुमनें
सुमनेंही स्वागता तियेच्या असती सस्मित वदनें;
उत्सुक असती तिच्या मुखींची ऐकायास भुपाळी
विकसित जणु पाकळ्या करूनी — छे, कानांचीं पाळीं,
जास्वन्दी ताम्बडी निळी वा पिवळी कोठें विकसे
परागमुगुटाङ्किता कर्णिका तयांतुनी बहु विलसे;
कुठें कोपऱ्यामधें कर्दळी फुलुनी झुबकेदार
उन्चावुनि आपुली मान कीं खुणाविते बहुवार;
पाना-पाना-गणिक तगेरी लटकुन जाय फुलांनीं
मोत्यांचीं जणुं घालि भूषणें सर्वाङ्गीं नृपरमणी;

कडेकडेनें तशीच लवली कण्हेर फुलभारानें
उत्साहानें पुढें करी जणु गरीबिचे नजराणे;
लाविल ती कधिं हात, तिच्यावर कधिं उधळूं हीं सुमनें
पारिजात-तरु करी प्रतीक्षा अधीर अन्त:करणें;
गुलाब वैभवसौन्दर्याचा सोडुन देउन तोरा
सहर्ष सादर होतो तिजला रोज रोज सामोरा;
हेतुहि नसता चुकुन जरासा स्पर्श तिचा जों होई
लाजाळू ती उगीच तिकडे लाजलाजुनी राही;
तिरसङ्गीं तर उतावळी बहु तिन्ही-त्रिकाळीं फुलुनी
गुणिलेच्या सहवास-सुखास्तव बसली असते टपुनी.
परि हटवादी मुलापरी ती बसते रुसुन दुपारीं
तिच्या समजुतीसाठीं गुणिला फिरुनी येइ दुपारीं!
ऊन खालती झाल्यावर ती ये घालाया पाणी,
उरला-सुरला वेळ तिचा त्या जाई शान्त ठिकाणीं,
वाटे तिजला भरल्या जगतामाजी एकलकोण्डें,
वाटे तिजला नलगे बघणें ह्या जनतेचीं तोण्डें,
वाटे तिजला निर्मळ वरवा फुलझाडांचा सङ्ग,
म्हणे 'फुलांना जगतासम नच ठावे नकली ढङ्ग'.
कथा-पुराणें ऐकायाचा नाद न वाचायाचा
वाटे तिजला रसाळ त्यांहुनि मूक फुलांची वाचा.
पुष्पांच्या पाकळ्या आणखी वृक्ष-लतांचीं पानें
वाटे तिजला रहस्यमय हीं कीं ग्रन्थाचीं पानें.
वाटे तिजला हरिदासांचे भक्तिमार्ग ते गहन;
पुष्पमिषें जे व्यक्त होति ते सुलभ कराया ग्रहण.

पुष्पांसङ्गें सदा करी ती हितगुज मूक मनानें
धर्मगुरूसम देवमूर्तिसम तिजला गमतीं सुमनें
आजहि तेथें म्हणून आली नित्यक्रम-अनुसरणीं
देति खडी ताजीम तियेला पुष्पें हसऱ्या वदनीं.

याच मनोरम दृश्य-दर्शनीं पन्त जाहले गर्क
प्राशित होते पिपासु-लोचन जणु दृश्याचा अर्क.
येउन गेला असेल त्यांच्या मनामधें कीं तर्क
'तिच्या स्पर्शनें भाग्यवान हीं सुमनें, हा बालार्क !–'
कां दुसऱ्या बाजूस तयांचे सन्थ वळति ते नेत्र ?
दिशा कोणती दाखवितें तें देखा होकायन्त्र.

तोडित तोडित कुसुमें गेली कोपऱ्यांत तों गुणिला
सुवर्णचम्पक तिच्या हातचा आकर्षवि कीं तिजला
काल तयावर विकासोन्मुखा पहिली कलिका दिसली
तीच बघाया गेली मानित असेल आतां फुलली;
हाय, किडीनें कुरतडलेली दिसली परि ती कलिका,
आशावादी कोमल हृदया तिच्या बैसला चरका.
बघतां बघतां तोंच लोचनीं टचकन आलें पाणी
सञ्जीवाची हाक तिला तों भानावरती आणी.
''मनोरथामधिं रमुनी जावें बाळगुनी जी आशा''–
म्हणे मनाशीं ''एकाएकीं अशी पावते नाशा !''

भयाण रस्ता, काळोखानें व्यापुनि जातां धरणी
दिवा दूरचा प्रवाशास परि धीरद अन्तःकरणीं.
फूल कोवळें जेवि भूषवी उजाड गवती माळ,
वैभवहीना विधवेचा तो तसा एकला बाळ.
तथापि गुणिला सञ्जीवाचा कधीं कधीं करि राग
का जननीच्या नसेल पोटीं थोडाही अनुराग?
घडण मनाची गूढ; कशी ती उकलुनिया दावावी?
दिसतें तैसें नसतें ऐशी कधीं प्रचीती यावी.
मानस म्हणजे असङ्ख्य वळल्या पेडांची जणु वेणी
महोदधी कीं जयांत खचल्या अनन्त वस्तुश्रेणी.
वैतागाच्या भरांत बोले "– निपुत्रिका जर असते
आत्मविसर्जन 'त्यांच्या'मागें कधींच केलें असतें.
सञ्जीवास्तव खोड्यामधिं या पडणें आलें दैवीं
पायबन्द मज सञ्जीवाचा डाम्बुनि येथें ठेवी –".
हाच अतांशी विचार घाली तिच्या मनीं थैमान
सदाकदा ती सञ्जीवाचा म्हणुन करी अवमान.
हासत खेळत त्यानें 'जम्मत' साङ्गायाला यावें
करुनि न कौतुक तिनें तयाला उलटच झिडकारावें
गळां घालुनी मिठी तयानें लाडिकतेनें कांहीं
मागावें तों जननी बोले निष्ठुरतेनें 'नाहीं!'

दाखवितां कधि लागटपण ही, तीनें रागेजावें
त्रासिक तुसडेपणा दावुनी दूर दूर ढकलावें.
म्हणे यशोदा 'बाई, त्याला पुढयांत घेइल कोण?
तुमच्यावाचुन आतां त्यांचें करील कौतुक कोण?'
वृकोदरांनीं आणि करावी समजुत सञ्जीवाची
कशी होत तरि असेल तेव्हां स्थिति जननीहृदयाची?
परन्तु दिवसा जरी कितीही तयास ढकली दूर
रात्रीं घेउन पोटीं निजता वात्सल्याचा पूर-
हेलावे अन्तरीं तियेच्या, येई नयनीं पाणी;
स्वतास निन्दुनि हात आपुल्या कपाळावरी हाणी!
तथापि तुसडेपणा तियेचा सन्तत वाढत गेला
बुजुन मुलानें जवळ न जावें तिचिया कांहीं केल्या
सवङ्गडयामधिं रमूं लागलें मन त्याचें खेळांत
परतायाची घरास त्याला कधीं नुरावी भ्रान्त
पुरा पडेना पुढें तयाला शब्दांचाही मार
आईचा मग हात शिवशिवे, तोच तया आहार.
वैतागाङ्कित सन्तापानें ताडण तीव्र करावें
सञ्जीवानें अनन्यगति मग होउन आक्रन्दावें.
कळवळुनी तो रडताना परि केविलवाणा बघुनी
रडूं कोसळे तिलाहि, बैसे तयास पोटीं धरुनी.
नेत्र वटारुनि टाकितसे जो निसर्ग पोळुन धरणी
वळीव पाडुनि शान्तविणें ती तयाचीच ही करणी. ४८

उजाडला सण मङ्गल, आला दसरा आनन्दाचा
पाटी-पूजन विद्यार्थ्यांचें — उत्सव उत्साहाचा

पान-सुपारी, गूळ-खोबरें, पुष्पें, कापुर, पैसा,
पुडींत कुङ्कू, हळद, तयांचा सरन्जाम तो ऐसा.
पाटीवर रेखिल्या मनोहर नक्षीदार कमानी
सरस्वती, रवि, चन्द्र, काढिले विचित्र रेघोटयांनीं
चित्रकला ती अजब पिसारा दाखविते मोराचा
नक्षा उतरे थोरांचा तो नमुना कल्पकतेचा.
ठेवणींतले लेवुनि कपडे विद्यार्थीगण नटला
तच्चैतन्योत्साह असेलहि रविकिरणांनीं लुटला.
धावत शाळेकडे निघालीं बाळें उत्सवमूर्ती
सञ्जीवाचें पाटी-पूजन झालें त्याच मुहूर्ती
सायङ्काळीं शिलङ्गणाला सारे लोक निघाले
सञ्जीवाचें सीमोल्लङ्घन दिवशीं त्याच जहालें.
नवे खेळ ते, नवे सोवती, नवीन वाटा फुटल्या
मुळाक्षरांतच सञ्जीवाच्या कितीक पाट्या फुटल्या.
'झोण्ड' म्हणोनी तया लेखती त्याचे तर पन्तोजी
अवखळ, वेडर, तसा खोडकर, कुणासही नच मोजी.
तो शाळेच्या मिषें घरांतुन पडे जरी बाहेर
शाळेपासुन दूर दिशेला परि त्याचें माहेर !
हेर तयावर ठेवा म्हणजे कळतिल त्याचे खेळ
अफाट धरणामध्यें राहतो डुम्बत वाडुळ वेळ
हिरवे आम्बे, आम्बट चिन्चा पाडी मार्गी दिसता
दात आम्बले तरी खायचे ऐसा रोज शिरस्ता
जातां जातां उगाच मारिल तो कुत्र्याला धोण्डा
लहान मोठा न मानिता लागेल जनांच्या तोण्डा.

दाब कुणाचा? वृकोदरांचा? त्यांना काय जरूर?
ते गुणिलेच्या परोक्ष होतीं उलट तयाशीं क्रूर.
यशोदेस तर असह्य होई घरांत त्याची दाटी
हिताहिताची करील कां ती उगीच आटाआटी?
गुणिला जाणे उपाय एकच त्याच्या द्वाडपणाला
सापडेल तें घेउन हातीं लागे मारायाला ! ५२०

कुणा न लागे थाङ्ग कुणाचा, आला दिन तो गेला
स्वतास पुसती 'न कळे अधरीं येइल कसला पेला!' ५२२

'काय वाजतें? कुणाकडे हो? का हो बाळंभटजी?'
बाळंभटजी म्हणजे सगळी गांव-बातमी ताजी!
'कशास पुसता परन्तु त्याला? - फटकळ तो मुलखाचा!
पाय टाकता का वाटेवर जीमधिं काटे खाचा?'
'वेदाचीं परि चार अक्षरें वसती त्याच्या वदनीं!'
'गुणिला साध्वी जशी नान्दते वृकोदराच्या सदनीं?'
पहा धाबळी धुरकटलेली पोकळशी नेसून
चालले ते घाइघाइनें भस्मपुण्ड्र चर्चून.
तोंच थाम्बुनी बाळंभटजी वृत्त साङ्गती त्यांना—
"पन्तांच्या 'त्या चिरञ्जिवाची' मुञ्ज आज आहे ना!"
'काय बोलता भटजी!'—परि ते डोळे मिचकावीत
अधान्तरीं टाकीत पावलें झाले नेत्रातीत.

सञ्जीवाचें मौञ्जीबन्धन यथासाङ्ग तें झालें
‘परोपकारी पन्त’ म्हणोनी भोजनभाऊ वदले
गुणिलेला हें नवीन झालें ओझें उपकाराचें
पन्त बोलती परन्तु त्यावर ‘अपुलें कसचें कसचें !’ ५३८

कुणा न लागे थाङ्ग कुणाचा, आला दिन तो गेला.
स्वतास म्हणती ‘न कळे अधरीं येइल कसला पेला’
दिवसामागुन दिवस चालले, सृष्टी बदले नूर
गुणिलेच्या मानसीं लागली वाढाया हुरहूर ! ५४२

‘ अरे कोण रे तिकडे तो तरि ? कोण तोडतो पेरू ?---
थाम्बा बोलूं नका, आडुनी कोण तरी तो हेरूं !
पकडा पकडा अरे पोर तो, चोर कारटा कुठला ! ’
चोर पोर तो वाऱ्यासरिखा सुसाट धावत सुटला ! ५४६

‘ पोर आपला तुम्ही आवरा, बजावत्ये मी बाई !
तुम्हास तुमचा प्यार, परी गय करायची मी नाहीं !
कमल आमची खरीच कमला, सोनकळी कीं कलगी
भिकार तुमचा तरी कारटा करी तिच्याशीं सलगी ! ’ ५५०

असेंच कांहीं कुणी साङ्गती ‘गुणीच तुमचा बाळया’
किटूं लागले कान आइचे ऐकुन त्या कागाळ्या.

वृकोदरांनीं तया म्हणावें ' चेप जरासे पाय '
न साहुनी तें न ऐकिलेसें करुन निघुन तो जाय
यशोदेस तर खपेच ना मुळिं त्याचा निजगृहवास
निपुत्रिकेचा नसेल ना हा हेवा वा दुस्वास !
वृकोदरांनीं परि गुणिलेच्या समक्ष त्यावर माया
अलोट दावुनि कधिं न चुकावें तयास कुरवाळाया,
पन्त दुटप्पी वर्तन करती असेंहि त्याला वाटे,
परन्तु त्यानें वदुनि दाविलें नव्हतें तोण्डावाटें.

आडदाण्डपण कुणी तयाचें अपुल्या कार्या लावी
कुणी तयाला पुढें करोनी करिती लावालावी
होइ म्होरक्या तो इतरांचा पुण्डगिरी करण्यास
आणि शेकतां अङ्गावर ती तोच पुढें शिक्षेस
कुटाळकम्पूमधले स्नेही करती वरती काखा
आणि सङ्कटीं उरे न कोणी त्याला पाठीराखा
कैवाराला समर्थ ज्यांचे असती आईबाप
तोण्ड उघडुनी त्यां बोलाया असे कुणाची टाप ?
सरळ तयाची विचारसरणी गमे जनां अन्याय्य
करणीला मग केंवि मान्यता आणि कुणाचें साह्य ?
म्हणे मनीं तो "डोहामाजी मिळे जेवि डुम्बाया,
बागेमधलीं मधुपाला या मिळतिं फुलें डुङ्गाया
कां न मिळावीं तेवि फळें या मजला वृक्षावरचीं !
तोडुन घेतां धावुन येती घेउन गोफण कमची !

सृष्टी पिकते सर्व जिवांच्या योगक्षेमासाठीं
मनुष्य कावेबाज भाण्डतो परी मालकीसाठी !"
भाषा वा प्रतिपादन शैली तत्त्वज्ञानामधली
नेणे तो परि बोलुनि दावी चीड भाषणीं असली.
गैर फायदा ह्या वृत्तीचा धूर्त घ्यावयासाठीं
टेहळणीवर असती, मान्जर जेवि मूषकापाठीं.
धनिक पित्याचा अधिकाऱ्याचा असता तो जर पोर
ह्याच गुणास्तव कौतुक त्याचें झालें असतें थोर.
परि तो पडला एक पोरका 'भिकारकरटा' पुरता
'करण्टलक्षण' शिक्का त्याच्या ह्याच कपाळावरता.
कोणी निन्दी 'वारकरी, पण किती तरी मग्रूर !'
'हवी करीं नरटीच द्यावया' पन्त बोलती क्रूर. ५८६

कुणा न लागे थाङ्ग कुणाचा, आला दिन तो गेला
मनांत म्हणती 'न कळे अधरीं येइल कसला पेला !' ५८८

कधि पन्तांची धन्देवाइक मित्रमण्डळी जमती
स्वैर चालती तेव्हां त्यांच्या विनोद गप्पा गमती.
नसलेल्यांची कुटाळकी बेदिक्कत सारे करती
ऐकवतील न खुशाल ऐसे शब्द अमङ्गल वदती.
'अरे-तुरे'तिल कुणी सोबती टवाळ छट मुलखाचे
जोडाया कचरती न नातें गुणिलेशीं पन्ताचें.
धिण्डवडे काढणें दुजांच्या अब्रूचा हा धन्दा
शरम कशाची त्यांना करतां शीलवतींची निन्दा ?



8094

पापक्षालन व्हावयास जें भावें ध्यावें नाम
नरकतुल्य कल्पनेंत पापी बुचकळती ते अधम !
मन स्वताचें पापी, त्याचें लेणें साध्वींनाही
कुकल्पनेमधि रमुनि चढवती, लव माणुसकी नाहीं.
जिभेस सुटतें पाणी दिसतां सुन्दर विधवा तरुणी
'कुमार्गगामी असावयाची' हीच कल्पना-सरणी !
कोणी त्यांच्या स्वैर जिभेला लगाम घालायाचा?
म्हणुन बहकली, चटावली ती असल्या थिल्लर नाचा.
पन्ताना बहु गोड गुदगुल्या होती तें श्रवतांना
नाकबूल ते वरवर करिती जरी झटकुनी माना.
एक एक तों सारे स्नेही फिरावयाला उठले,
हासत खिदळत – छे, निज पापच जगांत उधळत सुटले.
परन्तु मागें रेङ्गाळति कां हे राघोवल्लाळ ?—.
गढूळ पाणी वाहुनि जाता जसा उरावा गाळ !
कुजबुज झाली परस्परांची 'ठरलें तर मग ?'–'ठरलें !'
सान्जवात करि गुणिला खालीं, हृदय तिचें कां चिरलें ? ६१२

(library stamp)



कड्यावरोनी कोसळणारा प्रवाह मात्र दिसावा
उगम न ठावा, अन्त न ठावा, दरींत लोपुन जावा;
काळाचाही प्रचण्ड तैसा प्रवाह हा कोसळतो
भूत न गवसे, भविष्य न कळे, वर्तमान आदळतो
वर्तमान हा वाहुन कोठें घेउन जाइल न कळे
पायाखालीं ठरे न वाळू; धडपडती जन सगळे.
कीं जीवांचा फिरत्या गोलावरी चालला खेळ
अस्थिरतेशीं स्थैर्याचा तरि म्हणुनि बसेना मेळ ?
फिरत्या गोलावरी चालला जीवांचा हा नाच
दुबळे डोळे अन्धारांतिल पाहुं न शकती खाच.
कुणा न लागे थाङ्ग कशाचा; आला दिन तो गेला,
मनीं शङ्कती 'न कळे अधरीं येइल कसला पेला'. ८२४

अस्तगिरीवर रवी उतरला सन्ध्यारमणी हासे
अनेक अस्ताचलीं प्रगटले रङ्ग तियेच्या लास्यें.
जादुगार कीं ओन्जळींतुनी रङ्गी-बेरङ्गी तीं
वसनें निर्मुन उधळित होता दिपवित वसुधायुवती.
भडक अम्बरें नेसुन किंवा गोपी गुर्जर-रमणी
रासक्रीडेमधीं रङ्गल्या, दङ्ग जाहली धरणी.

मावळतीला असे उसळले अनन्त उत्कट रङ्ग
तेंवि अन्तरीं गुणिलेच्याही होते उठत तरङ्ग.
छटा फाकल्या नभांत पिवळ्या, सोन्याचाच मुलामा
तिच्या बुद्धिचीं चमक तिला ने अशुभ-कल्पना-ग्रामा.
कुणी कुन्चले त्यांत फिरविले मधुनी मधुनी हिरवे
आठवले तिज तोंच यशोदा-नेत्र मत्सरी तिरवे.
रङ्ग मनोहर इतरासङ्गें नारङ्गीही खुलला
जागृत तीचा करावया अभिमान जणूं तो फुलला.
रङ्ग-सागरीं डुम्बत होता मेघहि काळा एक
एकाएकीं अङ्ग तियेचें थरारलें निमिषैक.
काळ्या मेघावरी पसरल्या छटा गुलाबी दोन
पन्ताचें प्रतिबिम्ब त्यांत तिज आलें काय दिसोन ?
आणि भोंवती आली दिसुनी तीव्र दाटली लाली
क्रोधाची तिरमिरी तियेच्या मनीं त्यासवें उठली.
बघतां बघतां रङ्ग नभींचे तोंच निमाले सारे
किञ्चित होते उजळ मात्र ते क्षितिजाचे कङ्गोरे;
आणि हळूहळु लागे छाया पसराया रजनीची
वाढाया लागली मानसीं हुरहुर तों जननीची.
नभांत होता निळा पसरला आतां रङ्ग विलोल
गुणिलेचें मन घे भक्तीनें ईश्वरचरणीं डोल.

बागेमधल्या फुलझाडांवर आल्या श्यामल छाया
गुलमूशीचीं फुलें लागलीं हळूहळूं उमलाया.

रातकिड्यांच्या सुरांत रजनी गीत म्हणे अङ्गाई
सञ्जीवास्तव उत्सुक झाली हुरहुरलेली आई.
कधींच शाळा सुटुन घराला मुलें परतलीं सारीं
कशी न अजुनी घरास वळली सञ्जीवाची स्वारी ?
"कधींच गाई हुम्बारत त्या आल्या परत घरास
अधीरतेनें हुङ्गहुङ्गुनी चाटाया वत्सास
परवशतेच्या पङ्कामाजीं पडली दुबळी गाय
कसा सञ्जिवा सख्या पाडसा करसी तूं न उपाय ?
बागेंतिल ह्या झाडावरल्या घरट्यांतील पिलांस
पहा पाखरें चोचीमधुनी आलीं घेउन घास.
कसा न अजुनी परतलास तूं वेल्हाळा सञ्जीवा ?
मुका धीर द्यावया न येसी अधीरलेल्या जीवा ?
सखया, करिते जरी तुझा मी कधींकधीं तिटकारा
दृष्टिआड होताच परी तूं जीव घाबरे सारा.
हूडपणा हा पुरा जाहला नाहीं काय अजून ?
शिकावयाला मन लावा तें नाहीं जोंवर जून.
सगळें कांहीं बघावया तें नव्हते का खम्बीर ?
नशीब माझें परन्तु फुटकें"—आलें नयनीं नीर—
"परि परमेशा दाद दयाळा कुणापुढें मी मागूं ?
सञ्जिवास द्या सुबुद्धि "—पडला ध्वनि तों कानीं घू-घू. ६७२

चपापुनी तों उठली तेथुन आली देवघरांत
जगदम्बेच्या आळवणीस्तव जुळले गेले हात.

स्रवूं लागल्या गालांवरुनी अश्रूंच्याही धारा
वितळूं लागुन हृदय वाहतें कीं तन्नेत्रद्वारां.
विवेकबन्धन विरून गेलें, नुरलें कांहीं भान,
ठाव मनाचा सुटला, त्याला न साहवे तो ताण.
आणि उमाळे एकामागुन एक लागले येऊं
वाटेना ही अश्रु पुसाया हात वरी कीं घेऊं.
"जगदम्बे, मी तुझ्यावाचुनी जाऊं शरण कुणाला ?
तुझ्याविना माहेर कोणतें अनाथ ह्या अबलेला ?
माण्डलीस छळणूक, कां न ही झाली अजुनी पुरती ?
गान्जणुकीला कोठवरी तरि अजुन यायची भरती ?
जन्माला तरि घातलेस कां ? कां न उपजतां मेलें ?
कशास जगलें ? कायमचे हे कां न झाकती डोळे ?"
पुन्हां एकदा आलें तिचिया तों भडभडुनी पोटीं
धार अश्रुची ओघळली वहु वेगें गालीं ओठीं.
तेवत होता देवघरामधि नन्दादीप अखण्ड
प्रकाश त्याचा तिथें पसरला थोडा, अन्धुक, थण्ड
त्या तेजानें परी चमकले गाल तियेचे ओले
आणि दाटुनी गळा, हुन्दके मूक रोदनीं आले
पडतां कानीं तोंच यशोदा वोले येउन जवळी
"उगाच बाई करिता चिन्ता; अजुनी वेळ न टळली.
असेल कोठें रमत राहिला, येइल आतां वाळ
पुसा अश्रु ते, फारच बाई तयें सोडिला ताळ !
तिकडूनहि तें घडलें नाहीं अजून कैसें येणें ?"
—तोंच घावरुन गेली गुणिला;—कां ? कसल्याशा भेणें !

नसेल ना हें – जशी दिसावी छाया वस्तूआधीं ?
नसेल ना हें – वेध लागतो जैसा ग्रहणाआधीं ?
नसेल ना हें – जशी लागते घरघर मरणाआधीं ?
नसेल ना ही चिन्ता सुचवित येत्या आधी-व्याधी ?
कुणा लागला परन्तु आहे ह्या काळाचा अन्त ?
—– 'ऐका चाहुल, माडीवरती असावेत हो पन्त !'
कुणा न ठावें कधींच वसले माडीवर जाऊन
बरीच झाली रात्र न आले खालीं केवि अजून ?
तोंच यशोदा गेली वरती वार्ता ती कळवाया
नव्हता तेथें दिवा, न तिजला दिसली त्यांची चर्या.
'बरें, बघाया जातों' म्हणुनी आले उतरुन खालीं
दिसली त्यांना गुणिला-गालीं ती बाष्पार्द्रा लाली.
'जातों शोधावया' म्हणोनी गेले ते गेलेच
भोळी गुणिला, कसा कळावा तिला वकीली पेंच ?
"श्रीजगदम्बे, चराचराचा करिसी तूं साम्भाळ
सुरक्षीत मज भेटवि माझा प्राणविसावा बाळ"
आळवणी ती करीत वसली यापरि देवघरांत
भ्रमत राहिलें मानस तीचें परन्तु सुतशोधार्थ.
पूर लोटले कितीक तिचिया त्या रात्रीं अश्रूंचे
पन्तानीं घर थेट गांठले राघोवल्लाळाचें.
शोध कशाचा ? – ठाव न ठावा त्याचा घेणें शोध
शोध कशाला ? – मनास असता पुरता त्याचा बोध.
राघव बोले "ठरलें म्हणजे करणें नाहिं कसूर !"
तया वानुनी पन्त बोलती "तुम्ही खरोखर शूर !"

पडतां शयनीं स्मरली त्यांना देवघरांतिल गुणिला
कारुण्येंही जिच्या स्वरूपा अधिक तजेला चढला.
नितळ तियेचा कपोल कोमल दुःखाश्रूंनीं भिजला
मन्द उजेडामुळें चकाकुन आणि विशेषच खुलला.
अश्रु पुसावें ते अधरानें वाञ्छा ज्यांची हीच
कां कचरावें कृत्य कराया त्यांनीं जरि तें नीच ?
निजतां निजतां पलखच झाला जागृत जों न विवेक
युक्तिवाद हा केला त्यावर – छे, मदिरेचा सेक. ७३०

माळावरती शाळा बघ ती गुन्हेगार पोरांची
बघावयाचें काय तिच्यामधि ? नव्हे ताज वा सान्ची
स्मारक नोहे प्रेमाचें वा नोहे पावनतीर्थ
स्थळ नोहे वा जया लाभली इतिहासाची कीर्त
नयन मनोरम नोहे नमुना सृष्टीसौन्दर्याचा
जया वर्णितां अगतिक व्हावी कविवर्यांची वाचा.
अनन्यसाधारण वा नोहे शिल्पकला-आरास
बघावया जी मनीं स्फुरावी आतुरता सोल्हास.
नव्हे प्रदर्शन किंवा कोणा भूपतिच्या विभवाचें
ज्याच्या तेजें दिपून जावे लोचन बघणारांचे.
विहार-सुख-सेवनार्थ किंवा नव्हे विलसली बाग
तरी तिकडचा किमर्थ मग हो अवलम्बावा मार्ग ?
बाळ-समाजांतला गाळ तो, लाञ्छन अपुल्या पितरां
केवळ खचला कर्दम त्या कां कूपामाजी उतरा ? ७४४

नका नका हें भाषण बोलूं असलें उपहासाचें
विचार करिता कसा न येथें गाळ कसा हा साचे ?
लाञ्छन झालीं निज पितरां हीं स्वभावेंच का अपुल्या ?
तत्पितरांच्या का सङ्गोपन-रीती नसतिल चुकल्या ?

लालन पालन कसें करावें न कळे ज्या पितरांना
'मुलें बिघडलीं' म्हणून त्यांनीं दोषावें पोरांना ?
लाड अतीशय करतां जातें विघडुन सहजी मूल
सन्तत घडतां जलसिञ्चन अति कुजतें रोप समूळ
कुळबुडवा होणार कारटा आणि म्हणावें लोकीं
जो तो दूषण-वचन-बन्दुका पोरावरती रोखी.
कितीक असलीं असतिल येथें आलेलीं बघ बाळें
अधःपतन हो रोपाचें ज्या नसतें बन्धन आळें ७५६

आणि अशीं हीं असतिल बाळें कितीक ह्या शाळेंत
कीं न जयांना शेत शिवारीं किंवा घर गांवांत
माय न, तात न, सगेसोयरे कुणी न जगतापाठीं
दगड उशाला, धुळ शेजेला, भिक्षा पोटासाठीं
वावरतांना समाजामध्यें असे कोवळे जीव
कोण तयांचा विचार करतो ? कुणास येतें कींव ?
कींवहि येई, परि ती केवळ भिक्षा देण्यापुरती
आणि मानिती कर्तव्याची यांतच केवळ पूर्ती.
ज्ञात न पूर्वज अशा वंशजा का अब्रूची भीती !
कुमार्गगामी व्हायचेच ते; कशी सुचावी नीति ?
नवल कशाचें ! दोष कुणाचा करी विचार न कोणी
परन्तु जनता नाक मुरडते मात्र तयां निन्दोनी.
गुन्हा कुणावर शाबित, कोणावरती केवळ आळ,
डागळला यापरी तयांचा निर्मळ शैशवकाळ

खोट्यासङ्गें खऱ्यास येई दुर्गति वनवासाची
न्यायदेवतेप्रती चकविणें कारागिरि वकिलांची !
चोर सोडुनी संन्याशाला सुळी चढवितो कोणी
दुजावरी लादतां न कचरे निज पापाची गोणी ७७४

किती दाखवूं बाप तुम्हाला ज्यांनीं जागीं बाळें
कितीक दिन नसतील पाहिलीं कसले करिती चाळे
हमालखान्यामधीं रावणें दिनभर पोटासाठीं
गाठ मुलांचीं पडणें अपुल्या मुष्किल दिवसापोटीं
निर्वाहाचें साधन खातें ज्यांचा अवघा काळ
बालमनोभूमींत तयांनीं केव्हां नाङ्गरफाळ
धरुन, करावी दक्षपणानें कशी मशागत साङ्गा ?
मुलें बिघडतां डकवावा तो दोष कुणाच्या अङ्गा ?
बाळांचीं मानसें शिम्पले मोत्यांचे ते छान
परि न मौक्तिकें सुविचाराच्या स्वातिबिन्दुवाचून. ७८४

तशींच पोरें कितीक येथें ज्यांचे आई-बाप
बड्या तुरुङ्गामधे फेडिती दुष्कर्माचे माप
अनीतिपथ सेवणें जाहला हाच जयाचा धन्दा
सुमार्गगामी कसे फुटावे अङ्कुर त्या कुलकन्दा ?
मेघामधले थेम्ब जळाचे विमल स्फटिकावाणी
पडतां धरणीवरी चिकटती तयांस तेथिल घाणी

घाणीच्या डबक्यांत कळी जर दैवगतीनें पडली
का न घडावें फौज कृमींची तिचियावरती चढली ?
चित्तसरोवर असेल निर्मळ बाळांचें - परि त्याचा
रङ्ग पित्याच्या आईच्या कृतिनुरूप बदलायाचा.
कितीक वाऱ्या केल्या ज्यांनीं कारागृहवासाच्या
चोखाळाव्या त्याच न वाटा कां पोरांनीं त्यांच्या ?
दोष कुणाचा ? पोरांचा ? छे, समाजशासनसंस्था
सर्वाङ्गांनीं नाहिं पावल्या अजून पूर्णावस्था ! ७९८

बाल्य निरामय कधींच अमुचें गेलें गेलें दूर
बाळपणाच्या आठवणींनीं भरून येतो ऊर.
जीवनकलहीं आज झुन्जतां होतों कासावीस
आणि मागतों फिरुन मिळावें बाल्यामधले दीस
चिन्ता नव्हती मनीं उद्याची जबाबदारी नव्हती
वडिलांच्या मर्जींत वागतां कांहीं नव्हतें कमती.
बाळपणाच्या पीयूषाचा जरी लागला शोष
आणि सारखा करित राहिलों आज जरी आक्रोष
फिरून त्याचा स्वाद लाभणें अशक्य या जन्मांत;
काळावरती सत्ता नाहीं; नाहीं होणें मात !
आठवणींच्या पोहावें मृगजळांत केवळ आतां
आयुष्याच्या ओझ्याखालीं वाकवुनी कटि माथा
आठवणींची परन्तु अमुची ही गन्धर्वी नगरी
कोण हिरावुन घेइल ? आम्हां तीच होय सुखकारी. ८१२

परि थोरपणीं सौख्य न हेंही बाळगुन्हेगारांना
बाल्यस्मरणीं राहील उभा चित्तीं बन्दीखाना
उत्कर्षाच्या क्षीरसागरीं भाग्य शेषशाईचें
जरी लाभलें शल्य स्मृतिचें सलेल पूर्वाश्रमिचें
कैदेचा हा कलङ्क जडला त्यांच्या बाळपणाला
निर्मल बाल्यप्रवाहामध्यें असा मिसळला नाला
वागून गुण्यागोविन्दानें सुखवावें पितरांना
नन्दनोपवनसमता द्यावी त्यांच्या जीवित-राना;
तेविं चुम्बनीं तयां मिळावी सुधारसाची गोडी
साक्ष पटावी परमेशाची; भवार्णवामधिं होडी
वल्हवायाला स्फुरण चढावें, विपमतेंतही धैर्य;
बाल्यनिर्मितिमधें विधीचा हाच हेतु, हें कार्य.
परन्तु बघुनी ह्या कैद्यांचें हेतुविफल हें बाल्य
प्रभुपूजेविण कळ्या जहाल्या देखुनि ह्या निर्माल्य
तिळतिळ तुटतो जीव; आणखी पुढिल तदायुष्याचा
विचार करतां मन भाम्बावें भग्न देखुनी खाचा ८२८

---

माळावरती बन्दीशाळा गुन्हेगार पोरांची
चुकलेल्यांना सुधारण्यास्तव खटपट सरकाराची
घण्घण् झाली घण्टा, उठले त्वरित छोकरे सारे
कुलुपें खोलुन उघडीं केलीं तीं खोल्यांचीं दारें
एकामागुन एक पटापट पडले ते बाहेरी
जेविं वारुळांतुनी प्रगटती त्या मुङ्ग्यांच्या हारी
जेविं खुराड्यांतुनी उतरतीं कबूतरें भूवरती
पान्जरपोळांमधुनी किंवा जनावरें जणुं निघतीं. ८३६

शिशिरऋतूचा तीव्र कडाका पडलेला बाहेरी
बोटांचीं वाकती न किञ्चित गारठलेलीं पेरीं
दुलईमधुनी अवयव-लवही काढवे न बाहेरी
वृश्चिकदंशाप्रती अनुभवी हात जलामाझारीं
हवेंत तरती विलीन होती श्वासामधल्या वाफा
सरितापात्रावरी तरङ्गे वाफांचा घन ताफा
तीव्र हिमानें सगळीं पानें झडलेला वटवृक्ष
महा तपस्वी कण्ठितसे जणुं जीवित अपुलें रुक्ष
काळवण्डले करपुनि गेले गुलाब फुलबागेंत
परिस्थितींचीं अशी विषमता वैभव विलया नेत

ससा पञ्जरीं बसे आखडुन घुसून गवतामाजी
हालचाल कळपांत कराया मेण्ढ्या नव्हत्या राजी
या थण्डीचा पडे पिकावर शिवारामधीं कडका
आणि उद्याची धारण हृदयीं कृषिकांना दे धडका
रातपाळिची राखण करतां कुठल्याशा शेतांत
शेतकरी गारठून मेले आदळली ही बात
द्राक्षलतांचीं कुठें जाहली नुकसानी अनिवार
हळहळुनी दैवास निन्दिती बागवान बहुवार
हात ठेविले कोणी वक्षस्थळीं स्वस्तिकाकार
कुणी पोटिंशीं घेउन गुडघे हूं हूं दे हुङ्कार.

परन्तु सारे ऋतू सारखे बन्दीशाळेमाजी
प्रखर ऊन वा पाउस थण्डी शिरत न कांहीं मोर्जी.
असतीं सदनीं तरी मुलें का सोडिति साखरझोप ?
परन्तु असल्या सुखसोयींचा शिस्तीमाजी लोप
टङ्गळ-मङ्गळ करील त्याला मिळे छडीचा मार
बाळपणींचीं सौख्यें निष्ठुर शिस्तीमाजी ठार !
कडक कायदा प्राणमन्त्र हा येथिल व्यापाराचा
यन्त्रासम तो चालविणें ही अधिकाऱ्यांची वाञ्छा.
थेम्ब दवाचे पन्हाळीतुनी ठिबकत होते खालीं
जणु बाळांची येउन करुणा प्रभात अश्रू ढाळी.

घणघण घण्टा पुन्हां जाहली, पिउनी चावलकान्जी
सर्व छोकरे आपआपुल्या आले वर्गामाजी.

ऐकुन घण्टा कामगारही उठले चाळींतून
तोंच तयांना दिसलें कोणी येतांना लाम्बून
बघतां बघतां तोंच थडकले दारीं दोन शिपाई
सवें तयांच्या एक छोकरा कांहिं न ज्याच्या पायीं
विजार, टोपी, सदरा अङ्गीं, दो दण्डांला दोर
कुमार तो सुकुमार पाहुनी म्हणती 'कवळा पोर!'
बघुन आपणाकडे लागल्या करुणेच्या जनदृष्टी
होय अधोमुख कष्टी बालक, नवीन भंवती सृष्टी.
कुणी विचारी नांव तयाला, कुणी विचारी गांव
कुणी गुन्हा वा जात पुसे, ते प्रश्न तयाला घाव.
वरिष्ट आले; ' अरिष्ट आलें ' कामगार कुजबुजले
पाय काढते घेउन पटपट पाङ्गुन सगळे गेले.
सलाम केला पोलीसांनीं कवायतीच्या हातें
साहेबांनीं स्वीकारियला केवळ दृष्टिनिपातें
कठोर दृष्टिक्षेप टाकला लगेच पोरावरती
पोर बिचारा घाबरून तो पाहे खालीं-वरती.
केला कैदी पोर खुला; तों गुरगुरले साहेब
भेदरुनी टाकिती, दाविती जबर आपुली जरब.
'नांव तुझें?'—'सञ्जीव.' "जात? तूं ब्राह्मण? ब्राह्मणवंशीं—
तुळशीमाजी भाङ्ग—कसा तूं निपजलास विध्वंसी!
गुन्हा कोणता?" "कांहीं नाहीं—वकील ते बल्लाळ—
उगीच माझ्यावरी घेतला त्यांनीं खोटा आळ"
"ते खोटे अन् खरा एक तूं!—पाहूं खोटे कोण!—
जमादार, ह्या छोकऱ्यास द्या घोडी फटके दोन."

"पाया पडतों साब, साङ्गतों खरंच देवाशपथ !
आळ घेतला माझ्यावरती" "सच्ची सच्ची बात ?
माफ आज तुज एक वेळ, पण मिळेल फिरुनी घोडी
जरी न सीधा वागशील वा करशिल कांहीं खोडी.
जमादार, न्या आंत छोकरा; ठेवा यावर नजर
फोडुन काढा गैर वागता, करा इथें वा हजर" ८९८

'चलो' म्हणाले जमादार तों आंत तयातें न्याया
त्यांच्या वचनीं कुठली करुणा, सहानुभूती, माया ?
होत असावें जसें जिवांना निघताना परलोका
तीच भावना स्फुरणें येथें प्रवेशताना कैका.
परत निघाली सलाम करुनी पोलीसांची जोडी
कैदेच्या खडकावर लोटुन बाळजिवाची होडी
दों दिवसांची प्रवासांतली सोबत त्यांची, तरिही
सञ्जीवातें वाटे ' पडलों आप्तजनांच्या विरहीं '
मृतदेहाला कबरस्तानीं जाती निरवुन लोक
मृतदेहाला परन्तु नसते त्याचें सौख्य न दुक्ख.
परन्तु कारागारीं सारे सान थोर आलेले
दफन आपलें आपण बघती समाजास मेलेले,
तुरुङ्ग ज्यांची मिरास त्यांची सगळी गोष्ट निराळी
मरणतुल्य परि दुक्ख तयांना ज्यांची पहिली पाळी.
भयें विस्मयें पहात भंवती आंत निघे सञ्जीव
ठावी नव्हती स्वप्नींहि तया ह्या जगताची शींव

स्नान जाहलें तुरुङ्गातले कपडे मग पेहरले
कसेंसेंच होउनी तयाचें अङ्ग तदा थरथरलें
जानवेंहि घेतलें तयाचें तेथें हिसकावून
काय बिचारा करील मस्तक वाकविण्यावाचून !
पूर्व जिण्याची नको स्वल्पही खूण शरीरावरती
म्हणुनि दक्षता अधिकारी हे गमते कीं बाळगती !
आणि कोठडी एक खोलुनी आंत लोटिलें त्याला
बन्द करोनी दार तयावर दिला ठोकुनी टाळा
बाल्यकौमुदीवरी यापरी पडला काळा पडदा
अनुतापाची सतार तरिही बोलत होती "दिड-दा" १२४

दारुण तळमळ मातृमनींची येइल का निववाया ?
प्रयास शाब्दिक करी यशोदा गेले परि ते वाया.
देवघरामधि करीत होती गुणिला अश्रुस्खलन
माजघरामधि करी यशोदा लवण्डून ती शयन.
उचम्बळोनी कैक उमाळे आले गुणिला-पोटीं
अशिव कुशङ्का करी तियेला कम्पित हृदयीं ओठीं.
शुक्र चान्दणी अस्ता गेली, सप्तर्षीही गेले
परन्तु रजनी किति ओसरली कांहिं न तिजला कळलें
मनीं लागला एकसारखा सञ्जीवाचा ध्यास
कशी दर्शनावाचुन त्याच्या तिची शमावी प्यास ?
पहाटवारा सुटला शीतळ, तेवत होती समई
सहज तियेला किञ्चित आली गुङ्गी शीतळ समयीं
भ्रमत राहिला परि गुङ्गींतहि तीचा वत्सल आत्मा
थेम्ब पापणीवरी अश्रुचा लोम्बत होता सरता
अर्धोन्मीलित नयनें ती का होती ध्यांत पहात ?
ब्रम्हाण्डाचें बिम्ब बिम्बलें होतें का बिन्दूंत ?
त्याच बिन्दुमधिं दिसूं लागली अगम्य तिज कीं सृष्टी
अथाङ्ग डोहीं शिशु चालविला नक्रें अपुल्या पृष्ठीं
बघतां बघतां डोह पावला रूपान्तर बागेंत
नक्र होउनी अदृश्य तेथें सर्प दिसोनी येत

दंश करूनी शिशूस, विळखा गळा आइच्या घाया
फुम्फाटत निज फणा हापटित लागे तो धावाया
तोंच भरोनी उरांत धडकी गुणिला झाली जागी
स्वप्नाचें मिथ्यत्व कळूनहि भ्याली बसल्या जागीं
स्वप्नाची जोडून साखळी अपुल्या सद्यःस्थितिशीं
वदे विव्हला 'छळ दुर्दैवा ! कोठवरी तरि करिशी !'
अनेकदा ज्या उठुन निमाल्या त्याच कुशङ्का फिरुन
उसळुन वेगें बोलविती कीं आर्तगीत हें करुण ९५२

[ जाति-कन्चनी ]

सञ्जिवा ! शोधुं कुठें तुज आतां ?
जाहली व्याकुळ ही तव माता.
तुजवाचुनि शोकार्णवीं कुणी ना त्राता.
बुडाली मम सौभाग्य-धरित्री
प्रळयिं ह्या परि आशा-वट-पत्रीं
अङ्गुष्टमूर्ति तूं माझी विश्वविधात्री
तुझा मी सदाकदा करि राग
म्हणुन का करसी माझा त्याग ?
ही अघोर शिक्षा सोसु कशी परि साङ्ग ?
लागली तुझिया मार्गीं दिठी
धावुनी घाल गळ्याला मिठी
तव मुका घेउं दे धरुन करीं हनुवटी.
लागली रात्र ओसरू पाही
उजळती दिशा हळूहळु दाही
अन्धार दाटुनी हृदयीं परि ह्या राही.

येतसे उदयाचलिं रविराणा
त्यासवें येवो माझा कान्हा
विकसुं दे फूल जें आलें माझ्या प्राणा.
एकली सीता मी वनवासीं
रात्रते तारा कीं परदास्यीं
का अखण्ड रजनी परि माझ्या रविवंशीं ?
पाडसा, दूर कुठें गेलास ?
कुठें तूं गुन्तलास फसलास ?
ह्या जगांत खोडे ठायीं ठायीं फास !
गुम्फुनी मृदु धाग्यांचीं जाळीं
खुनी तो ठेवी कपटी कोळी
गुरफटती माशा घुङ्गुरटीं मग भोळीं !
दिसे ही धरणी मोहक कुरण
आणि तूं उच्छृङ्खल शिशु-हरिण
तुज कसा दिसावा व्याध बसे जो टपुन ?
घालिती घिरट्या गगनीं घारी
उचलुनी नेति पिलें माघारीं
दाटले जगीं या ऐसे कैक शिकारी
तुझी तर अवखळ वृत्ती भारी
माझिया येसि न कधिंही हारी
पडलास कुठें का असल्या कारागारीं ?
शिवाई, छळसी कोठवरी गे ?
तटातट तुटति जिवींचे धागे
मज भेटवि माझ्या चिल्हया बाळा वेगें ! ९९१

प्रश्न पुन्हा "पडलास कुठें का असल्या कारागारीं"
उचम्बळोनी हुन्कासारीं तीचें वक्ष विदारी. ९९३

दीप हतप्रभ दिसूं लागला, उजाडलें बाहेर
उषेस केला फुलझाडांनीं पुष्पांचा आहेर
चिवचिव किलबिल सुरू जाहली पक्षांची परसांत
प्रभात सुन्दर उत्साहाची अखण्ड कीं बरसात
विश्व लागल विकसायाला असल्या मङ्गल काळीं
म्लानमुखी परि देवघरामधिं गुणिला अश्रू गाळी
सञ्जीव न कां अजुनी परते ? परतले न कां पन्त ?
शोषित होती रक्त तियेचें तीव्र वाढती खन्त.
निशा न ज्यांची सरली त्यांना हास्य उषेचें काय ?
प्रसन्नता लागते अन्तरीं अवलोकाया बाह्य.
आंत पेटली आग, कशाला चन्दनलेपन अङ्गीं ?
आंत जरी अन्धार, सुखवि का इन्द्रधनू बहुरङ्गी ?
आंत तोडिते वृश्चिकसेना, कशास तनुशृङ्गार ?
शरतल्पींच्या रुचेल जीवा का पुष्पांचा हार ?
जरी अङ्गणीं प्रचण्ड पडली गारांची जलवृष्टी
निवेल तीनें काय आंतली तप्त सहारा-सृष्टी ?
प्रसन्नता जरि अन्तर्यामीं तरीच भवनीं भुवनीं;
प्रबळ आंत जे विकार येती तेच भोंवती दिसुनी.
गुणिलेचा नव्हताच उगवला बालभानु सञ्जीव
सञ्जीवाची तिनें न अजुनी आयकिली चिवचीव. १०१३



भोंवळ आली क्षणींच तिजला पन्तांनीं सावरली... (पान ७३)

दार वाजलें ! विजेपरी ती धांवत गेली दारीं
चरके पाहुन पन्त एकले अधोवदन ती स्वारी.
“शोध लागला काय ? कुठें हो आहे माझा बाळ ?
मुके असे कां ? खिन्न असे कां ? नाहीं काय खुशाल ?”
वृत्त निवेदन कसें करावें सुचेच ना पन्तास
निमिषाचाही विलम्ब गुणिला मानित होती तास.
“तुरुङ्गांत तो पडला !”—श्रवणीं पडता शब्द ‘तुरुङ्ग’
गुणिलेच्या जणु पायाखालीं घेई स्फोट सुरुङ्ग.
भोंवळ आली क्षणींच तिजला पन्तांनीं सावरली
पन्तांची तनु रोमाञ्चांनीं कसल्याशा मोहरली
अश्रूंचे ढग थिजून बसले होते गुणिला-गालीं
केश विखरुनी कांहिं उतरले होते तिचिया भाळीं
रडुनी रडुनी आली होती नाकावरती लाली
पापण्याहि त्या लाल जाहल्या होत्या वरती खालीं
वृकोदराच्या हातावरुनी लोम्बत होती मान
कण्ठ मोकळा तरीहि मोहक कमलनाल कीं म्लान
सरला होता पदर बाजुला स्थितींत त्या बेशुद्ध
गुणिला-रूपीं निमिष गुन्तले पन्त जरी हतबुद्ध
अनपेक्षित हा प्रसङ्ग पाहुनि गोन्धळले जों पन्त
काय वाजलें म्हणून आली तोंच यशोदा तेथ १०३३

ये नशिबीं एकान्त कोठडी; क्षणीं लागलें दार
एकान्ताचा होइ कोंवळ्या हृदयावरती वार.
चालू होते सभोंवताली इतरांचे व्यापार
परी कोठडीपल्याड त्याच्या जगता नव्हता पार
सञ्जीवाचे कर्म-सहोदर इमारतींमधिं अन्य
कविता-पठणीं ओतित होते स्वाभाविक चैतन्य
फळ्यावरी जो लिहिला होता श्लोक अक्षरीं ठळक
तो पढताना विद्यार्थ्यांचे निर्लेपचि हृत्फलक
शब्दार्थापलिकडे जयाचा भाव उमटला नाहीं
श्लोक घोकतां निनादलें परि शाळागृह तें पाही
"सत्यपणा भाषणीं, वर्तनीं यथातथ्यता राखा
विवेक पोटीं, सद्‌गुण हृदयीं, तरिच मान्यता चाखा" *
कितीक पारायणें मुलांनीं श्लोकाचीं ह्या केलीं
सञ्जीवाच्या कर्णपुटीं तीं भरुन अक्षरें ठेलीं
तर्येहि होता श्लोक घोकला पहिल्या शाळेमाजी
प्रतीत झाला पुरा तया परि भाव तयांतिल आजी.
श्लोक सरुन ह्या मुलें लागलीं गाया दुसरें गाणें
पठणाचें प्राविण्य दावणें ईर्षा जो तो जाणे

* बरें सत्य बोला यथातथ्य चाला । बहू मानिती लोक येणें तुम्हाला
धरा बुद्धि पोटीं विवेकें तुम्ही हो । बरा गुण तो अन्तरामाजि राहो ॥

वाळांनो ! पाळा, पाळा, पाळा आज्ञा वडिलांची.
वाळांनो ! माना, माना, माना, वचनें देवांचीं
वाळांनो ! जोडा, जोडा, जोडा सङ्गति सभ्यांची
वाळांनो ! तोडा, तोडा, तोडा सङ्गति दुष्टांची
शास्त्राचा ऐका, ऐका, ऐका ऐसा उपदेश.

मानवतेला जाग यावयापूर्वीं वालक छात्र
काय तयाला नीतिबोध तो जेव्हां असतो यन्त्र ?
जरी तयाच्या पठणशक्तिचें भरलें जातें पात्र
तदुपयोग परि कसा करावा ही न जागृती मात्र.
यान्त्रिकता परि आज लोपली होती सञ्जीवाची
जागृत होउन सजीवता ती भाव पदांतिल वेची १८५७

घटिका गेल्या, प्रहर सम्पले, सूर्यहि अस्ता गेला
उतराया भूवरी खुला पथ झाला अन्धाराला
सञ्जीवातें घेइ पोटिशीं तोच तदा अन्धार
तों हृदयाची पावुं लागली कम्प हळूहळु तार.
प्रकाशास जन वृथा वानिती; महती काळोखाची
अन्तर्दृष्टीविना कधीं का कुणास समजायाची ?
प्रकाश देई ओळख करुनी बहिरङ्गाची मात्र
अन्तरङ्ग परि उकलायाला प्रकाश नाहीं पात्र
काळोखांतच आत्मनिरीक्षण जीवातें करुं येतें,
प्रकाश वञ्चक; जागृत रात्री म्हणून षड्रिपु-जेते

अन्धारांतच एकान्तामधिं विवेक-दीपज्योती
अश्रूंनीं प्रज्वलीत होउन झणीं निवारी भ्रान्ती
होता चित्तध्वान्त-निवारण आपण कोण कुणाचे
अन्धाराच्या फलकावरती हाच चित्रपट नाचे.
चार भिन्तिनीं दिली आंखुनी एक खणाची खोली
सञ्जिवास परि वाटे आपण अमर्याद भूगोलीं—
पडलों आहों; आणि न कोणी आपुलिया समवेत.
अन्धारीं निज पार्थिवताही नाहीं दिसुनी येत !
देहविसर्जन होउन आत्मस्वरूप जेंवि उरावें
स्थितींत तसल्या आत्मानुभवीं विलीन मुनिनें व्हावें
सञ्जीवाची तीच अवस्था झाली काळोखांत
गत गोष्टींचें दर्शन घडवी तोच तेथला ध्वान्त १०७९

"जन्मा येउन समुन्नतीला स्वकुळ जयानें नेलें
सार्थक त्यानें निज जन्माचें इह पर लोकीं केलें" *
निज सदनींच्या भिन्तीवरचें मुळांत संस्कृत वचन
आणि तयाच्या अनुवादाचें झालें त्यास स्मरण.
निज मातेची ह्या मन्त्राची शिकवणूक नित्याची
निजान्तरीं नच कधिं बिम्बवली स्मृति ही आतां जाची
"मातेवाचुन लोकीं नाहीं दैवत दुसरें श्रेष्ठ"§
दिव्य सुभाषित-दीपज्योती; आज तियेचा स्पष्ट—

* स जातो येन जातेन याति वंशः समुन्नतिम् ।"
§ न मातुः परदैवतम् ।

प्रकाश पडला होउन उघडें हृदयमन्दिर-द्वार
कांपु लागली आणि तियेच्या अवगणनेची धार.
निज मातेच्या पदराखालीं केलेलें स्तनपान,
निज मातेच्या वत्सल नजरेखालीं घडलें स्नान,
निज मातेच्या अङ्कावरती केलेलें सुखशयन,
निज मातेच्या स्कन्धीं कटिवर अपुलें क्रीडास्थान,
निज मातेनें भरवियलेलें सुधातुल्य ते घास,
निज मातेनें सोशियलेले अपुल्यासाठीं त्रास,
निज मातेच्या आक्रोशाला घालविलेला काळ,
स्मृतिफलकावर सरूं लागले देखावे अळुमाळ. १०९७

अवचित व्हावी दृढ खचलेल्या मेघमण्डळीं बिजली
मरुप्रदेशीं रम्य वनश्री अवचित जावी सृजली
जडास किंवा अवचित व्हावी दिव्य प्रतिभा-स्फूर्ती
अवचित व्हावी जुनाट पडक्या सरोवरीं जलपूर्ती
अवचित व्हावा शून्यामाजी कांहिं अलौकिक भास
अकस्मात तों तशीच आली जागृति सञ्जीवास.
बाल्य निमालें, क्षणांत आली आईची जाणीव
परवशतेची हीन दशेची तिच्या दाटली कींव
हृदयाब्धीवर उठूं लागल्या लाटांवरती लाटा
अश्रु-मिषानें साण्डुं लागल्या दों नयनांच्या वाटा.
अभ्यासामधि लक्ष घातलें नाहीं आपण कांहीं
सन्ध्या-वन्दन तेंहि रोजचें नेमें केलें नाहीं

केंवि तियेला सुखवावें हा विचार शिवला नाहीं
शब्द तियेचा उपदेशाचा हृदयीं धरला नाहीं.
दिन रजनीं पाहिलें बुडे ती दुक्खाच्या जरि डोहीं
हात तियेला द्यायाचा सुतधर्म न सुचला कांहीं.
रोज पाहिली एक भिकारिण - नेत्र जियेचे खाचा—
वाट चालते हात धरोनी परि अपुल्या पुत्राचा
सुचवी तिज तों मार्गामधल्या खाचा, काटे, दगड
अवघड मार्गक्रमणा तिजला केली त्यानें सुघड.
परन्तु माझ्या मी आईला झालों केवळ भार
माझ्यासाठीं बघणें आलें तिज परक्याचें दार!
चार घरें हिण्डून तिला मी कां न घातलें खाया?
जन्म घेउनी तिचिया पोटीं गेलों कीं मी वाया!
इकडे आलों! आई, तुजला असेल कां हें कळलें?
कळुनी अन्तःकरण तुझें कां असेल गे कळवळलें?
म्हणशिल कीं "हें झालें एकापरी जाहलें छान
कुळबुडवा कारटा कशाला? असुनी नसुनि समान!"
शेवटचा हा विचार उठतां आले अश्रू खालीं
आणि भिन्तिला टेकुन वसुनी मुक्त मनें तो गाळी. ११२७

कधीं कधीं तों स्मरणीं येती उनाड कांहीं स्नेही
गुन्हे जयांचे झाकायाला मायबाप ते गेहीं.
एक दुज्याची दौत लपवितो, नेतो चोरुन बोरू
यांत खरी तरबेज एक ती जोडी शामू-मोरू

कितीक केल्या आणि पचविल्या त्या मोरूनें चोऱ्या
मात्र बनावट गुन्ह्यामुळें मी उद्या झाडणें मोऱ्या
न्याय कसा हा? खुले हिण्डती खरेखुरे ते चोर
परि माझ्या दण्डास बिलगला पोलीसांचा दोर
कैकांचीं विकलीस पुस्तकें शाम्या, तूं बाजारीं
साव मात्र तूं आणि डाम्बलें मजला कारागारीं
खरी शिताफी तव बापाची राघोबल्लाळाची
सङ्गत ऐशी तुझी बाधली; मर्जी देवाजीची!
बडे बापके बेटे त्यांचे कैवारी सगळेच
परि गरिबांच्या गळ्याभोंवतीं आवळती जन पेंच! ११४१

अशाच कांहीं स्मृती आणखी माजविती काहूर
अधिकाधिक तों होइ तयाच्या खलवृत्तींचा चूर
कधीं कधीं तर दाटे अङ्गीं क्षोभाचा बहु वारा
वाटे जावें तोडुन फोडुन उल्लङ्घुन ही कारा
आणि जाउनी जगांत फिरुनी राबावे दिनरजनी
काया-वाचा-मनें आपुली सुखवावी प्रिय जननी
एकनिष्ठता बघुन आपुली तृप्त तियेनें व्हावें
तृप्तपणानें वात्सल्याचे अश्रू नयनीं यावे.
त्या अश्रूंनीं आपण व्हावें कृतार्थ आणि पुनीत
एकमेव ह्या ध्येयें अपुलें व्हावें आयु सुनीत
उत्कर्षें या विचारोर्मिच्या झोम्बी घेइ गजाशीं
निज दौर्बल्यें कळे लढावें मशकें केंवि गजाशीं!
हताश होउन बसे शेवटीं खालीं आ वासून
करी संयमन 'जातिल अपुले हेही दिवस निघून' ११५५

दिवस सम्पले सञ्जीवाचे एकान्तीं कुजण्याचें
दिवस सम्पले बद्धावस्थेमाजी तडफडण्याचे
दिवस सम्पले आठवणींनीं व्याकळून जायाचे
तेथिल नियमानुसार आले मुलांत मिसळायाचे. ११५९

सञ्जीवाचे कर्मसहोदर हासत खिदळत होते
बघणारांना गमावेच कीं मगज तयांचे कोते.
खरेंच; त्यांना भेसुर परि तो भावी काळ अगम्य !
परिपाठानें नीच स्थितिही व्हावी काय न रम्य ?
सामान्यांना– त्यांत मुलांना काय मागचा पुढचा–
विचार ? भिजविल विशाल जमिनी पाणी केवळ कुडचा ?
काय कोवळे अङ्कुर भिडतिल अस्मानीं पाताळीं ?
चण्ड तरूंचीं मुळें मस्तकें स्पर्शतील हीं दोन्ही !
आयुष्याच्या सागरांत जे दीपगृहसे उन्च
दृष्टीक्षेपीं तयांस केवळ पुढील मागिल पोच;
तळाशींच परि वावरणाऱ्या जीवाणूंना क्षुद्र
काय कल्पना अथाङ्ग किंवा किति विस्तीर्ण समुद्र ?
इमारतीभोंवती ताटवे फुलझाडांचे फुलले
होते तिथल्या बाळांचेही तेवि चेहरे खुलले;

तुरुङ्गामधें आपण फुलतों जाणीव न ही सुमनां
मुळें गमावीं तेंवि तेथलीं वरवर बघणारांना.
बोथटलेली नव्हति भावना परन्तु सञ्जीवाची
समोंवारची घडामोड ती सावधतेनें वाची. ११७७

दिले आखुनी तैसे झाले धन्दे चालू सारे
आपआपुल्या कामावरती रुजू जाहलीं पोरें
बगीच्यामधें फुलझाडांना घाली कोणी पाणी
स्वैर वाढल्या जाइजुईची करी कापणी कोणी
कीड तयांना नच लागावी यास्तव कोणी दक्ष
काढुन टाकी कुणी खालती पडलीं पानें रुक्ष
ढासळलेला वेल चढवितो कुणी माण्डवावरती
स्वयेंच कोठें प्रतान नाजुक हळूहळू वर चढती.
सञ्जीवाचें चित्त दङ्गलें दृष्य देखतां नयनीं
खिन्नपणाची आश्चर्याची छटा उमटली वदनीं. ११८७

ग्रन्थबान्धणी चालू होती दुसऱ्या वर्गामाजी
चुकतां कोणी साङ्गत होते तयास ते पन्तोजी
विसकटलेलीं जुळवुन पानें एकामागुन एक
अनेक सोपस्कार घडवुनी पुस्तक होइ सुरेख
गलितपर्ण वा मलिनवर्ण जो रूप पालटे त्याचें
त्यक्तमुखीं ही संस्कारानें मोहकता नव नाचे.
हाच तेथला प्रकार बघतां मानस सञ्जीवाचे
रमून जाई आणि काहिंसें आंत तयाला टोचे. ११९५

समीप दुसऱ्या इमारतीमधिं कारागिरिंचे अतुल्या
सुतार देई परोपरीनें पाठ मुलांना तिथल्या.
ओबड-धोबड लाकुड, त्यावर रन्धा आणि पटाशी
फिरुनी ये आकार मनोहर होतां काम कळाशी
पाय कुणी कातीव सारखे करी पलङ्गासाठीं
कुणी लाकडी करी खेळणीं, कुणी गाडिची साठी
देव्हारा घडविण्यांत गेला गढुनी कोणी एक
काम कौतुकास्पद तें झालें गोण्डस डौल सुरेख
मूळ लाकडी ज्या तुकड्यांना नव्हतें मोल, न महती,
नव अवतारीं सौभाग्याला आली त्यांच्या भरती.
स्थापन होता देवाजीच्या मूर्ती त्यांत उद्याला
तया लाभतिल देवांसङ्गें सुगन्ध द्रव्यें माला
विचार डोकावला मानसीं सञ्जीवाच्या जों न
कानीं आलें लोहारींतिल घाव घणाचे दोन. १२०९

आणि तयाचे सहज तेथुनी वळले लोचन तिकडे
तप्त लोह ठोकतां त्यांतुनी उडतीं ठिणग्या चिपडें
भट्टी फुलुनी ज्वाळा निघती धापा टाकी भाता
होरपळे लोखण्ड त्यामधीं म्हणुनि शुद्धता हाता.
समय साधुनी योग्य घालतां तत्परतेचे घाव
मनाजोगत्या ये आकारा कुऱ्हाड, खुरपें, धाव.
अशीं दुकानें पूर्वीं त्यानें काय पाहिलीं नव्हती ?
मनश्चक्षुची परी पापणी कुठें उघडली होती ?

आज नव्यानें परन्तु असलीं दृश्यें अवलोकून
गमे तया कीं गीत निनादे वातावरणांतून — १२१९

"सावध सावध बाळजिवांनो ! नीरव उद्यमगीत
घुमे येथ जें कान मनाचे करून ऐका नित्य.

प्रतान कोमल निज शीलाचा खालीं ढासळलेला
उच्चपदाला चढवायाची साधा सत्वर वेळा
असाच फोफावुनी खालती जर का होइल जून
येतां जातां जाइल जो तो तयास लाथाडून
परिस्थितीची असो कशीही कमान बिलगुन तिजला
चढून वर विस्तार पावतां व्हाल सुखप्रद सकलां
कर्तृत्वाचीं फुलुनी सुमनें चारित्र्याचा गन्ध
दरवळताना विरतिल लोकीं नैराश्याचे बन्ध १२२९

"सावध सावध बाळजिवांनो ! नीरव उद्यमगीत
घुमतें येथें कां न उठवि तें तरङ्ग हृदयाब्धींत ?

डागळून हा झडुन चालला आयुष्याचा ग्रन्थ
हेळसाण्ड कां करता त्याची ? कां न वाटते खन्त ?
मालिन्याचें करुन निवारण अजून सजवा त्यास
न चाळलेलीं पुढचीं पानें पावावीं नच नाश
ग्रन्थ असावा कीं भरलेला मधुर रसाचा पेला
ग्रन्थ दिसावा कीं पुष्पांचा सुगन्ध निर्मल झेला

आणि रहाव्या खिळून नजरा रसिकांच्या त्यावरती
जसे पिपासु भ्रमर घालती रुन्जी पुष्पांभवती. १२३९

"सावध सावध बाळजिवांनो ! नीरव उद्यमगीत
श्रवुन येथलें कां न उसळतें पराक्रमाची प्रीत ?
असो कोणत्या तरुची फान्दी कुठल्या विपिनांती
करिते कारागिरी तियेचा देव्हारा वा कील
स्वैर वर्तनें जाचक फुटले निज हृदया खोम्बारे
हत्यार त्यांवर चालविण्याची कसूर न करी वा रे
देवाजीच्या वसतीसाठीं देव्हारा निज हृदया
करावयाची हाव बाळगा, भाग्य यावया उदया.
उत्कटतेनें उच्च पदाचा बाळगतां हव्यास
असिधाराव्रत मृदुतर होई मृदु कुसुमाहुन खास ! १२४९

" सावध सावध बाळजिवांनो ! नीरव उद्यमगीत
घुमुनी वदतें व्हावें लागे लोहातें नवनीत.

प्रखरपणामधि परिस्थितीच्या दीप्ती व्हावी प्रगट
विपदेचे आघात बैसतां रूप खुलावें उलट
घोर तपें लागती कराया नांव रूप यायास
देवपणाची हाव जरी तरि घाव टाकिचे सोस.
घाव चुकवितां नांव कोठलें ? मातींतच मग कुजणें !
कसा बाणणें प्रभाव अङ्गीं ! प्रकाश कोठुन दिसणें ?
काय जगावें जिणें व्हावया केवळ माती-मोल ?
जिणें ज़गावें अवलोकुन जें धरील जनता डोल ! १२५९

"सावध सावध बाळजिवांनो नीरव उद्यमगीत
कान मनाचे करून ऐका व्हाया आयु सुनीत
काय जगावें विश्वोद्यानीं कण्टक होण्यासाठीं ?
पुष्प-मनोरमपणा यावया कराच आटाआटी !
काय जगावें भूगर्भीं वा विपिनीं कुजण्यासाठीं ?
देव्हारे व्हा, देवमूर्ति व्हा येउन पृथ्वीपाठीं !" १२६५

झुळझुळ वाहुन पहाट-वारा, रन्ध्रारन्ध्रांतून
पाजित होता या गीताचे घुटके गोन्जारून
कुणास ठावे किती जणांच्या भिनलें अङ्गीं कांहीं
परन्तु अम्मल चढूं लागला सञ्जीवाच्या देहीं
तन्मयतेनें सभोंवतींचीं होता दृष्यें बघत
तोंच तयाला सवङ्गड्यानें सावध केलें त्वरित
"काय पाहसी उगाच मूर्खा, मार हवा का तुजला ?"
भय शिक्षेचें वाटुन जलदी काम कराया सजला. १२७३

दिले आखुनी तसे चालले होते सारे धन्दे
लोहारीमधि घाव घणाचे सुतारीमधी रन्धे
साफसफाईसाठीं होती हिण्डत झाडू-फैल
ठावें सकलां कुचरा करतां होतिल चमडी सैल.
एकाएकीं अवेळींच तों कर्कश झाली घण्टा
बोले जो तो 'कुणावरी तरि फिरायचा वरवण्टा'

पटाङ्गणीं अविलम्बें जमले टाकुन सारीं कामें
पुकारलीं जातात कुणाचीं ऐकाया तीं नामें.
एकामेकाकडे पाहती प्रश्नार्थक नजरेनें
क्षम्य न होइल कुजवुजणेंही वरिष्ठास ह्या भेणें.
तोंच मधोमध दाखल झाले रुबाबांत साहेब
क्षणीं स्तब्धता गाढ पसरली; काय दरारा दाब !
" जमादार, द्या गण्यास घोडी, मारा फटके आठ
खराब कामें करील त्याची अशीच फोडा पाठ "
हुकूम ऐकुन गणू लागला थरथरथर कापाया
म्हणे ' करा सरकार माफ ही शिक्षा, पडतो पाया '
अशा गुन्ह्याला माफी कुठली ? करून त्यातें नग्न
छड्या सपासप बसल्या वेगें; झाल्या श्रोणी भग्न
कान गणूच्या आरोळ्यांनीं, लोचन देखाव्यानें
भरून गेले सर्व मुलांचे, हृदय चरकलें त्यानें.
प्रथमच घडला सञ्जिवास ह्या देखाव्याचा लाभ
थिजून गेला जीव तयाचा बसून दुस्सह दाब
तोंच तयाचा कान धरोनी साब बजाविति त्यातें
"पाहिलीस कां घोडी ? सीधा वागशील ना येथें ? "
दणाणलें तों धाबें त्याचें, थरथरलें बहु ओंठ
कान जाहले लाल जसे कीं प्राजक्ताचे देठ.
तोंच पातली साहेबांची कन्या त्यांच्या जवळीं
प्राजक्ताच्या कोमलतेची मूर्तिमन्त ती पुतळी.
कान सोडुनी सञ्जिवाचा साहेबांनीं दिधला
आणि सञ्जिवाकडे बघे ती अनुकम्पेनें बाला. १३०३

आपआपुल्या कामावरतीं पुन्हा परतले सारे
भिरभिर वाहुन थण्डगार ते झोम्बत होते वारे
धस्स होतसे मधुनी मधुनी सञ्जीवाच्या हृदयीं
दिवस लोटला कामामाजी आणि रात्रिच्या समयीं—
खाटेवरती पडल्या पडल्या निद्रावश नयनांस
दृश्य गणूच्या शिक्षेचे तें भिववूं लागे त्यास.
जरा कुठेसा लावावा जों डोळा तों दचकून
पुन्हःपुन्हा तो जागा होई, दृश्य न जाइ विरून.
अखेर गेला झोपीं, तेथहि दृश्य देखिलें तसलें
मुलें दोनशें भवतीं जमलीं, नांव निघालें अपुलें
लगेच घोडीवरी चढविले, वळवळणारा वेत—
घेउन सरसावला शिपाई करीत हात हवेंत
तोंच पातली पुतळी तेथें सान कोंवळी कदली
सञ्जीवास्तव केली तिचिया अश्रूंनीं रदबदली
झाली अपुली लगेच सुटका, बिलगे येउन पुतळी
व्रण रज्जूचे बघुन हळहळे, चाचपुनी कुरवाळी.
स्वप्न भयानक, गोड तयाचा परन्तु शेवट तसला !
जागा होउन भयें विस्मयें उठून सञ्जिव बसला ! १३२१

साहेबांची — सरकारांची — सुता लाडकी गोड
चाले अहमहमिका मुलामधिं तिचे पुरविता कोड
मित्र तिचा जो त्याच्यावरती साहेबांची मर्जी
तयांविरुद्ध न रुजू व्हायची कोणाचीही अर्जी
म्हणून तिचिया मैत्रीसाठीं तत्पर जो तो छात्र
शुभ्र कबूतर पुतळी जणुं ती सुधारसाचें पात्र
सोनसाखळीपरी तियेचें लवलवणारें अङ्ग
गुलाबकलिकेपरी शोभतो तिच्या तनूचा रङ्ग
टपोर, चञ्चळ, लाडिक डोळे मोहक त्यांतिल पाणी
लाडिकतेची कला जाणते तशीच मञ्जुळ वाणी
ओठ सुकोमल रेखिव लाली बारिकशी ती जिवणी
खळ्या उमटतां मुके मटामट घ्यावे वाटे धरुनी
विविध भूषणीं पोषाखांनीं सजवी तिजला आई
सानच ठेवण — उचलुन घ्याया करि मग जो तो घाई
तलम रेशमी तिचीं पोलकीं सोनसळी ती चिरडी
हळूंच खोडी काढुन कोणी तिजसी आणी चिरडी
मग रुसव्याची नाक-फुगवटी गालावरची लहर
बघणाराच्या पोटीं कुतुकें अमित माजवी कहर
अभिनय सुचवी अजुन सावली गेलि न बालिशतेची
रुधिरवाहिन्या नील दाविती सीमा नाजुकतेची

ताम्बुस तेजें जेंवि समइच्या खुले चान्दिची मूर्ती
तशीच शोभे त्या पुतळीची मृदु देहाची कान्ती
लाडिकतेनें तिला म्हणावे 'पुतळी' ज्यांनीं त्यांनीं
परि रसिकांनीं 'हिन्दु कुळीं ही जन्मे नव मस्तानी'
अशी अनन्या सुन्दर कन्या म्हणुन धन्यता पितरां
नेत्रसुखाचा विषय जाहली तेथिल सकाळां इतरां १३४७

निर्दयतेविण मुखीं न ज्याच्या दुजा दिसावा भाव
परि कन्येस्तव जनकापोटीं अथाङ्ग भरली माव !
सौम्यपणाची कधीं न भाषा ज्या जिव्हेला शिवली
तीच कशी वात्सल्य वोलते येता पुतळी जवळीं !
दृश्य देखतां असें मुलांना वाटे बहु आश्चर्य
कैसा सायन्तनीं विसरतो निज प्रखरता सूर्य ?
मत्त गजेन्द्रहि मार्गामधल्या शिशुसाङ्गाती खेळे
पुङ्गीच्या सङ्गीतरवानें मुदें फणीन्द्रहि डोले
स्त्रीसौन्दर्यें वन्य श्वापद हिंस्रपणा निज विसरे
त्रिगुणमूर्ति ती पुतळी करि त्या उग्र मुखातें हसरें १३५७

त्या दिवसापासून तियेचा खेळगडी सञ्जीव
वाल-भानुच्या कां किरणांनीं नुमलावें राजीव ?
आणि अतां कधिं सात्र दटावुनि वदले 'देइन फटके'
सञ्जिव समजे मनांत तरि 'हें केवळ उसनें लटकें'

परन्तु लाजुनि हासत गालीं खालीं घाली मान
अशा अभिनयीं सरकारांचा राखितसे सन्मान
कोपवचें त्या परन्तु किञ्चित सचिन्त पुतळी होई
उभय मुखातें बघत, पित्याच्या हळूंच विलगे पायीं
लोपुन लटका राग आणि ते क्षणान्तरें जों हंसती
पुतळीच्या हो फिरुनी वदनीं प्रसन्नतेची वसती
मेघ कोरडे पाङ्गुनि जातां जसें खुलावें गगन
वदन तियेचें विलसे मोदें ताराङ्गण ते रदन १३६९

सञ्जीवावाचून तियेच्या येइ न खेळा रङ्ग
गोड तियेला खाऊपेक्षा सञ्जीवाचा सङ्ग
विशेष कांहीं मिळतां खाया सञ्जीवावाचून
घास जायचा घशाखालती सहसा नाहिं चुकून
ठेवी साम्भाळुनी जरी तो असला कोठें दूर
पडेल केव्हां गांठ तयाची लागे तिज हुरहूर
कधीं म्हणे ती 'घे हा माझा शाळेतिल अभ्यास'
आणि आदरी तयास मानुन वसिष्ठ किंवा व्यास
वसिष्ठ किंवा व्यास कोठलीं नामें तिज हीं ठावीं
परि सञ्जीवा गणुनी गुरुसम अलोट आदर दावी
आणि खेळतां गळ्यांत घालुनि गळा तयाशीं खेळे
अभेदपण तें अतुल तियेचें दिसुन येइ त्या वेळे
परन्तु चित्तीं बुजे सोबती बघुन तिची ती सलगी
कारण आपण केवळ लोम्बी रत्नखचित ती कलगी

पुतळीला हा भेद कोठला कोण थोर वा हलका?
व्यवहाराचा असल्या तिचिया सम्पर्क न हलका
आपण येथिल वरिष्ठ, कैदी गुलाम अपुले सारे
नव्हतें असल्या अभिमानाचें तिजला शिवलें वारें
बिम्ब जयाच्या दिसेल वदनीं अन्तर-निर्मळतेचें
असो अमङ्गळ जुळे तयाशीं नातें सहजीं तीचें
तिला आवडे गडी – जयाची मनोवृत्ति ना निन्द्या
कितीहि मग तो असो दरिद्री, लेवो चिरगुट-चिन्ध्या
दिनानुदिन तों परस्परांच्या अगाधता ये स्नेहीं
आपुलकीनें सञ्जिव रमला साहेबांच्या गेहीं
शिस्तीमाजी मिळूं लागल्या आणि सवलती त्याला.
जशी उन्हाळ्यामधें मिळावी छाया पान्थस्थाला
आणिक आलें मार्दव खडतर कारागृहवासांत
कडा ढगाची जशी खुलावी तेजाच्या वलयांत. १३९७

---

पति-पत्नींच्या उपचारांनीं झाली सावध गुणिला
पुसे क्षणीं त्या "आणिलेंत का माझ्या कण्ठमणीला"?
परन्तु देखुनि पति-पत्नींच्या न-कार वदनावरती
मूर्छित झाली फिरून, मिटल्या तीच्या लोचनशुक्ती.
दडपुनि गेलें मन पन्तांचें देखुन पर्यवसान
मानस दुसरें चेतवीत जरि होतें नव अवसान.
थरावरी या येतिल गोष्टी तया कल्पना नव्हती
दिसूं लागलीं मनांत चित्रें भीषण भलतीं-सलतीं
कोमल कलिकेवरी ओतलें आपण पाणी कढत
कापुरमूर्तीवरी ठेविला केंवि निखारा जळत! १२०७

पुनश्च झाली सावध गुणिला जाता कांहीं घटका
मावळला मग पन्तांचा तो पश्चात्तापहि लटका
"आणिलेंत का" ह्या प्रश्नानें नवीन सुचला बेत
डाव वकीली परिस्थितीचा वळवायाला वेत.
"असं काय हो धीर सोडतां? सावध व्हा कीं बाई,"—
म्हणे यशोदा "उपाय पाहूं सुचतो का तरि कांहीं!"
सहानुभूती पन्त दाविती सचिन्तपणही थोर
म्हणती गदगद वचें "तुम्हाला अधिकाधिक हा घोर!

थाम्बा बाई, बऱ्या तुम्ही व्हा; मन ठेवा खम्बीर"
वदुनी इतुकें मधेंच झाले पन्त जरा गम्भीर.
"अतां समजलों, घेतों पुरता या कृत्याचा ठाव
वाईटावर माझ्या त्यांचा दिसतो सारा डाव!
बरें न बघवे माझें ज्यांना बसलेलें बस्तान

न.
ला
ठी अबला!
ड;
ोड!
क्रील
ग्र अपील".
सासा,
सा.
ून
हणुन!" १४३१

ा
नरला.

व्याधी
मर्नी
ा वरुनी

पुस्तक बन्दीशाळा
विभाग : काव्य
नोंद क्र.
क्रमांक 623

पति-प
पुसे क्ष
परन्तु
मूर्छित
दडपुनि
मानस
थरावरी
दिसूं
कोमल
कापुरु

पुनश्च
मावळ
"आ
डाव
"असं
म्हणे
सहानु
म्हणत


थाम्बा बाई, बऱ्या तुम्ही व्हा; मन ठेवा खम्बीर"
वदुनी इतुकें मधेंच झाले पन्त जरा गम्भीर.
"अतां समजलें, घेतों पुरता या कृत्याचा ठाव
वाईटावर माझ्या त्यांचा दिसतो सारा डाव!
बरें न बघवे माझें ज्यांना बसलेलें बस्तान
तयांचेंच हें कुटिलपणाचें दिसतें कारस्थान.
कींव तयांच्या मूर्खपणाची परन्तु येते मजला
न कळे त्यांना जाइ दुखविली अनाथ भोळी अबला!
बघून घेतों अतां, तयांची पुरी मोडतो खोड;
खुडुन टाकतों दुष्टपणाचा पार मुळांतच मोड!
कसें खुळ्यांना हेंहि कळेना आहे मीहि वकील
बऱ्या तुम्ही व्हा; बाई, आपण करूच शीघ्र अपील".
वच पन्ताचें श्रवुनी सोडी गुणिला दीर्घ उसासा,
निद्रावश हो निर्जल कूपीं तळमळणारा मासा.
आणि परतले हलक्या पायीं पति-पत्नी तेथून
वदे यशोदा "व्यर्थ घेतलें जळतें घर का म्हणुन!" १४३६

आघाताच्या असह्यतेचा ओसरला भर पहिला
हाय घेतली मनें तिच्या परि, ताप शरीरीं भरला.
हत-दैवानें होरपळोनी वेल टाकिली आधीं
नान्दत होत्या पोखरणाऱ्या अनेक चिन्ता व्याधी
कुरतडलींही मुळें तियेचीं बुजबुजलेल्या कृमिनीं
कडाडली तों वीज अचानक तिच्या मस्तकीं वरुनी

कशी निराश्रित उभी रहावी प्रभञ्जनामधिं वेल?
दीपशिखा कां क्षीण न व्हावी समईंत न जरि तेल?
टिकेल कुठवर तलम रेशमी वसन पार जें विरलें?
आन्थरुण सुतवियोग-विह्वळ अबलेनें अन्थरलें! १४४१

जिन्याजवळच्या खोलीमाजी शय्या गुणिलेसाठीं
येतां जातां पन्त टाकिती दारामधुनी दृष्टी.
पलङ्ग, गादी, त्यावर चादर शुभ्र चान्दण्याऐशी
धवल कृशाङ्गी त्यावर गुणिला; तीहि चान्दण्याऐशी
करी सदा परिधान पातळें, निळी पाङ्घरी शाल
पन्तांच्या तें तृषित मनाला होइ दृश्य अलवाल.
मानेखालीं उशीवरी कचकलाप काळा-भोर,
मुख विधवेचें नलिनीसम, ते मीलित नेत्र टपोर,
श्वासोच्छ्वासें खालीं वरती उरोज किञ्चित करती,
स्वेदकणांचा पुञ्ज ललाटीं मृदु नासाग्रावरती,
आपादकटी पाङ्घरलेली अस्मानी ती शाल
दों बाजूला हात उताणे करतल कोमल लाल
खालीं वरती जातां येतां चित्र देखतां ऐसें
पन्त थाम्बती पहात तेथें निश्चळ पुतळ्याऐसे
आणि हालतां, चावळता ती, भानावर येऊन
मार्जारासम हलक्या पायीं जाती पन्त तिथून. १४५७

आज गर्द जे मखमल होती जुनेपणीं ते रङ्ग
झडुन काळान्तरें जातसे उञ्च गिरीचे शृङ्ग.



बन्दीशाळेंतून सञ्जीवाचें पत्र आलें त्यावेळीं... ( पान ९५ )

लोट धुराचा हळुहळु जैसा हवेंत पावें लोप
काळौघामधिं तसा विरघळे दुक्खाचा दृढ लेप.
होइल वरच्या न्यायमन्दिरीं सञ्जीवाची सुटका
कल्पनेंत ह्या सरूं लागल्या जागेपणिंच्या घटका
दिनानुदिन तों येउं लागली तिजसी अधिक हुशारी
जेविं कमलिनी विकास पावे हळूहळू कासारीं.
एक दिनीं तों सञ्जीवाचें पत्र तिच्या ये हातीं
हर्षभरानें अधीरतेनें वाची क्षुधितासम ती
"तुझिया आशीर्वचें माउली आहे येथ खुशाल
पत्रोत्तर दे, मज होइल तें तव मायेची शाल"
वाचतांच ह्या ओळी आला तिचा दाटुनी कण्ठ
तरीहि लागे वाचायाला पुढतीं ती सोत्कण्ठ
"येइ एकदां भेटायाला; खरेंच येशिल कां गे ?
क्षमा मागतों अपराधांची – केले मी जे मागें"
वाचन होतां इतुकें आलें तिचिया डोळां पाणी
सुतापराधें रित्या न होती वात्सल्याची खाणी !
"शिक्षा झाली ! – ठीकच झालें !! – नव्हता मजला ताळ.
काय लिहावें अधिक ? कळावें, तव चुकलेला बाळ."
पत्र सम्पतां कवटाळुन तें तिनें उराशीं धरलें
आणि अनावर अश्रूंचे सर नयनांतुन ओसरलें.
कानशिलाजवळून उतरले दों बाजूला खालीं
शुद्ध न तिजला जरी तियेची उशी ओलसर झाली.
छातीवरती हात, लोचनें सवाष्प तुळईवरती
कटिपावेतों पाङ्घरूण तें, निश्चल पडली युवती.

पत्रमिषानें सञ्जीवाच्या भेटीचें सुख गोड
अनुभवीत ती होती; नाहीं वात्सल्याला जोड.
तन्मयतेमधिं तशांत आली हळूंच तिजला तन्द्रा
धवल मेघ जैं तरल आपुली पाखर घाली चन्द्रा १४८७

मनोदेहिनी पुत्रदर्शनोत्सुका चालली माता—
न देखलेल्या पूर्वी मार्गे; कैक कोस अन् जातां
समोर दिसला प्रचण्ड तिजला तट माळावर एका
ज्यावर कांचा तीक्ष्ण, ठोकल्या तसू-तसूवर मेखा
जाड मुद्गलापरी गजांचा लोखण्डी दरवाजा
बन्द सदाचा, – उघडायाचा विशेष कांहीं काजा.
उग्र मुखाचे भव्य शिपाई सशस्त्र फिरती भवतीं
क्रूरपणाचे क्षेप जयांच्या नेत्रांमधुनी स्रवती.
दुरून दरडाविलें कुणी तों तिजसी "क्यंव् बे लडकी"
सम्बोधन ऐकतां तियेच्या उरांत भरली धडकी
आणि झिणझिण्या शीर्षीं चढल्या, परन्तु पडली अबला
करी विनवणी 'जरा भेटवा सञ्जीवाला मजला.'
पुढें घालुनी खेचित त्याला देत तडाखे कोणी
घेउन येई आणि गजांवर देइ तया लोटोनी.
निष्ठुरतेची कमाल देखुनि तळमळली ती माता
बाळ रडे देखुनी कृशाङ्गी अनाथ ती शोकार्ता.
मिठी मारुनी पोटीं घ्याया मुलास उठली माय
दार गजांचें परी आडवें; निराश झाली हाय !

गजांमधोनी सजे घ्यावया चुम्बन तद्वदनाचें
चुम्बनविधि जाहला परन्तू सुख न लाभलें त्याचें
ओंठ न भिडले ओठांसङ्गें, गाल न मिळले गाला
परस्परांच्या उच्छ्वासाचा वाफारा परि आला
हात घालुनी आंत तयाला पाही कुरवाळाया
बोलायाला सुचे न कांहीं, पळ पळ जाई वाया
तोंच परतला कल्लेवाला, देउन हिसका एक
ओढुन नेई सञ्जीवाला, रडले माय न् लेक.
'चलो निकालो' खेंकसला तों तिला ढकलुनी कोणी
—पडून खाटेवरून झाली जागी स्वप्नामधुनी !
स्वप्नामधल्या सञ्जीवाच्या हाल-अपेष्टा बघुन
मन जननीचें जागेपाणींही जाइ भयें गाङ्गरुन
आणि उताविळ अधिकच झाली त्याच्या भेटीसाठीं
लतेस जीवन देइल केवि स्वप्नामधली वृष्टी ?
कात टाकिली आजाराची; अधीरता ती मोठी
झालें तिजसी कधीं एकदा धरिन मुलाला पोटीं ! १५२१

---

वरी होउनी बघूं लागली गुणिला घरचें काम
सञ्जीवाच्या बेत भेटिचा दिवसहि ठरला ठाम.
ठरल्या दिवशीं निघे प्रवासा माता उत्सुकतेनें
आणि अपीलानिमित्त सजले पन्तहि तत्परतेनें.
गुणिलेच्या सहवाससुखाची अशी पर्वणी येतां
दवडायाची केवि कुबुद्धी व्हावी विषयासक्ता?
घरांत होई निज कान्तेचा रोज अडथळा त्रास
आज यशोदा सवें न, म्हणुनी समाधान पन्तास.
तीच यशोदा परि गुणिलेला होती आडोशाला
सजातियाच्या सान्निध्यामधिं धीर येइ दुबळ्याला.
परोपरीच्या स्पर्शसुखाच्या आस्वादाची हाव
आज अनावर होउन घेई मन पन्ताचें धाव
हेतु मनींचा साधाया ते कैक योजिती डाव
परि चतुराई अशी – प्रसङ्गीं उलटावा नच डाव.
'नको नको' ती म्हणतां, नसता तिळभरही ती राजी
पाठीशीं राहुनी चढविती ते तिज गाडीमाजीं.
आणि लागतां स्वतांच खालीं लगबग ती उतराया
पन्त न चुकती पुढें होउनी हात तियेला द्याया.
गाडीमधली जागा थोडी; बसती विस्कळ पन्त
आंवरुनी तों बैसे साध्वी सङ्कोचित भयभीत

पदाङ्गुलीनें कधीं ताणुनी पदर तिचा ते धरिती
वगळ्यासम झाकून लोचनें डुलक्या घेती वरती.
मार्गामधल्या खाचांमधुनी गाडी हादरतां ती
पन्तांचें शिर विलगे बहुशा तिचिया स्कन्धावरती
"कुसळ लोचनीं गेलें; फुङ्कर जरा घालतां का हो ?"
वतावणीच्या पोटीं ऐशा काय असावा लाहो !
अतिप्रसङ्गी ती पन्तांची हालचाल पाहून
कोण्डमार होऊन सती ती उतरे गाडींतून.
तुरुङ्गवासाहुनी जाहला प्रवास दुस्सह तिजला
पन्तांची येऊन शिसारी जीव तिचा गुद्मरला
चालुं लागतां पायीं गुणिला मनीं पुरे शरमून
'मीच चालतों; तुम्ही बसा कीं,' म्हणती 'जाल दमून' १५५३

येतां येतां दिसूं लागली दुरून बन्दीशाळा
भडभडून तों पोटीं आलें जननीच्या जळ डोळां.
असेल कैसा वेष मुलाचा दिसेल कैसा नूर
चिन्तनांत या करूं लागला धडधड तीचा ऊर
तोंच थाम्बली येउन गाडी पुढल्या आवारांत
गाडीमधुनी उतरे गुणिला शोकावेगें क्लान्त.
खेळत होता पुतळीसङ्गे पारें इकडे सञ्जीव
अन्योन्यातें मानिति अपुला हाच बहिश्चर जीव.
दृष्टी गाडीकडे तयाची गेली सहजी जों न
मूक रोदनीं वाहुं लागल्या अश्रुवाहिनी दोन

खेळ खेळतां सञ्जीवाचें अवचित अश्रुस्खलन
बघून गेली गाङ्रून तों पुतळी कोमल सुमन.
पन्ताआधीं तिनेंच दिधली साहेबाना वार्ता
आणि भेटली मुलास माता दीर्घ-विरह-दुक्खार्ता
आणि कचेरीमधें समीपच साहेबासमवेत
पन्त अपीलावावत जणुं कीं करीत बसले बेत.
साङ्गे सगळी बाळ आइला तिथली हालहवाल
"कारे न काळजी आई, येथें कसले नसती हाल.
निजावयाला सकल मुलांना खाटा असती येथें,
अन्नवस्त्र भरपूर लाभतें, कमती कांहीं नसतें.
पक्वान्नेंही सणास करती; सहल कराया नेती.
कुटुम्बियासम साहेबांची माझ्यावरती प्रीती."
वृत्तानिवेदन चालू असतां बिलगुन सञ्जीवाला
तन्मयतेनें बसली होती पहात ऐकत पुतळा.
भेट सम्पली; गुणिला उठली कुरवाळुनिया बाळ
पुन्हःपुन्हा मुरडून लाम्बुनी वदे तया "साम्भाळ!"
प्रवास फिरुनी; परत निघाले पन्त एकले त्वरित
वदली गुणिला "येइन मागुनि तीर्थें क्षेत्रें करित" १५८१

* * *

परिस्थितीच्या पिन्जऱ्यांत ती सापडलेली मैना
परोपरीनें करीतसे दुर्दैव तियेची दैना
बाह्यरूप पाहुनी वस्तुला जावें जों कवळाया
दूर मुखवटा करुनी प्रगटे राक्षसीण तों खाया. १५८५

जिकडे तिकडे चैत्रगौरिचे उत्सव झाले चालू
सुवासिनींचे थवे लागले रस्त्यामधुनी चालू
म्हणुन यशोदा घरांत नव्हती; परन्तु होते पन्त
वन्द कचेरी—म्हणे जाहला न्यायमूर्तिचा अन्त.
"आज दुपारीं तयार करुं या कागद आणि उद्याला
अपील गुदरूं; मला आठवण विसरुं नका द्यायाला"
ठरलें होतें असें सकाळीं पन्तांचें गुणिलेचें
तुडुम्बलेल्या अधीरतेनें उठाव मन घे तीचें.
हलक्या पायीं जिना चढोनी आली गुणिला वरती
मानस शङ्कित, देह विकम्पित, अधरहि कां थरथरती!
डोकावुनि पाहिलें कुणी का आहे आंत म्हणून
दचकुन पाही वळून येतें मागुन कोणि चढून.
आंत न तिजला दिसले कोठें परी वृकोदरपन्त
सहजी रमली दिवाणखाना पहात शोभीवन्त.
कोच बाजुला व्याघ्राम्बर त्यावरी पसरले थोर
कुठें मुखवटा काळविटाचा डोळे काळे भोर
छोटीं मोठीं रविवर्म्याचीं चित्रें भिन्तीवरती
जयांत आली अनेक रूपीं शृङ्गाराला भरती.
कोठें शुक जितकाम त्यापुढें रम्भा घाली पिङ्गा,
कुठें विवसना उभी वारिणी पिशङ्ग पीनोत्तुङ्गा,
कुठें त्रिदण्डी संन्याशाची दिसे चुम्बनातुरता,
कुठें ऋतुध्वज मदालसेची प्रेमयाचना करतां,
मागुनि येउनि चोर-पाउलीं करि जों स्पर्श हळूंच
कृष्णास्तव बेहोश राधिका पसरी बाहू ऊंच,



ग्रंथ संग्रहालय
क्र. ४०९४

घेउनि कन्या उभी मेनका विश्वामित्रापुढती,
तिलोत्तमा, मोहिनी ऊर्वशी अशा अप्सरा भवतीं.
प्रेमाराधन आङ्ग्ल जनांचें, प्रणयोन्मादक लीला
मधुनी मधुनी पूरक झाल्या सजावटीला तिथल्या.
टिपकागदही आङ्ग्लनटींच्या छायाचित्रांचेंच
बघून अववें तिथें थाम्बणें होई तिज नलगेच.
एकान्ताच्या भयाणतेला घड्याळ देई जोड
गमे आंतुनी कुणी सुचवि कीं घाव घालुनी फोड.
परत निघाली तों पडलेला कागद खालीं दिसला
ज्यावर होता ठळक अक्षरीं निज नामाचा मथळा.
उचल घेतली जिज्ञासेनें; आणि उचलुनी घेई
भेदरलें तरि मन साङ्गे कीं पहा वाचुनी कांहीं १६२१

“ सौन्दर्याचा तुझ्या तजेला फुलवी माझ्या हृदया
वासन्तिक तूं उषा जिवा या; नकोस होऊं अदया.
तळमळ माझ्या होइ अन्तरीं कशी बोलुनी दावूं ?
कशी सङ्गमोत्सुकता मनिंची किती मुखांनीं गाऊं ?
फळांफुलांनीं भरलेला जणुं बागच हा संसार
स्वामिनी न तूं, रखरखलेला म्हणुन गमे अङ्गार.
दिवाणखाना भव्य सुशोभित, सुन्दर मञ्चक कोच
परन्तु त्यांचें सौख्य कोरडें मनास होइ नकोच.
ह्याच विलासीं जरी एकदां होतें मन रममाण
तुझ्या दर्शनें गमूं लागलें सदन परी वैराण.

सुखें सेवुनी परोपरींचीं भुकेंच अन्तर अजुनी
क्षुब्ध एकदां झाला पोटीं क्षुधाग्नि जाइ न विझुनी.
तव ओठांचीं ठेवण दावी कारुण्याचा भाव
तुझ्या करुण या सौन्दर्यानें केला कायम घाव.
सेवाधर्मी – शिम्पल्यांमधें तूं दडलेली मुक्ता
वरदे ! माझी करीं मनःस्थिति सत्वर शोकविमुक्ता.
जरी चालले मुकाट माझे नित्याचे व्यापार
नसे जिव्हाळा तयांत; परि ते वरकरणी आचार.
सुधास्यन्दिनी असून सन्तत माझ्या हातालगत
दोन खगोला इतुकें अन्तर आपणांत हें गमत.
घरांत खेळे मनांत डोले गुणिले जरि तव मूर्ती
कां मुकुरींच्या शशिबिम्बानें होइल वाञ्छित-पूर्ति ?
सुखास्वाद जो आजवरींचा फडफड डबक्यामधली;
खऱ्या सुखाची अगाध खोली नव्हती अवगाहियली.
काय यशोदेमधें उणें या ? – काय म्हणोनी साङ्गू ?
सजीव या बाहुलीसवें मी कोठवरी तरि राङ्गू ?
गाढाश्लेषीं तिचिया रमता बन्दिवास तो वाटे
आभरणें जीं अप्रिय तनुला खुपतीं तीं जणुं काटे.
गाढाश्लेषीं तिला घेतसे तिच्या समजुतीसाठीं
हृदयमन्दिरीं जीव झुरतसे परन्तु तुझियासाठीं.
तिची वञ्चना करतांना ही खातें मन मज माझें
तरिहि पुसे कीं टाकायाचें कधीं उतरुनी ओझें
अनुग्रहाविण परन्तु तुझिया नाटक कैसें सरणें ?
दिनानुदिन हें चालें मरणें; कधीं पुनर्भव जगणें ?'' १६५५

ओळी मागुन ओळ वाचतां अखेर शेवट आला
क्षोभें कागद दिला फेकुनी करून चोळामोळा
भणाणुनी तों मस्तक गेलें, भोंवळ आली तिजला
उरीं कोण्डला प्राण, नासिकीं श्वासोच्छ्वासहि थिजला
झालें आविष्करण पुरें हें; कसलें काय अपील ?
उभें राहण्यामधें न आतां येथें क्षणहि हशील !
तडक निघोनी सती जिन्याच्या तोण्डाजवळी आली
खालुन आल्या पन्ताशीं तों धडक तियेची झाली
चपापुनी तों तशीच हटली त्याच पाउलीं मागें
फटक पाण्ढरी पडली चर्या लाल होति जी रागें
येउन पुरते पन्त थाम्बले तिथें उम्बऱ्यावरती
होय तदा कावरी-बावरी हरिणलोचना युवती
काय करावें काय म्हणावें सुचेच ना तिज कांहीं
धीर धरुन तों पन्त बोलले "भीति कशाची कां ही"
खिडक्यांचीं जरि दारें होतीं बन्द घेतली करुनी
तिथें फाकला प्रकाश त्यांच्या रङ्गित काचामधुनी
उभी मागल्या कलावरी ती मेजावर रेलून
ताम्बुस किरणें तिचिया वदनीं खुलली प्राचीहून
लावण्याची लतिका ऐशी पाहुन एकान्तांत
करी विवेकावरी नेभळ्या काम अनावर मात.
प्रखर रवीच्या तापें पाणी बर्फाचें जरि होई
शरीर कामज्वरें तापतां विवेक गोठुनि जाई.
वदती 'गुणिले !'– परन्तु पुढले अडखळले वदतांना
"हृदय खोलुनी तुला दाविलें पाहिलेस तूं तें ना ?

चोळामोळा करून कागद फेकुनि जरि दिधलास
चोळामोळा नकोस करुनी टाकूं माझी आस
पहा कृपेच्या मज नजरेनें, देई मज विश्वास
अन्त न पाहीं; तुझ्याविना मज अखिलहि विश्व भकास
तुझ्या वाहतों गुणिले ! पायीं सर्वस्वाची रास
हातीं दे या हात आपुला, नको लाथडूं दास" १६८५

श्रवतां वचनें वृकोदराची किळस वाटली तिजला
कळवळुनी परि बोलूं लागे धीर करोनी अबला
"ह्याच काय हो लोभानें मज दिलात सदनीं थारा ?
ह्याच हेतुनें दाविलीत का सञ्जीवाला कारा ?
सत्यचि कीं तर जनवार्ता वा परवां वदला पोर
दाविलात त्या तुरुङ्ग करुनी कारस्थान अघोर
आणि पुन्हा वर अपिलाचा मज वृथा लाविला नाद !
ह्याच हेतुचा सर्व वर्तनीं होता ना अनुवाद ?
बाग लावितां जेवि ठेवुनी फळांफुलांची आस
दुभत्यासाठीं जशी पोसतां घरीं गाय वा म्हैस
आजारांतिल तेंवि शुश्रुषेपोटीं होता स्वार्थ ?
चालविला का ह्यास्तव माझा आजवरी चरितार्थ ?
स्मरतीं बाष्कळ चार अतां ते प्रवासांतले नाना
डोळ्यामधल्या का कुसळांचा ह्याकरिताच बहाणा ?
मरतां वेळीं पतिला माझ्या दिलेत आश्वासन जें
गर्भित हेतू नीच तयांतिल हाच अतां मज उमजे

जन्मदरिद्री जरि मी : माझें एकच जें भाण्डार
प्राणाहुन जें प्यार तयाचा नका करूं अपहार
कायमचें कां गढूळ करतां निर्मल हें बन्धुत्व ?
उगारितां कां कुठार माझें भग्न कराया स्वत्व ?
दयाशील औदार्य आपुलें नका डागळुन टाकूं
नका विषारी फूत्कारांनीं मला जाळुनी टाकूं
वावटळीमधि सापडलेली येइ आश्रया कलिका
कुसकरुनी तिज हाय चिरडतां अपुल्या पायदळीं कां ?
ज्योत फुङ्कुनी मला उरवितां काय काजळी फक्त ?
काय उरविता मला चोयटी पिळून काढून स्वत्व !" १७११

धाप लागली वदुनी इतुकें झाली घामाघूम
परि पन्ताच्या चर्येवरि नच दिसला लव परिणाम
बळावला जो आज अन्तरीं विकार आणिक हेतू
तोच लोचनीं दिसला तिज जणुं अजुनि जातसे ऊतूं
उलट चढाईसाठीं त्यांनीं सावरलाहि पवित्रा
असें वाटुनी ती भीतीनें विस्फारी निज नेत्रा
दारांतुनि ते पुढें सरकले तों ती मागें हटली
द्वेष तिरस्कृति तिच्या दाटले ओठीं नेत्रीं निटिलीं
वधुनीं वडवानलीं व्हायची सर्वस्वाची होळी
धूम ठोकली जिन्याकडे; ती तडक उतरुनी गेली.
सैतानानें ठाण माण्डिलें हृदयामाजीं ज्याच्या
यानन्तर तरि तिनें रहावें कैसें सन्निध त्याच्या ?

जरी कालिया कालिन्दीच्या डोहा व्यापुनि टाकी
जलप्राशना जाइल कैसा तिचिया पान्थ तटाकीं ?
पिकास कुम्पण खाउं लागले त्यजुनी जर निज धर्म
वाली अपुला करूं लागला ऐसें खाटिककर्म
पाङ्घरली जी शाल ओकते तीच असा जर जाळ
कोण लपेटुन घेइल ज्यास्ती तीचें मायाजाल ?
न थाम्बतां क्षण, सदन सोडुनी पडली ती बाहेर
पार जळालें आजवरी जें मानियलें माहेर ! १७३१

पुसा कुणासहि केव्हांही त्या बाळगुन्हेगारास
ठावा सकलां उरला अपुला किति कारागृहवास
कुणी मोजितो वरुषें अपुलीं, कोणी उरले मास
दिवस कुणाचे उरले कांहीं, फक्त कुणाचे तास.
कुणी आपुल्या लिही पित्याला 'धाडुन द्यावे पैसे'
करी विचार न कुठून इतुके पाठवील तो कैसे.
तोहि विचारा धाडुन देई कीं एकुलता एक—
बहुतां येतो परत दिसांनीं घरास अपुला लेक.
कुणी साङ्गतो ' लिहून मी तर असे कळविलें पत्रीं
मला चाङ्गला खमीस, फेटा, चढाव, धाडा छत्री.'
कुणी आपुल्या लिही आइला यावें न्याया मजसी
हजार कामें टाकुन येई तीही ठरल्या दिवशीं.
झोळी फिरवुन पोळी पिकवी आणि करी गुजराण.
ऐसा कोणी आधींपासुन येउन देई ठाण.
मातापितरें सरकारामधिं करिती कोणी अजिजी
" परत आमुची काठी द्यावी कीं वार्धक्यामाजी
थकलों आम्ही, मोलमजूरी होइ न या हातांनीं
मुलावाचुनी कोण अम्हांला देइल तुकडा पाणी ?
उरले आतां दिवस थोडके, अन्तकाळ ये जवळीं
कोण अम्हांला अन्थरुणावर पाजिल कान्जी निवळी ?

चुकून घडला गुन्हा; पुरे ही झाली इतुकी शिक्षा
उरली सुरली माफ करावी हीच मागतों भिक्षा"
इलाखाधिपतिकडून येई अर्ज अभिप्रायार्थ
साहेबांच्या शिफारसीनें जाई वरती परत.
हुकूम होई सरकारांतुन 'करा मुलाला मुक्त'
साहेबाचे पाय पिता तो करी अश्रुंनीं सिक्त. १७५७.

येउन मागुन ऐसा कोणी होता आधीं मुक्त
उदास होई अधीर होई सञ्जीवाचें चित्त
करी मोजणी मनांत उरला किती आपुला काळ;
प्रफुल्ल होई हांक ऐकतां पुतळीची लडिवाळ
आणि तियेच्या सहवासाच्या मोहानें मन त्याचें
प्रदीर्घपणही विसरुन जाई सुटकेच्या दिवसाचें,
अखेर, आला आनन्दाचा सुटकेचा तो दिवस
ओठापाशीं येउन भिडला नव्या जिण्याचा कलश.
चार दिसांनीं, दोन दिसांनीं, फक्त आजची रात्र
तसें वाढत्या हर्षें त्याचें फुललें मानस गात्र.
सुखमय असला जरी कितीही तरि तो बन्दीवास
शीघ्र तयांतुन सुटावयाची कोण करील न आस ?
स्वातन्त्र्याची हलाखींतही अमोप असते गोडी
परवशतेंतिल परमोच्चहि वैभवें तिजपुढें थोडी
स्वातन्त्र्यामधिं शरतल्पींही मऊ पराची मृदुता
शेज पराची परवशतेंमधिं वरिते कण्टकसमता

तशांत ज्यांना बागडण्याचा स्वाभाविक हव्यास
कसा वहावा गळां तयांनीं परवशतेचा फास ?
परवशतेमधिं देह मुलांचा फुलावरीही पोळे
आणि मुक्तिच्या दिवसावरि ते लावुनि असती डोळे.
सञ्जीवाला सुटकेमाजी एकच दुक्ख परन्तु
कीं पुतळीच्या सुख-सङ्गतिचा तुटावयाचा तन्तू.
पुतळीलाही करमेनासें होउन शाळेमाजी
निमित्त साङ्गुनि लौकर आली परत घरा ती आजीं
आणि रङ्गली किती वेळ तरि दोघे फुलबागेंत
साङ्गे तिज सञ्जीव आपुले अनेक पुढचे बेत.
आश्वासन ती देई त्याला ओळख ठेवायाचें
तोहि तिला करि कबूल मधुनी मधुनी भेटायाचें.
अजाण ती उभयतां, नेणती काळाच्या उदरांत
काय सांठलें ? दृष्टिकोनही कैसे पालटतात ?
मनोरथांचे अश्व न सहसा पळती धरणीवरुनी
अधान्तरीं धावती, भवतिचे आडथळे नच गणुनी.
तशांत ज्यांना व्यवहाराच्या झळा लागल्या नव्हत्या,
बुद्धीच्या कसरती जयांना माहित मुळिही नव्हत्या,
थोरपणाची सीमा ज्यांना नव्हती अजुनी ठावी
स्वैर तयांच्या असावयाच्या कां न योजना भावी ?
अखेर सरले मावळतीचे रङ्गामधले खेळ
आणि ठेपली सन्जीवाची बन्द व्हायची वेळ
कळ्या जमविल्या कितीक त्यानें बोलत असतां तेथें
भरल्या हृदयें देउन तिजला उठला परतायातें.

देतां देतां आणि चमकला मनांत कांहीं भाव
सुचेचना परि तयास कसलें द्यावें त्याला नांव.
परत निघोनी एक एक जों पाउल आला दूर
वाढु लागली अन्तर्यामीं अधिकाधिक हुर्हूर.
झुटकेच्या परि विचारांत जों फिरून झाला मग्न
अननुभूत त्या भावोर्मींची माला झाली भग्न. १८०३

रात्र सम्पली, प्रभात झाली, सञ्जीवाची झोंप
नव्या जिण्याच्या उत्सुकतेनें कधींच पावुनि लोप
अधीरतेनें करी प्रतीक्षा कधीं उघडतें दार
आणि उघडतां आनन्दाला नुरला पारावार!
सुपाएवढें आज पावलें त्याचें हृदय विकास
हालचाल तदनुसार आली दिसुनी प्रत्येकास.
साहेबांनीं दिली कौतुकें पाठीवर जों थाप
भरुनी काठोकाठ साण्डलें आनन्दाचें माप
आणि तरळले नेत्रामाजी आनन्दाश्रू कांहीं
पुतळी सन्निध उभी दृश्य तें तन्मयतेनें पाही. १८१३

सरली शिक्षा आणि उतरले अङ्गावरले कपडे
वदनप्रक्षालनीं जशीं तीं डोळ्यावरलीं चिपडें.
राख निखाऱ्यावरली किंवा टाकावी झटकून
गमे सञ्जिवा तसेंच निघतां कपडे अङ्गावरुन

दीर्घ काळ जी खोल तळाशीं कूपामाजी पडली
शैवालाचीं पुटें जियेवर अनेक तेथें चढलीं
ओसरल्यावर पाणी कोणी काढी वर ती मूर्ती
उजळा देई आणि तियेला पूर्वस्थान-प्राप्ती.
कैदेमधलें जीवित यापरि सरलें सञ्जीवाचें
दार मोकळें परि कुठल्याही नव्हतें देव्हाऱ्याचें.
तथापि डोङ्गर नव्या जिण्याचा होता अजुनी दूर
म्हणुन तयाच्या आनन्दाचा उणा न झाला पूर. १८२५

मुदत सम्पली आणि निघाले कपडे अङ्गावरले
खेळ सम्पता जसे उतरती रङ्ग वेष नट अपुले
रङ्गभूमिच्या बाहेरीही परी भूमिका-नामें
नटास सम्बोधिती जसे जन तीं तीं स्मरुनी कामें
कैदी नसता 'कैदी' म्हणुनी तेंवि कुजबुजे जनता
अभिमानास्पद नटास तें, अपमानास्पद परि मुक्ता !
कशी कळावी आज तया परि ही जनतेची रीत
म्हणुनि न आला आनन्दाच्या उणेपणा भरतींत १८३३

पदीं लागुनी अधिकाऱ्यांच्या घेई वाळ निरोप
निघे रुजाया नव्या जगामधिं एक कोवळें रोप
चार हिताचे शब्द निवेदी पुतळीचीही माता
"खरेपणाला जाग सारखा वाग चाङ्गला आता

‘शाळा’ सरली परन्तु जाऊं नकोस ‘कॉलेजांत’
शतन्जीव हो! ” म्हणत फिरवि ती पाठीवरुनी हात.
पदीं पित्याच्या बिलगुन होती बाळसहचरी त्याची
दळें ओलसर दिसलीं त्याला तिच्या नेत्रकमळांचीं
पुन्हां कालच्या अनुभूतीची प्रगट जाहली लहरी
असेल का तसलीच निनादत तियेच्याहि हृत्कुहरीं !
स्वाभाविक निघताना गमलें अवघड अन्तःकरणा
तुटावयाचीं मुळें कोवळीं वाफा पालटतांना. १८४५

पटाङ्गणाबाहेर टाकलें पाउल सञ्जीवानें
आणि वाटलें तयास अपुलें स्वागत करिती रानें
वायु खिदळल्या मुलासारखा नाचत होता तेथें
खळ्या उमटल्या धुळींत मार्गीं तदीय चरणाघातें
सञ्जीवाला त्याच भासल्या मृदु स्मिताच्या लहरी
दिसे भोंवती तसेंच, अपुल्या वसें जसें हृत्कुहरीं.
तिकिट काढुनी देउनि त्यातें बसवाया गाडींत
बन्दीशाळेंतील शिपाई होता तत्समवेत.
खेळत होते खिशांत पैसे वरकड खर्चापुरते
मातृभेटिच्या अधीरतेचें उरीं दाटलें भरतें.
आपोआपच पायांनीं तों दिशा घराची धरली
कळलें न कशी पायाखालीं वाट भराभर सरली.
थाम्ब्यावरती गाडी होती तयार निघण्यासाठीं
उत्सुकतेला असह्य झाली दारापुढली दाटी.

दाटीवाटीमधुनी घुसतां ढकली कोणी मागें
पुन्हःपुन्हां परि पुढें पुढें तो घुसावयाला लागे.
कसाबसा येऊन जाहला प्रविष्ट गाडीमाजीं
फिरे शिपाई परत, जाहला बेलगाम तो वाजी.
परन्तु इतरा ऐसे नव्हतें उधळायाचें त्याला
अखेरचा तो स्पर्श तथापी तुरुङ्गवासामधला
दूर होउनी, खुलेपणा लाभता तयाची वृत्ती
खुलली शशिसम होइ जयाची ग्रहणामधुनी मुक्ति. १८६७

गाडीसङ्गें मनोरथांतें वेग तयाच्या आला
गाडीहुनि परि जलद तयांनीं प्रवास अवघा केला.
उड्डाणाची कला मनाची कैंवि तियेला यावी
ठरीव मार्गावरुन जाइ ती थाम्बत गांवोगांवीं
शारीरिक दौर्बल्य निवारावया जिचा अवतार
मात मनाच्या वेगावर ती केंवि तरी करणार ?
तुफान सुटला जरी वायु तरि विजेहुनी का चपळ ?
बाष्परथाची धाव मनाच्या रथापुढें हो विफळ.
क्षणीं गाठला मनें तयानें वृकोदराचा वाडा
आणि आपुल्या अपराधाचा वाचुन सारा पाढा
सत्वधीर जननीच्या पायीं विनम्र केला माथा
तिनें घेतलें तोंच पोटिशीं तयास, तीच्या हाता—
तीर्थाचें पावित्र्य लाभलें अखिल भारतामधल्या
होता पावन त्या स्पर्शानें शक्ति नव्या सञ्चरल्या.

सावधान नव जोमानें निज जीवित-नौका फिरुनी
हाकाराया सजला, अपुली सुखवाया प्रिय जननी.
घाम गाळुनी दाम जोडुनी इमान सङ्गोपून
काळ कण्ठिला शान्तपणानें भलेपणा कमवून
असें आंखुनी भरभर त्यानें भावी जीवित अपुलें
किती लाम्बचें टोक मनानें निमिषार्धीं आक्रमिलें. १८८७

रखडत होता देह धावत्या परन्तु गाडीमाजी
चरफडला कीं सन्थ अशी ही चालतसे का आजी.
मनोगतीशीं तुळिता तीचा वेग वाटला मन्द
परन्तु बेदरकारपणें ती धावत होती धुन्द.
घेउनिया चालली कुणाला पाजाया सुखचषक
जाळ्यामाजी गुन्तवावया नेइ कुणी वा मषक
कुणा बोहल्यावरी कुणाला फासावर चढवाया
घेउन ती चालली त्वरेनें काळरूपिणी माया
नेइ कुणाला स्वीकाराया सन्मानाच्या माळा
नेइ कुणाला दावायाला स्मशानांतल्या ज्वाळा
कुणा अकल्पित जहागिरीचा वारस करण्यासाठीं
नेइ कुणाला उद्यापासुनी हातीं द्याया नरटी
ज्योत जियेच्या सौभाग्याची होउं लागली क्षीण
करावया ती सतेज वाञ्छी अशा सतीला दीन—
घेउन धावे, भग्नमनोरथ तेंवि कुणा बालेला
जिला जिण्याच्या क्षणाक्षणाचा युगसम ये कण्टाळा.

बहुविध ऐशा सुखदुक्खांचे धनी प्रवासी भवती
परि सञ्जीवा स्वतावांचुनी दाद कुणाची नव्हती
रङ्गवीत निज भविष्यांतलीं अनेक चित्रें रमला
तोंच साञ्जचे दिवे चमकता सावध फिरुनी झाला
कुणी शिदोरी सोडुन बसले वाटसरू देखोनी
त्यानेंही काढिली आपुली कान्दा भाकर चटणी
घास घ्यावया हात उचलला परत ठेविला खालीं
कुणी भिकारी दिसला त्याच्या केली सर्व हवाली
[कारण आतां कैदेंतिल कां घ्या अन्नाचा घास ?
काय बिघडलें जरी आजच्या दिवस घडे उपवास ?]
आणि तयाला बसल्या जागीं ग्रासियले निद्रेनें
जागृत होता मधेंच पाही किति आलें किति जाणें.
अशींच सरतां निशा पाहि तो खडबडुनी जों भवतीं
तोंच धडकली गाडी येउन त्याच्या थाम्ब्यावरती
येउन खालीं फलाटावरी फिरवी भंवती नजर
विद्युत्स्फुरणासम कसलीशी चमकुनि गेली लहर.
आणि घालुनी मान खालती चालुं लागला वाट
रविस्वागतासाठीं पूर्वा करीत होती थाट. १९२१

कधीं एकदा सरावयाचा प्रवास झालें त्याला
या औत्सुक्यें जाता कांहीं कृष्णेवरती आला.
अथाङ्ग नव्हतें पाणी आतां, वहात होतें सन्थ
दिसलें काळेंभोर दरडिच्या प्रतिबिम्बापर्यन्त

आणि बाकिच्या जलास कान्ती आली नील नभाची
निर्मळतेनें येथुन तेथुन दिसेहि वाळु तळाची.
जरा खालती नजर फेकता अर्धवर्तुळाकार
प्रवाह जाई, दों दरडीला मळया हिरव्या गार.
जरा बाजुला वरच्या दिसली रुतून पडली नाव
दूर आणखी पलीकडे त्या घाटावरती गांव
दों बाजूंनीं दरडीवरुनी वाट उतरली पात्रीं
हात उभारुन जणु बोलावी पान्था ती जलवन्ती
बालभानुच्या काञ्चनकिरणीं विशेष खुललें स्थान
स्फूर्ति न व्हावी का सञ्जीवा करावया तों स्नान !
धावत घुसला पाण्यामाजी, दिलें झोकुनी अङ्ग
जळांत तैसे मनांत त्याच्या उठले कैक तरङ्ग. १९३७

"कृष्णामाई ! काय तुझ्या हा वात्सल्याचा पूर
माय भेटली गमे, आज जरि कैक कोस ती दूर
कृष्णामाई ! तुझिया पोटीं आज बुडी घेतांना
कुशींत जें लाभलें आइच्या येइ सौख्य तें स्मरणा
कृष्णामाई ! काय तुझा हा भेदातीतपणा गे
साधु-असाधू पावन होती सलिलनिमज्जनयोगें.
प्रतिदिन घडला कैदेमाजी अमित भ्रष्टाकार
करोत मजला पावन तव हे मङ्गल तीर्थतुषार.
कृष्णामाई ! शुचितेस्तव हीं घेतों तव आचमनें
मालिन्याचें क्षालन करि हे गङ्गे, गोदे, यमुने !" १९४७

विचार येउन असेंच कांहीं कण्ठ जाहला रुद्ध
बुड्या मारल्या फिरफिरुनी तों पूर्ण व्हावया शुद्ध
खिशांतलें घेऊन जानवें, फासुन देहा माती
पुन्हां एकदा बुडी मारुनी उभा राहिला पात्रीं
समोर दिसला सूर्य, करोनी त्या अर्घ्याचें दान
करावया तो लागे यज्ञोपवीत तें परिधान
"हिन्दुत्वाची, ब्राह्मण्याची मङ्गल पावन खूण
कण्ठीं धारण करितों सूर्या ! साक्षी तुज ठेवून
तुरुङ्गवासामधी कोठलें ब्रह्मकर्म आचार ?
प्रायश्चित्तास्तव सूर्या ! तुज नमस्कार बहुवार.
तव तेजाच्या कोमल किरणीं करितों आतां स्नान
शुचिर्भूत हें शरीर होवो तव चैतन्या स्थान."
असे कांहिंसे सङ्कल्पात्मक जुळवुन शब्द मनाशीं
स्वयें साधुनी शुद्धि, लागला चालू पुढें प्रवासीं. १९६१

समोर आलें गांव, जाहला दाखल वेशीपुढती
पाय तयाचे प्रवेशतांना परन्तु कां अडखळती ?
गांवकऱ्यांची चालू होती तीमधुनी रहदारी
कुणी न पाहिल तयास, तरि तें होतें बहु हितकारी.
'नकोच येथें तोण्ड दावणें ! याच पावलीं परत
निघून जावें दूर कुठें तरि; विशाल आहे जगत.
अडावयाचें काय कुणाचें ? आईचें ? – छे, तिजला
कैदेमाजीं गेल्या दिवसापासुन मी मेलेला ! '
विचार हा चमकला मनीं जों कल्लोळाच्या पृष्ठीं
'कां मग आली भेटीस्तव ती माता दुक्खी कष्टी ?'
उद्भवतां हा त्याच ठिकाणीं प्रश्नहि लागोपाठ
तन्नेत्रांच्या कमण्डलूंचे ओले झाले कांठ.— १०७३

जरा बाजुला उभा राहिला निम्ब तरूच्या खालीं
सकलावरती धरी सारखें ज्याची छत्र डहाळी
आल्या गेल्या बैराग्याची धुमी धुमसते तेथें
भिकारणीच्या केव्हां चिन्ध्या वाळतात वा तेथें
रचिलीं जाती कधीं कधीं वा तिथेंच कारस्थानें
कधीं उनाची डुलकी घ्यावी तेथें पान्थस्थानें

मुक्तिफौज कधिं निज धर्माचें प्रवचन तेथें करिते
दरवेशाचें अस्वल केव्हां डोलत तेथें दिसतें.
झुन्ज लागते जत्रेमाजी वृषभांची बेफाम
तिथेंच उठतो तम्बू करिता अधिकारी मुक्काम.
परन्तु होती आज रिकामी सर्वच ती पडशाळा
चाटत होती पुढ्यांतल्या जरि धेनू निज वत्साला. १९८५

करुनि मनाचा हिय्या उठला अखेर तो लढवय्या
गांवकऱ्यांच्या दृष्टिशरांची स्वीकाराया शय्या.
पाहुं लागले जाते येते जन त्या टवकारून
ओळखिनें वा अनोळखीनें कोणी विस्मयपूर्ण.
पोरपणींची वाढ तनूची असते शीघ्र विशेष
सहज नुमगती – वरुषें जाता – पूर्वरूप-अवशेष
कैदेमधलें तशांत जीवित वक्तशीर आखीव
कैसा बघतांक्षणीं ओळखूं यावा तरि सञ्जीव ?
खुली निरोगी हवा, त्रिकाळीं ताजा मित आहार
उद्योगाविण दिवस न जाई, येई निद्रा गार.
फिकीर नाहीं मिळेल कुठुनी उद्यां पोटभर तुकडा
नवा कसा मिळणार फाटता अङ्गावरला कपडा
सत्वर होई औषधपाणी कोठें दुखतां खुपतां
खुराक पौष्टिक चाळू होई वजन उणें आढळतां.
ऐशा वातावरणीं झाली सञ्जीवाची वाढ
होतें खुरटें रोप तयाचें सुढाळ झालें झाड.

प्रथम वाटुनी नवखा, कोणी निरखुन पाही त्यातें
ओळख पटतां विशेषतेनें नजर रोखिली जाते.
कुणी पूर्वींचे व्रात्यपणांतिल सहचर पुढुनी येतां
करुनि अङ्गुली-निर्देशातें जातांना कुजबुजतां.
न पाहता, झेलींत चालला सगळे दृष्टिनिपात
अचुक पातले पाय तयाचे पन्तांच्या दारांत.
तों पन्ताची समोर दिसली माडीवरती स्वारी
चर्या बघतां त्यांची आली सञ्जीवास शिसारी.
"कोण पाहिजे? तव आई का? नसते येथ अतांशी"
"ठाव–ठिकाणा काय तरी?" "जा, ठाउक नाहिं अम्हासी"
वज्राघातापरी वृत्त तें सहानुभूतिविहीन—
वचनीं श्रवुनी हताश तो हतबुद्ध जाहला दीन.
रडावया मनसोक्त जियेच्या कुशींत घालुन मान
धावत आला गिळीत आला तिरस्कार अपमान
परि कळतां कीं ब्रह्माण्डाधिक तेथ न अपुली आई
सदन तयातें ओस वाटलें दुर्गन्धाची खाई.
क्षणींच दुसऱ्या तडक फिरविली घराकडे त्या पाठ
परन्तु आतां कुठें जायचें?—फुटेल तिकडे वाट!
शून्य मनानें उभा राहिला जरा वळचणीखालीं
वाटचालिचा शीण वाटुनी क्षुधिता ग्लानी आली.
पाय गाळुनी परन्तु कैसे निभणें? जठराग्नीतें—
शमवाया घे दों दिडक्यांचे चणे कुरमुरे कोठें
उदासवाणा निरुद्देश तो भटकत गल्लोगल्लीं
पडीक अपुल्या घरापुढें तो येई सायङ्काळीं. २०२५

सूर्य लोपुनी प्रकाश नुसता उरला होता मागें
तोही मरणोन्मुख जीवासम निमावया हळु लागे
केवळ उरली अतां धुगधुगी मावळतीच्या नयनीं
तीहि सम्पतां घनान्धकारीं बुडून गेली धरणी. २०२९

माय न, तात न, सगेसोयरे कुणी न जगतापाठीं
दगड उशाला धुळ शेजेला भिक्षा पोटासाठीं
अशी प्रभावळ अभावतेची,—स्वतास देखुन तींत
कलण्डला पायरीवरी निज सदनाच्या भयभीत
गहिंवर दाटुनि सुरू जाहलें रोदन त्याचें मूक
रडला रडला तरी न शमली रडावयाची भूक
अखेर आली निद्रा साध्वी ती जगताची धात्री
नवी उद्यास्तव जणु घालाया शक्ती त्याच्या गात्रीं. २०३७

जगावरी जरि पुढें बैसलीं दारुण अन्धाराची
चान्दण्यांत परि विलसत होतीं स्वप्नें सञ्जीवाची
पडक्या कुसवाजागी उठली नागमोडिची भिन्त
आणि अङ्गणीं वाग चिमुकला फुलला शोभीवन्त
नवी इमारत दिवे लागुनी दालनांत सर्वत्र
दिसली सुन्दर फूलपाखराऐशी चित्रविचित्र
कारञ्जाची तुषारवृष्टी चोचींतून बकाच्या
पहात बसले वधु-वर नूतन काठावर हौदाच्या
वरस्वरूपीं दिसली त्याला आपुलीच कीं प्रतिमा
आणि सहचरी तिची मनोहर किति वर्णावी सुषमा
विनयवतीची हनु उचलोनी बघता तो मुखचन्द्रा
तों ती पुतळी !—क्षणीं भङ्गली सुखस्वप्नमय तन्द्रा.

खडबडुनी तो जागा झाला, मानस बहु हळहळलें
भविष्यफलकीं काय माझिया भाग्य यापरी लिहिलें ?
बन्धविमोचन-दिनीं अन्तरीं वियोगसमयीं स्फुरलें
भाव अनामिक अर्थच त्यांचे स्वप्नीं कीं अवतरले ?
हाय वैरिणी निद्रे ! ऐशी सृष्टी रङ्गविली कां ?
स्वप्नीं सुखदा जागृतींत परि होइल तीव्र वराका !
कुठें अभ्रमू आणि कुठें मी सूकर रस्त्यांतील ?
का ऐरावतपदवी मजसी प्राप्त कधीं होईल ?
परि झोपेचा भर ओसरला नव्हता नयनावरला
तळमळला बहु तरी पुनरपी तिचिया ठायीं विरला. २०५९

✻ ✻ ✻

लुप्त हतप्रभ होउं लागलीं नक्षत्रें गगनांत
निद्रासुखरत वसुन्धरेचीं स्वप्नें कीं विरतात.
मच्छरदाणी कीं मोत्यांचें भरतकाम असलेली
चोर-पाउलीं हलक्या हातीं कुणी बाजुला केली
आणि उघडुनी दार, पाडिला उजेड कोणी वदनीं
प्रसन्न-मन्द-स्मिता सुन्दरी बसली सहजी उठुनी.
सूर्योदय परि मोहक असला नव्हता सञ्जीवाचा
परसांमधल्या चिन्चेवर कलकलाट वागूळांचा
कानठळ्या बसतील अशी कटु कर्कश कक्कुट-वाणी
कोलाहल हे पडून कानीं बसे अभागी उठुनी.
'ऊठ' म्हणोनी हाका मारी त्यातें जीवनकलह
तोही उठला आळस झाडुन त्यागाया निज गेह.
जमीनदोस्तहि झालें तरि तद्विरह तया हो असह
नयनांमधुनी प्रकट जाहला विरहवचांचा निवह २०७३

[ जाति–मुद्रिका ]

ही काय अवकळा हाय ! ऊर फाटतें
केलास अम्हांवर ऐसा कां क्षोभ वास्तुदेवते !
मम तात-छत्र नेउनी हिरावुनि, घडी—
मोडुनी, क्षणीं आम्हांला लाविलेस देशोधडी.
ती माय गाय अश्राप ललाटीं तिच्या
वनवास काय यावा ! हा कोणत्या शाप जन्मिचा ?
कुललाञ्छन ठरलों मीहि लोकलोचनीं
होईल खऱ्याहुनि आतां बन्दिवास दुस्सह जनीं.

कोसळलें अवघें कुसू तेंवि चान्दया
निखळले चिरे जोत्याचे कोणीहि पळवितो तयां.
घाणेरी गवतें कुन्द किती माजलीं
पटईला पाकोळ्यांनीं आपुलीं घरें बान्धिलीं
शैशवीं शोभलें पुरा माझियामुळें
निःशङ्क नान्दती येथें नकुळांचीं आतां कुळें
दरवाजा अर्धा खुला, न हा सरकतो
सर्वत्र भुतासम वारा रात्रन्दिन घोङ्गावतो.

त्या दिसती पडक्यांतुनी भङ्गल्या चुली
फुलवील पुनरपी केव्हां कोणती तया माउली ?
पणतीची दिवळी तिथें काळवण्डली
लावील दिवा कां कोणी पुनरपी कधीं त्या स्थळीं ?
येईल पुन्हां माङ्गल्य ऊर्जिता दशा
या करण्ट्यास कां देवा करशील पात्र या यशा ? २०९५

---

सकल जनांचे सुरू जाहले पोटासाठीं धन्दे
दीड वितीच्या पोटाचे या गुलाम अवघे बन्दे
प्रतिष्ठितांच्या व्यवसायांचीं जरी निराळीं नांवें
जठराग्नीतें विझवाया ते अनेकरूपी कावे
नसे प्रतिष्ठितपणा जयां ते लावुन खान्दीं झोळी
भूतदयेवर सजले अपुली पिकवायाला पोळी
फिरू लागले राख फासुनी रस्त्यांतुन गोसावी
खरखरमुण्डया डोईफोडया आव भयानक दावी
भावी उत्कर्षाची ग्वाही देतहि दारोदार
फिरे कुडबुड्या जोशी गर्जत 'जोतीबा मल्हार'
कडाड ओढित आसूडाचे अङ्गावर फटकारे
कडकलक्ष्मिनें तिकाटण्यामधिं गांव जमविलें सारें
मिराबाइचीं भक्तिरसाचीं कारुण्याचीं गाणीं
गात चालला एकतारिवर तल्लीनपणें कोणी
सम्प्रदाय जो अवतरला या जनीं जागृतीसाठीं
पोटास्तव तो कुणी चालवी लेवुन भगवी छाटी
विभूति वा अवतार जाहले जनताकल्याणार्थ
तन्नामांचे टिळे लाविती जन उदरंभरणार्थ
कुणी कवाइत करून घेई नन्दीबैलाकडुनी
पोटभरूंची अशी चालली ये-जा रस्त्यांमधुनी

त्याच चालता रस्त्यांमधुनी सञ्जीवाच्या कानीं
ह्याच पातळें भावार्थाचें गीत अगाशीमधुनी
गाङ्गरलेला विवञ्चनेनें तोही पोटाच्याच
गीत जरी सामान्य तरी तें वेधी मन सहजींच २११९

[ जाति – भूपतिवैभव ]

हें पोट साङ्गतें वाकवि अपुली मान
हें पोट साङ्गतें क्षूद्रासहि दे मान
हें पोट साङ्गतें ऐकुन घे कटु बोल
हें पोट साङ्गतें करीं आंतडें सोल
हें पोट साङ्गतें काढ उपसुनी घाण
हें पोट साङ्गतें ठेवी प्राण गहाण
हें पोट साङ्गतें कुणाच्याहि पड पाया
हें पोट साङ्गतें घोट विषाचा घ्याया

हें पोट साङ्गतें कवनीं वान शठास
कधि म्हणे साधुच्या घरांत दारू ठास
हें पोट साङ्गतें लुबाडुनी जग आण
पचवाया त्यावरि खोटी घेई आण
हें पोट साङ्गते लाव जगाला आग
नच विवेकाप्रती येऊं देई जाग
हें पोट साङ्गतें पाझर देवा फोड
लाथाड तयाच्या मूर्ती अथवा फोड

हें पोट साङ्गतें पापी होइ खुशाल
पापास होतसे ढाल सोवळी शाल
हें पोट साङ्गतें खुशाल होई श्वान
परि अङ्गिकारणें श्वानाचें न इमान
ती वन्द्य गणी वा तुडवी भगवद्गीता
व्यापार जगाचा साक्षात् माझी गीता
हें पोट साङ्गतें अनाद्यन्त मी राजा
दश अवतारांचा पोकळ गाजावाजा ! २१४३

अन्नोदक आपुलें कुठें तें शोधायास निघाला
तोंच उग्र हा महिमा त्याचा आधीं कानीं आला
आणि पाहुनी अनेक सोङ्गें पोटास्तव फिरणारीं —
मिळेल कोठें काय आपणा कनवाळू कैवारी ?
कुठें आपणासाठीं उघडें आढळेल कां दार ?
या चिन्तेचा हृदया ग्रासी अधिकाधिक अन्धार.
भव्य देखुनी वाडा त्याचा उञ्च रुन्द दरवाजा
वाव कदाचित मिळेल येथें उदरपूर्तिच्या काजा
थवकत गेला दीनपणानें समोर सोप्यावरती
देवघेविच्या गोष्टी तेथें आल्या निकरावरती
सावकारिचा हिशेब चाले जेथें आणे–पैचा
पोटभरूचा रिघाव तेथें उगाच होणें कैचा ?
कृपणाचा त्या तिथेंच सन्निध होता ऐदी पोर
मधेंच सुचवी पित्यास 'त्यांतुनि हा तर कैदी चोर !'

आशेवर तैं विरजण पडुनी घेई तो माघार
न साहुनी त्या कटु शब्दांचा मर्मावरती मार.
इतुक्यांतचि रे सञ्जीवा ! नच चरकुनि जाई स्वमनीं
कितीक तुजला बसावयाच्या घोर डागण्या अजुनी
सलामीस पहिल्याच नको या इतुका होऊं कष्टी
ह्याहुनही होईल पुढें विषदिग्ध शरांची वृष्टी २१६३

ऋणानुबन्धी कुणी पित्याचे तोण्डओळखी त्यांच्या
उपकारक कां होतिल ऐशा समयीं निर्वाणिच्या
विचार येउन मनीं, चालले त्या रोखानें पाय
फलद्रूप परि नाहिं जाहला उपाय हाही हाय !
उलट पाजिती कुणी फुकाचे उपदेशाचे घोट
उपदेशामृत पिऊन भरतें क्षुधिताचें का पोट ?
प्रभाकराशी दाट आपुली मैत्री कोणी साङ्गे
परि पुत्रास्तव आज तयाच्या पुढें न सरके स्वाङ्गें.
मात्र बोलकी सहानुभूती दावी ओतप्रोत
तप्त तनूतें काय निववितो रिक्त वचांचा स्रोत ?
तयार झाला स्वीकाराया शागीर्दाचा पेशा
कुणी म्हणे तों " प्रभाकराच्या काय मुलानें ऐशा—
स्थितींत हलक्या रावावें ? हें अम्हांस शोभत नाहीं;
अम्हांस म्हणतिल लोक काय तें हवें पहाया कांहीं !"
ढोङ्ग दाविती अशा तऱ्हेचें न-कार द्यायासाठीं
निराश्रितास्तव पोटतिडीक न; शब्दच नुसते ओठीं.

जयास जगतीं आधाराला एकहि नुरला धागा
जया पाहिजे पाय कुठें तरि टेकायाला जागा
काय तयानें बघत बसावें स्थिती थोर वा हलकी ?
प्राणावर बेतता तयारी होइ शिंराया नरकीं !
काय चुलीवर चढवावें ही फिकीर नसते ज्यास
अधिकाधिक तीं ध्येयें पुढतीं उदात्त सुचतीं त्यास
परि वाताहत झाली त्याला हवेंच आधीं स्थान
अधान्तरीं राहून घ्यावया येइ काय उड्डाण ?
परि सुस्थित हे नाठवती ही विचारसरणी साधी
कुठें तयांना जबाबदारी हवी घ्यावया आधीं ?
चन्द्रकान्त मणि होते ऐसे जे जे त्याच्या स्मरणीं
पाझरले नच तद्वदनींच्या कारुण्याच्या किरणीं २१९१

कुणी वायदे करिती त्याशी 'पाहूं पुढती कांहीं'
उघड दिसे परि हेतु तयांचा करु न वाञ्छिती कांहीं
स्पष्टपणानें न-कार द्याया जे न भिडेनें शकले
'आज नको, ये उद्यां' तयांनीं मन्त्र हेच ऐकविले
अभिवचनांचा बुडत्याला त्या वाटुनिया आधार
'फिरुनी येऊं उद्यां' ठरवुनी घेई तो माघार
आणि द्यावया दुसऱ्या दिवशीं अभिवचनाची याद
परत ठाकतां पुटपुटती तों कोणी "आली ब्याद"
पुन्हा वायदा पुढचा करती उदारधी ते जेव्हां
तीव्र निराशेमुळें म्हणे सञ्जीव मनाशीं तेव्हां—

अभिवचनांचा जिकडे तिकडे दिसतो मात्र सुकाळ
कोण बान्धला परन्तु त्यांचा करावया प्रतिपाळ !
शब्द हवेंतिल हवेंत विरती, नसे कृतीशीं मेळ.
कोण तयांना महत्त्व देतो ? – हा जिभलीचा खेळ.
का तर मग जिव्हेच्या खेळा चिरञ्जीविता द्याया
भीष्म पितामह अटीतटीनें हाय झगडले वाया ?
स्वप्नामधल्या वचनास्तव का राज्यश्रीचें दान
पूर्ण कराया इतुका झाला हरिश्चन्द्र नादान ?
तीन वरांनीं अनर्थ करिते हाय कैकयी कृत्या
धडधडीत हें दिसुनी दशरथ वचनपूर्तिच्या कृत्या—
सज्ज जाहला, सुतास अपुल्या धाडाया वनवासा,
आपणही प्रायोपवेशनीं पडावयातें कैसा ?
वसले गमवुनि सर्वस्वा ते खरा कराया शब्द.
त्या काळावर परी लोटले आज हजारो अब्द.
जबाबदारीवाचुनि आतां वदले जाती बोल
वदणाराच्या मनीं तयांना स्वल्पहि नसतें मोल.
अभिवचनांचा जबाबदारी टाळाया उपयोग ?
नव्या युगांतिल शब्दब्रह्मा जडला भलता रोग.
जयास पडली दुपारच्याही दो घासांची भ्रान्त
दूरदूरचे केवि वायदे क्षुधेस करतिल शान्त ?
झाकाया लज्जाङ्ग असेना आज एकही चिन्धी
शुष्क वायदा मिळे "थाम्ब रे देऊ वत्ती कन्दी."
ध्येयचि यांचें कीं 'वचने किम् दरिद्रता' दावावी ?
वचनौदार्यें होइ वञ्चना नसते यांच्या गांवीं ! २२२५

उम्बरठे पूजिले तयानें त्या दिवशीं कितिकांचें
माप परन्तू पदरीं पडलें केवळ नैराश्याचें
सभ्यपणानें कुणी साङ्गती 'घरीं न अमुच्या सोय'
खेंकसती तों कोणी "ठेवूं चोर घरीं कां ? होय ?"
जवळ करीना कुणी तयाला मनांत धरुनी किन्तू
मजल गाठली कुणी तयावर करावयातें छीः थूः २२३१

काळजी न वाहिली जयाच्या पोटापाण्याची तूं
काय तुला अधिकार कराया त्याच्यावरती छीः थूः ?
पोरपणांमधिं चुकून घडलें असेल कांहीं पाप
प्रायश्चित्तास्तव शिक्षेचें पुरें दिल्यावर माप
तुरुङ्गांतले निघाल्यावरी कपडे अङ्गावरुनी
सम्बोधावें काय तयाला "कैदी ! कैदी !" म्हणुनी ?
कोण तान्दळाऐसा धुतल्या जगांत आहे कोरा
नाहीं घडली शिक्षा म्हणुनी कां मिरवावा तोरा ?
लुळ्या कायदे-कानूवरती केली ज्यांनीं मात
काय तयांचे पार टेकले आभाळाला हात ?
न्यायदेवता नेत्र बान्धुनी बसे आसनावरती
ध्वनी जसे जिकडून तियेच्या येतिल कर्णप्रान्तीं
वळते तैशी तिची अङ्गुली जाणुनिया हें धूर्त
दिशाभूल करतात तियेची, बदमाषातें मुक्त.
सावपणाचा आव आणुनी ऐशा बदमाषांनीं
काव काव कां अशी करावी कैद्याभवती जमुनी ?

एकवेळचा कैदी परि कां माणुसकीला मुकला ?
काय भावनाप्रवाह त्याच्या अन्तर्यामीं सुकला ?
एकवेळचा कैदी तो का कायमचा मुर्दाड ?
पालवीस कां मुकतें पुरतें जितें मनाचें झाड ?
कां सम्भावितपणास त्यानें तिळाञ्जली अर्पियला ?
प्रतिष्ठितांना सवाल आधीं हवा कराया असला.
येउन कैदीपणा मनाला घोर जाहली जखम
ती बुजवाया हवें खरोखर अनुकम्पेचें मलम
परि ह्या साध्या उपचाराचा मुळीं न राहुनि पोंच
निर्दय जनता काकासम त्या क्षतांत घाली चोंच.
मुदत सम्पतां साप आपुली कात टाकतो जेवीं
सुटलेल्या कैद्यास हाय हे लोक मानिती तेवीं
मनांत त्याच्या नसुन इरादा करावयाचा दंश
वागविते परि जनता पोटीं ह्याच भयाचा अंश
ह्याच भयानें दृढ शङ्केनें कुणी न त्या चुचकारी
कुणी कृतीनें कुणी वचानें दूरच त्या झिडकारी
आणि अवज्ञा करुन तयाची सदा ठेचिती नाक
येऊं बघे जो स्वस्थानीं त्या छळिति असे हकनाक २२६५

‘आला इतुका पुरे जाहला अनुभव गांवकऱ्यांचा’
मनीं म्हणोनी, निघे घ्यावया आश्रय निम्बतरूचा
तों तेथें नुकतीच आपुली करुनी माण्डामाण्ड
कुणी बुवाजी दिसून आला बसला तरणाबाण्ड.
सर्वाङ्गावर पुटें लिम्पलीं भस्माचीं घमदाट
चिलीम चिमटा झोळी लोटा धुमीभोंवती थाट
तिथेंच येउनि जरा बाजुला कलण्डला सञ्जीव
शान्तपणें तों पुसे बुवाजी ‘ क्यंव् बेटा सञ्जीव !’
कोण असावा ओळखणारा आपणास बैरागी
या आश्चर्यें उठून बसला श्रान्तजीव हतभागी
वरी न बघतां ‘कुठें इथें तूं’ फिरुन पुसे गोसावी
उत्तर आलें मुखांतुनी तों ‘मी या माझ्या गांवीं’
हळूहळू तों पटूं लागली ओळख आवाजाची
परि भस्माच्या विलेपनांतिल पटे न त्या चर्येची
अस्तातें रविबिम्ब जाउनी येइ रात्र अन्धारी
होउं लागली वेशीमधली कमी कमी रहदारी
आणि पसरली जिकडे तिकडे सामसूम जों पूर्ण
राख धुवूनी खऱ्या स्वरूपीं होइ बुवा अवतीर्ण.
धुकें लोपतां दिसूं लागते सभोंवतीची सृष्टी
मेघ पाङ्गता ताराङ्गण जैं दिसूं लागतें रात्रीं

तेंवि सञ्जिवा ओळख पटली बन्दीशाळेमधली
कर्मकथा मग आपआपली परस्परांनीं कथिली.
आणि शेवटीं म्हणे बुवाजी "धडपड करिसी कां ही ?
खऱ्या दयेनें कोण आपणा जगामधें या वाही ?
डाग एकदा जया लागला कारागृहवासाचा
जगांत नाहीं तया कुणीही वाली विश्वासाचा.
देईल न आसरा बन्धुही, तेथें गांवकऱ्यांना—
काय म्हणोनी कलङ्किताची उगाच यावी करुणा ?
सज्ज नेहमीं घरांत ज्याच्या आथित्याच्या थाळ्या
असो खुनी तो नांवें त्याच्या पिटल्या जाती टाळ्या.
घरांत ऐवज घालायाला जेथें अज्ञानाचा
जमा होउनी आप्त ठेविती बडेजाव तरि त्याचा.
विधवेजवळीं असेल कांहीं रूप आणखीं पुन्जी
अनुकम्पेच्या मिषें घालिती अवघे भवती रुन्जी.
निनादती ज्या तिजोरीमध्यें सदा मोहरा पुतळ्या
डोल पन्नगासम धरि जनता तेथें चाटित जिभळ्या.
तुझियाजवळीं काय यातलें ? कोण तुला पुसणार ?
शुष्क ओहळाकाठीं कैसें वाटसरू जमणार ?
अशा जगीं तूं काय इमानें वागुन वर चढशील ?
डोकें वरती काढुन देणें हें न जगाचें शील !
अनुभव नाहीं तुला तथापि सत्य साङ्गतो बाळा
जिणें नव्हे हें बन्दिवास हा, जग हें बन्दीशाळा !
कुणी कुणाचा नव्हता स्नेही बन्दीशाळेमाजी
हाच पाजिला घोट न कां तुज गांवकऱ्यांनीं पाजी ?

आठवतो ना तुज दरवाजा बन्दीशाळेचा त्या ?
अमर्याद भेसूर त्याहुनी आहे जग हें जात्या !
कडक शिस्तिच्या नांवें अपणा झोडपलें कैदेंत
मारहाण ह्या जगांतलीही कमी न निर्दयतेंत
अशा जगीं तूं काय इमानें वागुन वर चढशील ?
मत्त जगाच्या पायीं मळणी मात्र करुन घेशील !
टाक मनांतुनि तरी काढुनी वेड्या भलतें खूळ
राख फासुनी फेक जगाच्या डोळ्यामाजी धूळ.
तुझिया आधीं जगांत येउन गेलीं वर्षें दोन
हाच शेवटीं मार्ग सेविला धक्के बहु खाऊन.
दाम्भिक जगता दाम्भिकतेनें हवेंच ठकवायास
दाम्भिकतेनें ठकवायाला पडती नच आयास.
विचार करसी कसला ? चल ये, देतो तुजला दीक्षा"—
वदुनी घेई धुमींतली तो चिमटीमाजी रक्षा—
"तुझा गुरू मी, टिळा लावितों शिष्यत्वाचा तुजला
जमा करूं परिवार, माजवूं बडेजाव बघ अपुला
वाढविल्यावर दूर विदेशीं चतुराईनें स्तोम
जनें भाबडीं चालवितीलहि अपुला योगक्षेम"
धुमींत विस्तव फुलुनि फाकला उजेड ताम्बुस त्याचा
सञ्जीवाच्या तेंवि अन्तरीं पडला उपदेशाचा
गांवकऱ्यांच्या कटु वचनांनीं मन झालेलें क्षुब्ध
गोसाव्याच्या अनुभव-वचना होई सहजीं लुब्ध
आणि सम्मती व्यक्तहि केली; झाले मग ते सुप्त
परी न कळलें सञ्जीव कधीं तेथुन झाला लुप्त. २३३३

बैराग्याची विचारसरणी जरी प्रथमता पटली
परन्तु ती दृढमूल न झाली त्याच्या अन्तःपटलीं
अनोळखी जगतांत जाउनी अजुनी आयु सुधारूं
ह्याच लगामीं होता त्याचा अजुनि मनाचा वारू
अजुनी कांहीं मनांत होत्या जीव धरोनी आशा
अबला जरि त्या तोडुं न शकला त्यांच्या तो मृदु पाशा.
धन्देशिक्षण कैदेमधलें लावायास कसास
जरा दूरच्या नगरीचा पथ तया दाखवी आस २३४१

दिला दाखला सुटके-दिवशीं साहेबांनीं त्यातें
येइल कामीं चरितार्थाचें साधन शोधायातें
परि झाला भरवसा फोल हा, कुणी न त्यातें मानीं
शिफारशीच्या उगमा जो तो आधीं घेइ ध्यानीं.
आणि द्यावया आश्रय त्याला कुणी न होइ तयार
परत दाखला देतां देती मानेनेंच 'न'कार.
राघव-नामाङ्किता शिळांचा सेतु सागरीं झाला
तेंवि दाखला जीवनकलहीं येइल उपयोगाला
होती ऐशी सञ्जीवाची मदार ज्यावर सारी
तोच दाखला अचिन्त्य रीतीं झाला छद्मी वैरी
जनांस दावावया योजिती लोक शिफारसपत्र
तेंच गाडुनी टाकायाची आली वेळ विचित्र.
दावायाचा प्रमाण म्हणुनी प्रवीणतेचें अपुल्या
तोच आपुल्या गुन्हेगारिच्या अचूक करतो चुगल्या.

सुधारला हा मुलगा ऐसा जरि दे पत्र पुरावा
खराब होती भिन्त आंतली सुचवी तोच गिलावा.
कशावरोनी नसेल ठिणगी या राखेच्या उदरीं
या शङ्केनें धूर्तांनीं त्या कैसें घ्यावें पदरीं ?
असा शिफारस–पत्राचा हा प्रभाव देखुन उलटा
करुनी तुकडे तुकडे देई फेकुनि वारा वाटा २३६१

पायपिटी बहु पोटासाठीं केली कैक ठिकाणीं
अखेर कोणी उदारधी त्या ठेवुन घेइ दुकानीं
हरकामीं राबवी तयातें केवळ अन्नावारी
करी न कांहीं कदर कष्टला जरि तो अष्टौप्रहरीं
झाडलोटही घरीं करावी पाण्याचेंही माठ
खान्द्यावरुनी रोज वहावे जरी मोडली पाठ
कष्टप्रदही जिणें तयानें केलें असतें सहन
एक दिनीं परि तिथेंच आलें किटाळ त्यावर गहन
करुनी दादा-पुता, त्यांतुनी सोडवुनी निज मान
निघे तेथुनी, फिरुन जाहलें निरुद्देश तें यान.
नव्हतें ज्यांना ठावें त्यांना पूर्ववृत्त तैं कळलें
पोलीसांचें आणि संशयी नेत्र त्याकडे वळले
कुठेंहि होवो खुट्ट कांहिंही; आतां त्याचा उगम
सञ्जीवापर्यन्त भिडविती बेशक साधू अधम
होता अफरातफर कुठेंही, गहाळ कांहीं होता
सञ्जीवाचें नांव कुणीही घ्यावें येतां जातां

बाळपणींचे स्नेही त्याचे बेरड आणि लफङ्गे
साक्ष द्यावया विरुद्ध सजती सभ्यपणानें स्वाङ्गें
नको नको तें जिणें जाहलें अशा छळानें त्याला
उपाय कांहीं तया सुचेना लाञ्छन लपवायाला
पोटासाठीं करावयाला नीच कितीही धन्दा
तयार झाला कुणाचाहि तो व्हाया सेवक बन्दा
येउ देइना कुणीहि सन्निध भूतदयेनें त्यास
नागरीक व्हायची तयाची जिरू लागली आस
सभ्य समाजांतली पाहुनी बन्द सर्वथा दारें
शब्द तयाला पटूं लागले बोवाजीचें सारे
तळमळतां ह्या स्थितींत बोले अपुल्या क्षुब्ध मनाला
"जिणें नव्हे हें, बन्दिवास हा; जग हें बन्दीशाळा !
कशास आलों जन्माला तरि जगांत मी या न कळे
मातेची शिणवून कूस हें स्वकुळ कलङ्कित केलें
कलिकावस्थेमधेंच गळुनी कुजता मातीमाजीं
दैवाचें दुर्विलास सगळे चुकले असते आजीं"
घेइ कपाळावरी मारुनी हात विचारें ऐशा
म्हणे "दयाळा, अजुनि आपदा किती भोगणें कैशा ?" २३९५

बुजलेलें मृगशावक जैसें सैरावैरा धावे
न जिव्हाळ्याचें न निवाऱ्याचें स्थान कुठें गवसावें
तशीच होते स्थिति करुणास्पद सुटलेल्या कैद्याची
भय वाढविते पूस-तपासहि तशांत पोलीसांची २३९९

नव्हती झाली सञ्जीवाची वृत्ति अजुनि बेशरम
निराधार ही स्थिती देइ त्या म्हणुनि वेदना परम
घनान्धकारीं दूर कुठें तरि दिसूं लागता दीप
लोकवस्तिची जागहि येता ओसाडींत समीप
श्रान्त एकल्या बावरलेल्या येइ धीर पान्थाला
पुढती पाउल उचलायाला; तशीच सञ्जीवाला—
अवचित झाली स्मृति पुतळीची आणि तजेला आला
म्हणे मनाशीं 'करील मोदें स्वागत माझें बाला'
निघावयाच्या अदल्या दिवशीं शपथा त्या दिधलेल्या
निरोप-समयीं तिच्या पापण्या अश्रूंनीं भिजलेल्या
कैदेमधल्या तमांतल्या त्या दिव्य तारकाज्योती
भेट तियेची त्वरें घ्यावया प्रोत्साहन त्या देती.
ह्याच वायुनें भरलें त्याच्या शीड मनाचें आतां
चढे खलाशी पुन्हां एकदां आशा-नौकेवरता. २४१३

---

परन्तु नव्हती अतां निरागस पुतळी ती पूर्वीची
अतां नाचती नसांनसांतुनि नवतीच्या मधु वीची.
उरोज उन्चावुनी जरासे खुलला वक्षप्रान्त
विशेष खुलतो क्रीडेमाजी होई जेव्हां श्रान्त.
प्रमाणसुन्दर अङ्गलटीला उठाव मिळण्याऐसें
चापचोपुनी दक्षपणें ती सदाच नेसण नेसें;
तशांत पुढच्या पवनें जेव्हां पदर बिलगतो पोटीं
कृश कटिखालीं दिसे शोभुनी रुन्दपणें ती ओटी.
न पाहतांही मुखमण्डल तें सौन्दर्याची ग्वाही
पार्श्व-भाग घोटीव तियेचा सहजासहजीं देई.
धवल तिचें झिरझिरीत पातळ त्याच्या पदरापार
दुभङ्गलेल्या दिसती फाकी पाठीच्या भरदार.
लाम्ब तियेचे हात, जरासा उन्च कण्ठ, तनु-बान्धा,
कुणीहि बघताक्षणीं म्हणे कीं हा कनकाचा रान्धा.
तशांत बघतां चञ्चळ डोळे काळेभोर टपोर,
भृकुटींचे धनु, सरळ नासिका बाणच पाणीदार,
नाजुक जिवणी, अधर मनोहर रेखिव, हनु चिन्चोळी
जाळ्यामाजीं अशा कोणती गवसेल न मासोळी ?
भुरभुरणारे केस तियेच्या शुभ्र कपाळावरती
गालावरती ध्वजा गुलाबी आतां नित थरथरती

खोडसाळपण अतां प्रगटते हास्य मुखीं स्फुरतांना
मिष्कीलपणा कळूं लागला लोचन-कमलदलांना
उगाच आतां तिचे चालती पदरासङ्गें चाळे
हाव-भाव ते बालिशपणिंचे अतां लोपले भोळे.
वयासङ्गतीं हूडपणा परि वाढुन वृत्तीमाजी
लाडिकतेचा अभिनय आला मुग्ध अवयवांमाजी;
आणि आपुल्या सौन्दर्याचें तिज झालें जों ज्ञान
किञ्चित भरला तिचिया अङ्गीं वृत्तिसुलभ अभिमान
अशी पाहिली ज्यांनीं ज्यांनीं मनमोहक ती मुद्रा
तिजविषयींच्या स्वप्नांनीं तों फुलली त्यांची निद्रा.
पडेल दृष्टी बागेमाजी मूर्ति तिची फिरणारी
म्हणुन वाढली दारावरुनी तरुणांची रहदारी.
निमित्त कांहीं तरी काढुनी तिच्या बन्धुचे स्नेही
वरचेवरती उगाच खेपा घालुं लागले गेहीं.
अतां तयांचें दूरदूरचे नातेवाइक तरुण
येती आवर्जुन मुक्कामा वाट वाकडी करुन.
फिरावया ती निघे सकाळीं किंवा सायङ्काळीं
अनुचर मागुन मनोरथांचीं गुम्फित जाती जाळीं.
मिळेल केव्हां तिचियासङ्गें बोला–चालायाला
हाच मनींचा भाव तयांच्या प्रगट वर्तनीं झाला.
कुणी तियेला उल्लेखिति कीं जिवन्त ही सारङ्गी
कुणी बोलती 'ही कलहंसी' किंवा 'काय कुरङ्गी !'
कोणी 'सौदामिनी स्फुरे ही' कोणी 'नागिण' म्हणतां
म्हणती कोणी 'ज्योत्स्ना दाहक विचरे ही भूवरती'

कुणी तियेला नांव ठेविलें 'ही दख्खनची राणी'
आणि गायिली भाट होउनी प्रेमरसाचीं गाणीं.
कुणी धाडिती तिज नजराणा सुन्दरशा वस्तूंचा
करुन धिटाई सम्पादीही परिचय कोणी तीचा
रूपसम्पदेमुळें तियेवर होउनि तो अनुरक्त
भक्त म्हणवुनी स्तोत्रहि रचुनी भाव करी निज व्यक्त.
कवनामधलें सौन्दर्याचें अपुल्या कौतुक कोड
अवलोकुन वाटली तयाची तिला धिटाई गोड
आणि घेउनी भावगीत तें जाउन एकान्तांत
वाचन करिते, मनोवृत्ति तों सहज तिच्या फुलतात.
अन्य दिनीं तो – कम्पित ज्याच्या हृदयांतील घड्याळ—
भेटिस येतां तया विशेषण लाभे 'चोर ! खट्याळ !'
क्षणीं तयाच्या हृदयसुमाचा विकास होई थोर
फुलें उधळल्याहुनी तयाला सुखद विशेषण 'चोर'
'खट्याळ' हें लडिवाळ विशेषण ओठांतुन अवतरलें
छे, राज्ञीनें निज हृदयाचें दानपत्र तें दिधलें.
'खट्याळ' आणिक 'चोर' भूषणें मौल्यवान हीं त्याला
कोशपालही सुरलोकींचा रङ्क तयातें गमला.
ऐशा नूतन प्रिय सुहृदाच्या सहवासीं सुखकारी
नव अनुभूती सेवुं लागली पुतळी ती सुकुमारी.
कासारामधिं हंस हिण्डतां उठती लहरी लोल
आणि तयांच्या तालावरती धरी कुमुदिनी डोल. २४७९

सञ्जीवाच्या परि हृदयींच्या लेण्यामधुनी अजुनी
बाळपणींची लाडिक पुतळी नान्दत होती चिमणी.

वयानुसारें बदल तियेच्या असेल पडला देहीं
रङ्गवितां परि चित्र येइना तया कळोनी हेंही.
वसन्तांतली निर्झरिणी ती कलकल रव करणारी
वर्षाकाळीं धुन्द मदें ती होई सञ्चरणारी
दश वर्षांची वाला होता प्रमदा नूतन तरुणी
होते ती आराध्य देवता युवका अन्तःकरणीं.
उघडपणें हें सञ्जीवाच्या मतिनें परि नाकळलें
बाळमैत्रिच्या विश्वासानें तिच्याकडे मन वळलें.
परी कोवळ्या बाळमैत्रिची मुकेपणांतच कलिका
कधींच गळुनी नव बहरानें फुलली पुतळी–लतिका
पुतळींतिल ही क्रान्ती दावुनि निवारावया भ्रान्ती
खेचुन आणी दैव तयाचें तीच्या वसतिप्रान्तीं. २४९३

बागेमधल्या हिन्दोळ्यावर एका हातीं दोर
धरून बसली ललिता पुतळी, जणु चन्द्राची कोर.
फुलझाडांचे रम्य ताटवे भंवती भूमीवरती
उन्च तरूंचे घेर पसरले होते माथ्यावरती.
वृक्षाच्या फान्दीस बान्धल्या टेकुन झोल्यावरती
निश्चल गमली निर्भय बसल्या भव्य मयूरासम ती.
हिन्दोळ्याची रोधुन धरुनी गती रोवुनी पाय
तन्मयतेनें वाचित होती अन्य करीं तें काय ?
मर्यादाऽतिक्रमण जरासें सुहृदाकडुनी झालें
दर दिवशींच्या भेटीमाजी कलहें अन्तर आलें

परन्तु चुटपुट मनीं लागुनी तिच्या राहिली जों ती
तोंच तयाचें पत्र पातलें — विरहतमीं कीं ज्योति

( छन्द ओवी )

कळ्या-फुलांनीं हे गेले लवथवून ताटवे
तुझें बोलणें आठवे
खडकाळींतून नदी वाहतांना खळखळे
तुझें चालणें चञ्चळे !
दाहकर हाय होई जरि शीतळ चान्दणें
जणू तुझेंच पाहणें
पहाटचा मन्द वारा धुन्द सुगन्ध घेऊन
तुझें सूचवी यौवन
गीत गाई कोकिळा ही गर्द झाडींत लपून
ध्वनीपूर्ण तुझें गान.
सान्ज-सकाळीं हे रङ्ग उचम्बळती अम्बरीं
तुझ्या गालीं किं लहरी
आणि फान्दी-फान्दीवर आली नूतन पालवी
माझ्या आशेची कीं छवी.

आत्मनिवेदन अनन्यतेचें निज सुहृदाचें बघुनी
क्षणांत हर्षोत्फुल्ल जाहली कलहान्तरिता स्वमनीं
एक वार दों वार वाचुनी उन्मळुनी आनन्दें
उन्च उन्च चढविले तियेनें झोके तों स्वच्छन्दें
शिडांत भरता वारा सरसर वेगें जाइ जहाज
उचम्बळोनी अङ्गीं झाले तसेंच तिजला आज.



परन्तु अभ्यागताकडे त्या न पोचुनी अवधान
अपुल्या आनन्दांत निमग्ना पुतळी जाइ निघून...

( पान १४५ )

‘अशीच जाऊं काय व्हावया मेघावरती स्वार’
अशा कल्पनेमधें चढवि ती झोके जणु अनिवार
घोळ पायिंचा पदर पाठिंचा – फडफड त्यांची होई
पुतळीसङ्गें प्रहर्षनिर्भर काय जाहले तेही ?
पुन्हा अचानक थाम्बवुनीया झोका तो चढलेला
वाचुन पाही कागद करिंचा – सेवि सुधेचा पेला.
पुन्हा एकदा वाचुन ठेवी घडी करोनी वक्षीं
हृदयावाचुन कां हृदयींचें गुपित कुणी संरक्षी ? २५३३

बुजत मनीं सञ्जीव पातला थबकत तोंच समोर
बाळपणींचा खेळगडी – छे, एक काळचा चोर !
परन्तु अभ्यागताकडे त्या न पोचुनी अवधान
अपुल्या आनन्दांत निमग्ना गेहीं जाय निघोन.
सभोंवतालीं जेविं दरवळे परिमल सुमनांमधला,
सभोंवतालीं प्रकाश पसरे जेविं चमकतां चपला,
तेविं फांकती सौन्दर्याचें झळाळ पुतळींतून
असें भासुनी सञ्जीवाचें गेलें नेत्र दिपून.
स्वकल्पनेहुनि लाख पटींनीं सौन्दर्याचें तिचिया
पाहुनिया ऐश्वर्य वाटली शरम तयाच्या हृदया.
“न पाहतां ती निघून गेली, कीं केली अवगणना ?
पुरें एवढें ! बळेंच ओढुनि कशास घ्या अपशकुना ?”
उद्भवलेला विचार परि हा मनीं न टिकुनी पुरता
नव आशेनें हळूंहळूं तो झाला तिज अनुसरिता. २५४७

साहेबांनीं थोरपणानें दिला तयातें थारा
परी वर्तनीं अवगणनेचा वाहत होता वारा.
हाल भोगुनी पोटासाठीं सोसुन नीचपणाही
इमानदारी कधीं–कधींही न सोडिली लवलाही
फुशारकी ही निज साङ्गाया पाठ थोपटुनि घ्याया
किति आशेनें आला परि ती सकल जाहली वाया
निदान अपुला करील नच ती बाळसहचरी त्याग
कृपाकटाक्षें काय न तिचिया फुलेल अपुला बाग ?
परिस्थितीच्या धरणीकडूनें हाहि मनोरा त्याचा
आला क्षण निःशेष गाडुनी रसातळीं जायाचा.
एक दिनीं ती एकान्तामधि बघुनी साधुन सन्धी
सोक्षमोक्ष लावून घ्यावया सन्मुख आला बन्दा
खळबळ माजुन मनांत, कांहीं बोलायास सुचेना
अरुन्द खिण्डीतुनी न जाई शिस्तीवाचुन सेना.
करुनी धाडस अर्धस्फुट तो बोलुं लागला कांहीं
सभय शङ्कित पुतळी डोळे वटारुनी त्या पाही.
यत्न करी तो स्मृती द्यावया सुटकेच्या दिवसाची
मनीं म्हणे ती 'काय पायरी सुटत चालली याची'
काकुळती येऊन म्हणे तो 'काय जिव्हाळा आटे ?'
तिरस्कृती लोचनीं तियेच्या अधिकाधिक तों दाटे.
स्तब्ध राहुनी जरा चाचरत बोलुं लागला फिरुनी
"बालपणींचा स्नेही जिवलग देसी कां झिडकारुनी ?
आठव अपुली अनन्य मैत्री, न करीं मज भग्नाश"
तों जहरी फूत्कार टाकि ती 'खबरदार बदमाष !

मदनाचे ही पुतळे जीच्या भवती धरती फेर
प्रेमकटाक्षास्तव लोळणही पायीं घेति कुबेर
अशी जिची सौन्दर्यसम्पदा तिची धरोनी आस
काय करण्या कलङ्कितांनीं लावुनि घ्यावा फास ?''
श्रवुनी हे उन्मत्तपणाचे शब्द, जाहला थक्क
होउन सम्भ्रम-निरास पुरता, प्रकाश पडला लख्ख
आणि ठेवुनी माथा पायीं करि अश्रूंचा सेक
वदे 'गुन्ह्याची क्षमा करी या; घाल एवढी भीक''
''तुझी नि माझी बरोबरी का ? काय लागलें वेड ?
क्षुद्र कृमींना देइ आसरा का सोन्याची मेढ ?
पहावयाचा तुरुङ्ग का तुज अतिप्रसङ्गापायीं ?''
तया बजावुन रूपगर्विता निघून तेथुन जाई.
सञ्जीवाच्या हृदयाचीं तों शतधा झालीं शकलें
अधोवदन तेथून घेइ तो पाय काढते अपुले.

* * *

काय तुझी व्यवहारशून्यता खुळचट सञ्जीवा रे
कशास हें आलास घेउनी मनांत भलतें वारें ?
श्रीमन्तीनें येइ खरेदी करिता सौन्दर्याची
काय माहिती नव्हती तुज या लौकिक व्यापाराची ?
श्रीमन्तीला मानमान्यता जगतीं लाभायाची
कशी प्रचीती नव्हती तुज या आजवरी न्यायाची ?
सत्तेला वा श्रीमन्तीला सदा लाभती मुजरे
साहेबाच्या पूर्व-परिचयीं नव्हतें कळलें तुज रे ?
गुन्हेगारिच्या कालिम्यासही उजळा दे श्रीमन्ती

श्रीमन्तीनें दुष्कर्माचे गिरिहि अगोचर होती
इमानदारी कङ्गालाची कोण घेतसे ध्यानीं ?
कङ्गालाच्या कुणी न घेती ध्यानीं सद्‌गुणखाणी
गुन्हेगार तूं एक काळचा तशांत जन्मदरिद्री
तफावतीचा तुझ्या–तिच्यामधिं किति दुर्लङ्घ्य हिमाद्री !
गळ्यांत घालुनि गळा जरी ती रमली बाळपणांत,
तुला न विसरायाची दिधली जरी तेधवां शपथ,
काय बुडबुडे परन्तु टिकती ध्रुवताऱ्यासम अढळ ?
प्रखर यौवनीं पार करपलें बाळमैत्रिचें कमळ !
परोपरीनें जिचें चोजले नित्य पुरविले जाती
फुसक्या बालिश मैत्रीस्तव कां सेविल कङ्गाला ती ?
जिच्या भोंवतीं सौन्दर्याचीं स्तुतिगीतें जन गाती
नृपति-कन्यका करील जवळीं का ती नीच पदाती ? २६०७

काडीच्याही आधारास्तव बुडता घेई धाव
सञ्जिवास तर पुतळी होती खरोखरीची नाव
महापुरामधिं नैराश्याच्या निकट करी तो पुतळी
पुतळी परि ती अखेर ठरली केवळ वञ्चक सुतळी
सुतळीच्या कां तरङ्गावया येई तोंड्यावरती ?
नाव तयाची समीप जातां ठरली फुटकी नरटी
पुतळी कसली ? उग्र भयङ्कर धारण रूप करोनी
येइ नागिणीसम त्याचेवर कोपें चवताळोनी
अशा अनुभवीं जळली त्याची अखेरचीही आस
आणि तया ब्रह्माण्ड लागलें भासूं अखिल भकास

अखेरच्या अनुभवें तयाच्या मतीस मुड्ग्या आल्या
म्हणे मनाशीं हद्द जाहली दुर्दैवाची अपुल्या.
काय करावें, कोठें जावें, मार्गच नुरला कांहीं
समाप्ति करण्याविना जिण्याची उपाय दुसरा नाहीं
जणूं तयाच्या पडल्या पायीं मणा-मणाच्या बेड्या
चालत होता अशा तऱ्हेनें वृत्ति होउनी वेड्या
वाहतूकही रस्त्यामधली दिसत तयाला नव्हती
उघड्या नेत्रीं केली होती अन्धपणानें वसती
मार्ग चालुनी कसा बसा तो येइ नदीच्या कांठीं
दूर खालती तयास दिसली चिता एक धडधडती.
चितेंतल्या परि देहालागी भासत नव्हता दाह
पेटत होता जरी तीमधें अधिकाधिक तो देह
भोंवतिचा परि पवन सज्जिवा गमुनी अग्निज्वाळा
शीतलतेचा दाह तयाच्या असह्य देहा झाला
'खरोखरी सुटलास' म्हणे तो चितेंतल्या जीवाला
'जिणें नव्हे हें, बन्दिवास हा, जग हें बन्दीशाळा'

जेव्हां खुनशीपणें ओढते दैव सपासप फटके
एकामागुनि एक बैसतां अवकृपेचे चटके
कशी उरावी जगावयाची जिवास जगतीं हौस
काय न तो म्हणणार 'आवळी मृत्यो ! अपुला फास'
दुर्दैवाच्या आळवणीचें प्रभाकराचें गीत
आठवुनी लागला म्हणाया तो त्या ओसाडींत

( चाल०—" हट छोड सखि० ")

झट चाप धरीं, शर सोडि उरीं
कारि पारध दैवा शीघ्र अतां
बहु दावियल्या तुज चाळवण्या
परि जर्जर झालों मात्र वृथा
फार पुरातन तूं हटवादी
पाठ न सोडिसि कांहिं करा
जाइन ज्या बाजूस तिथें तूं
सन्मुख ठाकसि उग्रतरा !
जळ-काष्ट-चराचर-रूपानें तूं
पाठ पुरावा चालवितां
वद जाउं कुठें, करुं काय, कसा लपुं ?
वक्ष विदारुनि टाक अतां ! २६५१

निमित्त झालें पडली कोठें कसलीशी जों ठिणगी
युरोपखण्डामधें भडकला प्रचण्ड तों कलहाग्नी
राष्ट्रा-राष्ट्रामधली स्पर्धा, वर्चस्वाची हाव
अखेर घेई रणाङ्गणावर सैन्यमिषानें धाव
दळें समोरासमोर भिडलीं कोठें घाया धडका
कांहीं राहुनि लाम्ब उडविती अग्न्यस्त्रांनीं भडका
हितसम्बन्धी कुणी जाहले त्यांत पुढें सामील
कम्बर कसली सरकारानें हिन्दुस्तानांतील
युरोपच्या रणकुण्डामाजी आहुति टाकायातें
राष्ट्र लागलें पायदळाचीं पथकें उभवायातें
ज्यांत आमिषें भरलीं ऐसे लावुनि जाहिरनामे
सरकारानें चालू केलीं सैन्यभरतिचीं कामें
हिन्दुस्तानांतील शेकडो लढवय्या जातींना
स्मृती देउनी वीर-वृत्तिची उभवायातें सेना
स्फूर्तीदायक रस्तोरस्तीं वचनें लटकावून
कुठें मलीदा चारुन, कोठें सक्ती गुप्त करून
तीव्र विरोधी पुढाऱ्यांसही आळवुनी गोडीनें
लोकमान्यता वश केली तैं उभीं कराया सैन्यें
सुरू जाहल्या कवायतीही नवीन पायदळाच्या
मिळूं लागल्या आणि सवलती कुटुम्बियांना त्यांच्या

विवञ्चनेनें पछाडलेले पोटापाण्याच्या जे
शिरुन शिपायीगिरींत झाले मेषपात्रही ताजे
नव्हते ज्यांना आसपाश वा कसले लागेबान्धे
उभे राहिले असे शिपायी ताठवुनी निज खान्दे
सञ्जीवानें तडक आपुलें दाखल केलें नांव
जया वावरावयास नव्हता अल्पहि कोठें वाव
जिवावरी जो उदार झाला त्यास शिपायीबाणा
का न सुचावा ज्यांत दाखला कुणी न पाहि पुराणा
शोध आइचा अजुन तयाला मुळिंच लागला नव्हता
भवितव्याचा मार्गहि दुसरा दिसत मोकळा नव्हता
आणि तयाला जगतीं नव्हती दुसरी कांहीं आस
घेइ शिपायीगिरी—मृत्युचा गळ्यांत घालुनि फास. २६८३

बिगूल झाला, सर्व शिपाई मैदानावर जमला
सञ्जीवाची आज चालली पलटण परदेशाला
बिगूल झाला, उभे राहिले सैनिक तों शिस्तींत
हुकुमासरशी चालुं लागले गात गात रणगीत
बिगूल झाला, जमली जनता दारीं, रस्त्याकांठीं
कोणी कौतुक, विस्मय कोणी, कींवहि कोणी करिती,
एकसारखीं पडति पाउलें, टाचा मार्गीं घुमती
बघणारांना वीरश्रीनें फुरफुरले ते गमती
त्याच गतीनें येउन घुसली फलाटावरी तुकडी
परन्तु अजुनी तिथें लागली नव्हती त्यांची गाडी.

सेनानीच्या मुखांतुनी तों फुटला हुकमी शब्द
आपटुनी पाउलें जाहली क्षणांत सेना स्तब्ध
जेंवि पांखरें तारेवरती बसलेली ओळींत
प्रचण्ड आवाजानें जाती उडुनी अस्ताव्यस्त
तैशी दुसऱ्या हुकुमासरशी झाली पाङ्गापाङ्ग
त्रिकोनांत बन्दुका उभवुनी मात्र माण्डिली राङ्ग
पुन्हा एकदां बिगूल होता डब्यांत सारे शिरती
कबूतरें ज्यापरी पटापट खुराड्यामधें घुसतीं
कर्कश देउनि शिटी सोडि ती गाडी फूत्कारांना
जयघोषानें स्टेशन घुमवी सारी छप्पर-मैना
रहदारीच्या रस्त्याचीं तों बन्द फाटकें झालीं
वाहतूक तुम्बुनी राहिली अधीर त्यांच्या जवळीं
डोकावुनि बाहेर शिपायी बघती खिडकीमधुनी
तोंच अचानक सञ्जीवाच्या दृष्टी पडली जननी
आणि तयानें हाक फोडिली आई ! आई !! आई !!!
सोसाट्यानें मार्ग आपुला कापित गाडी जाई !
गुणिलेलाही भास जाहला सञ्जीवाचा जों न
निरखुन बघण्यापूर्वी गेली गाडी पार निघून
आणि उभयतां विव्हल झाले आपआपल्या ठायीं
सावरती सोबती साञ्जिवा, मटकन् बसली आई. २७१३

दुसऱ्या दिवशीं जहाजावरी चढली सारी सनो
ऊर भरोनी सञ्जीवाच्या पाणी आलें नयनां

दूरावत चालला किनारा मायभूमिचा म्हणुन
नव्हती आशा कीं आईचें घडेल दर्शन फिरुन
रुद्ध जाहला कण्ठ तयाचा, आर्द्र लोचनें मिटलीं
जुळले गेले हातहि, कांहीं ओठ-दळें पुटपुटलीं

(चाल—बहु असोत सुन्दर०—)

वन्दन तुज मायभूमि ! हें अखेरचें
न कळे तव दर्शन कधिं फिरुन व्हायचें !

विसकटली वसवावी फिरुन ती घडी
तव काजीं झिजवावी शक्य तों कुडी
आशेची फोल परि भ्रमुनि बावडी
देशोधडि लागे ही आज बापुडी
आंचवलों जननीच्या सौख्यकारणा
आंचवलों तेंवि तुझ्या क्लेशवारणा
काय म्हणूं परिसमाप्ति ही तुला रुचे ?
वन्दन तुज मातृभूमि हें अखेरचें ॥ १ ॥

यश मळलें उजळाया फिरुन त्याप्रती
तळमळलों धडपडलों निशिदिनीं किती
परि भूवरि पाय कुणी टेकुं ना दिला
काकांचे जेवि थवे भ्रष्टल्या पिला
काडीचा आधारहि मानिला महा
झाली परि फसवणूक नित्य दुस्सहा

मान उन्च करुं पाहे कोंवळी कळी
धडगत लागेल तिची कैंवि वादळीं
झिडकारुनि दिधलें जें लेकरूं तुवां
टाकलास ज्याचा तूं तोडुनी दुवा
तरि त्याच्या नच खळती अश्रु नेत्रिंचे
वन्दन तुज मातृभूमि हें अखेरचें ॥ २ ॥

मरणाच्या दाढेंमधिं चाललों जरी
मरणाच्या भीतिचा न लेशही उरीं
मरणाच्या खाईमधिं आयु कण्ठलें
मरणाचें काय तया बुजग-बाहुलें ?
ग्रीष्माचा दाह काय वाळल्या तृणा ?
राखेला जाळिल का अग्नि तो पुन्हा ?
परि तुझी न भेट मला व्हायची पुढें
ह्या शल्यें हें तुटतें मात्र आंतडें.
मिळणार न अन्त्य शयन गे त्वदङ्किचें
वन्दन तुज मातृभूमि हें अखेरचें ॥ ३ ॥ २७५१

अघाडीस तें सैन्य ठाकलें, अनोळखी तो प्रान्त
नाच तिथें बेहोषपणानें घाली उग्र कृतान्त
द्रव्यें स्फोटक, धूर विषारी, गोळयांची सरबत्ती
वर्षावामधिं ह्याच सम्पती दिवस आणखी रात्री
उसन्त नाहीं घास घ्यावया वा पाण्याचा घोट
देह कुबटला न काढल्यानें बूट आणखी कोट

प्रतिपक्षाचीं नभीं घालिती घिरट्या नित्य विमानें
संहारास्तव निरोपलेले कीं ते दूत यमानें
मृत्यु जाहला ऐसा सकलां सहचर समरक्षेत्रीं
नशाच चढला तिथें मृत्युचा प्रत्येकाच्या नेत्रीं
ह्याच धुमश्चक्रींत चालला सञ्जीवाचा काळ
आजुबाजुला विल्हेवारी लावित होता काळ
पानापानावरुनी तरुच्या जेंवि थेम्ब ठिबकावे
तेंवि पटापट सभोंवतालीं मरुनी लोक पडावे
इतर चालती तुडवुनि त्यांना चढवाया इल्घार
मनांत म्हणती इथेंच अपुल्या अस्थी अन्थरणार २७६७

* *

आईचें आंतडें रहावें इकडे कैसें स्तब्ध ?
महत्प्रयासें तिनें लाविला निज पुत्राचा शोध
आणिक कालान्तरें लागलें क्षेम कळाया पत्रीं
दर पत्राला जीव तियेचा होई खालीवरती
क्षेम कळेपर्यन्त तियेचा जिवांत नसतो जीव
करी प्रार्थना 'प्रभु ! साम्भाळीं अभिमन्यू सञ्जीव.' २७७३

टपाल आलें एक दिनीं तों असेंच नांवावरती
भयभीता ती घेतां हातीं हात तिचे थरथरती
'टपाल नोहे दैवाच्या हा भात्यामधला बाण
निरोपिला हा असेल त्यानें घ्याया माझा प्राण
प्रगटायाचा यांतुन कसला नशिबाचा नव भोग ?

प्राण घ्यावया असेल आला शेवटचा हा रोग.
शिळेखालुनी नाग निघावा सोडित फूत्काराला
म्यानामधुनी खड्गलता वा चालुनि यावा भाला
तडिल्लता कीं शिरीं पडावी कोसळुनी निमिषांत
कशावरोनी नसेल कांहीं तशीच वार्ता यांत ?'
ह्याच विचारीं टपाल तें ती उघडायास धजेना
पाय न हाले जेंवि भीरुचा चालुन येतां सेना.
चिमुकलीच ती बङ्गी होती घेउन जरि ती हातीं
अगाध दुस्तर डोहासम ती भासुन पडली भीती
चिमुकलीच ती बङ्गी तिचिया पेलवे च ना हाता
गोवर्धन जैं गोपालांना आला नच सावरतां
'करा पावतीवरी सही, मज उशीर होतो बाई,'
मूढमती त्या गुणिलेला करि टपालवाला घाई.
सहि करतांना म्हणे 'लखोटा पहा फोडुनी वाचा'
पाही खोलुन तोंच तयाची होइ अचेतन वाचा.
'दावावें तरि वदुनि कोणत्या वचनीं न कळे वृत्त
पाय काढता घ्यावा कैचा साङ्गुन काय निमित्त'
करी बहाणा ' मज लागेना बाई अक्षर नीट'
वाट सुधारी स्वाधिन तिचिया करुनी तें पाकीट
तिनेंहि धरुनी धीर उघडली हातामधली बङ्गी
तीन निघालीं पदकें ज्यांना फिती मनोहर रङ्गीं
पाठवणी ही कुणाकडोनी काय हिचा तरि हेतू ?
काय अमङ्गल मङ्गल सुचवी भाविष्य कीं हा केतु ?
पत्राचें त्या स्वरूप दिसलें तिज सञ्जीवाकडलें
मनीं येउनी कुकल्पना तों हृदय तिचें धडधडलें

परिक्षितीचा काळ व्याळ ये रूप अळीचें धरुनी
व्यक्त व्हायचा असाच आतां प्रकार पत्रामधुनी
तयार होई गुणिले ! आला शेवटचा हा घाव
तत्पूर्वी का देइ न धरणी तुजला उदरीं ठाव ?
तयार गुणिले ! हो ऐकाया कीं तव गेला रोही
गटङ्गळी ही तुज शेवटची दुर्दैवाच्या डोहीं
निघालीस जें वाचुनि घ्याया हातामधलें पत्र
नव्हे पत्र, करि पाठपुरावा दैवच विश्वामित्र.
तुझ्या सुताच्या पराक्रमाचीं पारितोषकें पदकें
सुतनिधनाची आग केविं परि विझेल असल्या उदकें ! २८१३

"फार शिताफी, थोर धडाडी, त्याचें शौर्य अचाट
लढतां लढतां पडून समरीं स्वर्गाची धरि वाट
तया बक्षिसें मिळालींत जीं इकडे वारंवार
धाडिलींत तीं; खेद अम्हांला होतो अपरम्पार
परन्तु आपण वीर माउली, करा न याचा शोक
रणशय्येवर निजणारांना लाभतसे स्वर्लोक" २८१९

ह्या सारांशें खराच ठरला तिच्या मनींचा किन्तू
तुटून गेला आशेचा तों उरला सुरला तन्तू
महापुरीं कीं नाव अनावर लागे धारेलागीं
पान उकळत्या तेलामाजी तळतां न ठरे जागीं

जहाज निर्जन उजाड जैसे भटके उदधीवरुनी
आणि वावडी सूत्रावाचुनि गोते खाई गगनीं
वावटळीमधिं किंवा जैसा भिरभिरतो पाचोळा
तशीच झाली तिची अवस्था ऐकुन त्या वार्तेला
सुतनिधनाच्या आघातानें पिसेंच तिजला जडलें
आणि जयांची चीड तयांस्तव शाप मुखांतुन पडलें
सञ्जीवाच्या पदकांची त्या गळ्यांत घालुनि माळ
अभागिनी ती भटकूं लागे गुणिला रानोमाळ ! २८३१

# विसर्जन

मनोमन्दिरीं नसे पतीच्या स्थान आपणालागी
कळून चुकलें यशोदेस जों म्हणे मनीं हतभागी—
'जिणें नव्हे हें, बन्दिवास हा, जग हें बन्दीशाळा'
झुरणीला लागुनी मृत्युच्या गेली आडोशाला,

वृकोदराच्या संसाराची झाली वाताहात
आणि थोर सङ्क्रमण जाहले विचार–आचारांत
स्थावर जङ्गम वेचुनि सारे स्थापुन धन्देशाळा
बन्धमुक्त कैद्यांस लाविती झटुनी सन्मार्गाला
एकच इच्छा कीं न शिवावा विचारही कोणाला—
कीं 'न जिणें हें, बन्दिवास हा, जग हें बन्दीशाळा !' २८४१

REFBK-0004714



८०७८